रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक ३५६ | पृष्ठे ८ ▌RGD/016/2026-28



रायगड, मंगळवार, दि. २ जून २०२६

# कृषीवल

किंमत ४ ₹

## ट्रक चालक, क्लिनरचा मृत्यू

**खोपोली** : मुंबई-पुणे महामार्गावर सोमवारी (दि.१) पहाटेच्या सुमारास भीषण अपघात घडला. तांदूळ भरलेला ट्रक, खाद्य तेल वाहून नेणारा कंटेनर आणि एर्टिगा कार यांचा समावेश असलेल्या या अपघातात ट्रक चालक व क्लिनर यांचा जागीच मृत्यू झाला असून, इतर तिघेजण जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, पुण्याकडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या तांदूळ भरलेल्या ट्रकवरील चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने समोर असलेल्या कंटेनर ट्रकला पाठीमागून जोरदार धडक बसली. याचवेळी बाजूने जाणाऱ्या एर्टिगा कारलाही धडक लागल्याने अपघाताची तीव्रता वाढली. धडकेनंतर तांदूळ भरलेला ट्रक आणि खाद्य तेल वाहून •➤ पान २ वर

## पुणे पुन्हा गोळीबारने हादरले

**पुणे**: जिल्ह्यात पुन्हा एकदा गोळीबाराची धक्कादायक घटना घडली आहे. शिरूर तालुक्यातील करडे घाट परिसरात हा प्रकार घडला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. करडे घाट परिसरात दोन प्रतिस्पर्धी गट आमनेसामने आले होते. त्यांच्यात मागील काही काळापासून वाद सुरू होता. हा वाद अचानक चिघळल्यानंतर एका गटाकडून गोळीबार करण्यात आला. गोळ्या झाडल्यानंतर परिसरात एकच गोंधळ उडाला. या हल्ल्यात विशाल काळे गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने उपचारासाठी हलविण्यात आले, मात्र त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे पुन्हा एकदा गुन्हेगारी टोळ्यांच्या वाढत्या प्रभावाची चर्चा सुरू झाली आहे.

### वे|ध|क

## उरणमध्ये रस्ते सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर



**उरण** : उरण-मोरा मार्गावरील कै. हरिश्चंद्र गावंड उद्यानासमोर सोमवारी (दि.१) पहाटे भीषण अपघाताची घटना घडली. या अपघातात दोन तरुणांचा मृत्यू झाल्यानंतर बोरीचा पार परिसरातील रस्ते सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे, या परिसरात वारंवार होणारे अपघात लक्षात घेऊन उरण वाहतूक शाखेने तब्बल सहा महिन्यांपूर्वीच गतिरोधक बसविण्याची लेखी शिफारस केली होती. मात्र, त्यावर कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. •➤ पान २ वर

## चेन खेचून चोरटा पसार

**रोहा** : पहाटे मॉर्निंग वॉक करून घरी परतणाऱ्या महिलेच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून चोरट्याने पोबारा केल्याची घटना रोहा शहरात घडली आहे. सरस्वती रामजी गुप्ता (५८) असे पीडित महिलेचे नाव असून, त्या ब्राह्मण आळी येथील रहिवासी आहेत. त्या शुक्रवार दि.२९ मे रोजी पहाटेच्या सुमारास मॉर्निंग वॉक करून आल्यानंतर चौथ्या मजल्यावर लिफ्टमधून बाहेर पडत असताना चोरट्याने या महिलेच्या गळ्यातील १ लाख ४५ हजार रुपये किमतीची सोन्याची चेन खेचून तिच्या गळ्यावर वर छातीवर बुक्का मारून पळ काढला. त्यावेळी इमारतीच्या सफाई कामगाराने त्या चोराला पकडण्याचा प्रयत्न केला असता, त्यालादेखील मारहाण करून चोरटा दुचाकी वरून फरार झाला. रोहा पोलीस ठाण्यात दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आईस्क्रीममध्ये किडा

**कल्याण** : कल्याण पूर्वेतमधील कोळसेवाडी परिसरातून एक संतापजनक प्रकार समोर आला आहे. एका लहान मुलाने खरेदी केलेल्या एका कोन आईस्क्रीममध्ये तब्बल तीन इंच लांबीचा किडा आढळल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, येथील रचना पार्कमधील एका दुकानातून शशांक जाधव नावाच्या मुलाने कोन आईस्क्रीम खरेदी केले होते. आईस्क्रीम खाण्यास सुरुवात करताच त्यामध्ये किडा असल्याचे त्याच्या निदर्शनास आले. हा प्रकार समोर येताच मुलाच्या कुटुंबियांनी संबंधित दुकान गाठून तीव्र संताप व्यक्त केला आणि याबाबत स्पष्टीकरण मागितले आहे. संबंधित आईस्क्रीमची एक्सपायरी डेट २०२७ पर्यंत वैध असून, ते कंपनीकडून सीलबंद अवस्थेत प्राप्त झाले होते.

# काल शिव्या, आज गळाभेट!

## थोरवे-तटकरे फोटोने राजकीय ढोंगीपणा पुन्हा उघड

**| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील राजकीय वर्तुळात आ. महेंद्र थोरवे व खा. सुनिल तटकरे यांचे एकत्र असलेले छायाचित्र सध्या मोठ्या चर्चेचा आणि वादाचा विषय ठरले आहे. कालपर्यंत सुनील तटकरे यांच्यावर व्यासपीठावरून जहरी टीका करणारे, आक्रमक भाषेत हज्लाबोल करणारे, एकमेकांचा डीएनए काढणारे आणि राजकीय संघर्ष पेटवणारे शिवसेना शिंदे गटाचे आ. महेंद्र थोरवे आज अनिकेत तटकरे यांच्या उमेदवारी अर्जावेळी त्यांच्यासोबत गळ्यात गळे घालून दिसल्याने राजकीय वातावरण तापले आहे.



या कार्यक्रमाला खा. सुनील तटकरे, मंत्री उदय सामंत आणि मंत्री नितेश राणे यांचीही उपस्थिती होती. मात्र, कालचे आरोप, टीका आणि संघर्ष विसरून आजची ही अचानक झालेली ‘जवळीक’ नेमकी कशासाठी, असा सवाल कार्यकर्ते आणि सामान्य मतदारांच्या मनात उपस्थित झाला आहे. कालपर्यंत ज्या नेत्यांवर कठोर शब्दांत टीका करण्यात आली, त्याच नेत्यांसोबत कोणतीही भूमिका स्पष्ट न करता एकत्र उभे राहणे म्हणजे राजकीय प्रामाणिकता की उघडपणे सोयीसाठी केलेले समीकरण? हा प्रश्न आता अधिक तीव्र झाला आहे. कोणतीही पातळी न ठेवता एकमेकांवर •➤ पान २ वर

### राजकीय नैतिकतेवरच प्रश्नचिन्ह

कालपर्यंत ज्या मुद्द्यांवर आक्रमक भूमिका घेतली गेली, त्या मुद्द्यांवर आज पूर्ण मौन आणि त्याच विरोधकांसोबत मैत्रीपूर्ण उपस्थिती दिसल्याने राजकीय नैतिकतेवरच प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. या घडामोडीनंतर सोशल मीडियावरही प्रतिक्रिया तीव्र झाल्या असून, ‘‘कालपर्यंत शत्रू, आज एकत्र मंचावर?’’ अशा शब्दांत नेत्यांवर टीका होत आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकारामुळे एकच मुद्दा पुन्हा ठळकपणे समोर आला आहे; राजकारणात विचारसरणी महत्त्वाची की केवळ सत्तेच्या समीकरणांनुसार बदलणारी भूमिका? राजकीय सोयीसाठी कालचे शत्रू आज मित्र होत असतील, तर मतदारांनी कोणावर विश्वास ठेवायचा?

# मच्छिमारांना शासनाने मदत करावी

### विजय गिदी यांची मागणी

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

पावसाळ्यामध्ये प्रजोत्पादन कालावधी असल्याने दोन महिने मासेमारीला बंदी करण्यात आली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील मासेमारी नौका किनारी लावण्याची सुरुवात झाली आहे. जिल्ह्यातील अलिबागसह अनेक बंदरावर बोटी किनारी लावण्यात आल्या आहेत. दोन महिने मासेमारी बंद असल्याने मच्छिमारांवर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. त्यामुळे शासनाने मच्छिमारांना आर्थिक मदत करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघ मुंबईचे माजी चेअरमन विजय गिदी यांनी केली आहे.

जिल्ह्यामध्ये •➤ पान २ वर

> पावसाळी हंगाम मासळीच्या प्रजननाचा कालावधी आहे. त्यामुळे जून ते जुलै या कालावधीत मासेमारीला बंदी घालण्यात आली आहे. लहान व मोठ्या बोटी किनारी लावण्यात सुरुवात झाली आहे. काही ठिकाणी बोटी किनारी लावल्या आहेत. दोन महिने रोजगार नाही. उत्पादनाचे साधन नाही. त्यामुळे मच्छिमारांवर मोठे संकट उभे राहणार आहे. शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन मच्छिमारांना आर्थिक मदत करावी.
>
> – विजय गिदी, माजी अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मच्छिमार संघ मुंबई

### समस्यांवर मात करून मासेमारी

बदलते हवामान, कंपन्यांमधील सांडपाण्यामुळे समुद्रात होणारे प्रदुषण, जेली फिश, शासनाच्या जाचक अटी अशा अनेक समस्या मच्छिमारांसमोर येत असतात. या समस्यांमुळे त्यांच्या मासेमारीवर मोठा परिणाम होतो. त्यामुळे मासळीच्या उत्पादनाच घट होते. तरीदेखील अनेक समस्यांवर मात करीत मच्छिमार मासेमारी करतात.

# विधान परिषदेसाठी उमेदवारांची रणधुमाळी

### शेकापचे अरविंद म्हात्रे, ॲड. मानसी म्हात्रे यांनी भरला अर्ज

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कोकण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मतदार संघातील विधान परिषदेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. सोमवारी (दि.१) शेवटच्या दिवसापर्यंत सहा अर्ज दाखल झाले आहेत. त्यामध्ये शेकापचे उमेदवार अरविंद म्हात्रे, ॲड. मानसी म्हात्रे यांच्यासह अपक्ष म्हणून अनिल चोपडा यांनी अर्ज दाखल केल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.





कोकणातील रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यातील स्थानिक स्वराज संस्था मतदार संघाच्या विधान परिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. कोकण स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघामध्ये १ हजार ५ मतदार आहेत. त्यामध्ये रायगड विधान सभा मतदार संघातील ५१८, रत्नागिरीमधील २७४ आणि सिंधुदुर्गमधील २१३ मतदारांचा समावेश आहे. रायगड जिल्ह्यातील ७ विधान मतदार संघातील पनवेलमध्ये ९४, कर्जतमध्ये ११०, उरणमध्ये ३२, श्रीवर्धनमध्ये ११५, अलिबाग ५८, पेण ५७ आणि महाड मतदार संघात ५२ मतदार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. या निवडणूकीसाठी सोमवारी (दि.१) शेवटच्या दिवसापर्यंत ६ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. यावेळी शेतकरी कामगार पक्षाकडून पनवलेचे अरविंद म्हात्रे, अलिबागच्या उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांनी अर्ज भरले आहेत. तर, अलिबाग नगरपरिषदेचे जलनिस्सारण सभापती अनिल चोपडा यांनी देखील अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला आहे. यावेळी ॲड. निलम हजारे, •➤ पान २ वर

# नगरसेविका म्हात्रेंच्या कार्यालयाचे उद्घाटन

### माजी आमदार बाळाराम पाटील यांची उपस्थिती



**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १४ मधील नगरसेविका मनिषा अनंता म्हात्रे यांच्या नवीन जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. नगरसेविका मनिषा म्हात्रे यांचे पती तसेच शेतकरी कामगार पक्षाचे धाकटा खांदा येथील ज्येष्ठ कार्यकर्ते अनंता म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अनंता म्हात्रे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत त्यांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला.

या उद्घाटन सोहळ्याला विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, गटनेते केतन भगत, शेकापचे पनवेल विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष काशिनाथ पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण घरत, नगरसेवक लतिफ शेख, नगरसेविका आर्या जाधव, अर्चना भोईर,योगिता फडके, नंदकिशोर भोईर, शिवसेना (ठाकरे गट) शहर प्रमुख प्रविण जाधव, शेकापचे शहर चिटणीस दिलीप कदम, महिला आघाडीच्या माधुरी गोसावी, आदी प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना माजी आमदार बाळाराम पाटील यांनी नगरसेविका मनिषा म्हात्रे यांचे अभिनंदन करत त्यांना पुढील •➤ पान २ वर

## तीन लाखांचे दागिने लंपास

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत शहरातील दहिवली भागातील एका राहत्या घरातून रात्रीच्या सुमारास चोरीची घटना घडली आहे. घराच्या मागील बाजूने घरात घुसून लोखंडी कपाटातील तिजोरीत ठेवलेले तीन लाखांचे सोन्याचे दागिने लंपास करण्यात आले आहेत. त्यामुळे कर्जत शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, पोलिसांकडून डॉग स्कॉडची मदत घेऊन चोरट्यांचा माग काढण्याचा प्रयत्न केला जात आहे.

कर्जत शहरातील दहिवली भागातील एकतानगर येथील हर्षद जाधव यांच्या घराच्या मागील बाजूस असलेल्या लाकडी दरवाजाचे कडी कोयंडा तोडून चोरट्यांनी घरात प्रवेश केला. रात्रीच्या वेळी चोरट्यांनी घरातील लोक झोपल्यानंतर ही चोरी केली. घरात असलेल्या लोखंडी आणि लाकडी कपाटातील तिजोरी फोडून त्यातील ३ लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. त्यात मंगळसूत्र, कानातील झुमके, तसेच मोबाईल फोन आणि ७० हजारांची रोकड असा ऐवज लंपास केला आहे. घरात चोरी झाल्याचे कळताच अंकुश जाधव यांनी कर्जत पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यानंतर कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, कर्जत पोलिसांनी तात्काळ अलिबाग येथून जिल्हा पोलिसांच्या डॉग स्कॉडला पाचारण केले.

## सीईटी परीक्षेचा निकाल जाहीर

**| पुणे | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे (सीईटी कक्ष) एप्रिलमध्ये घेतलेल्या मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन आणि मास्टर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अभ्यासक्रमाच्या पहिल्या संधीच्या सीईटी परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला. या परीक्षेत ८ विद्यार्थ्यांना १०० पर्सेंटाईल मिळाले आहेत. त्यात, राज्यातील ६ आणि अन्य राज्यातील २ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या परीक्षेला एकूण १ लाख ३२ हजार ८३८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. परीक्षेत पाच सत्रात मिळून १ लाख १६ हजार १९६ विद्यार्थ्यांनी (८७.४७ टक्के) परीक्षा दिली.

# उरणमध्ये गावठी दारूचा धंदा तेजीत

- **उत्पादन शुल्क विभाग झोपेत**
- **तरूण व्यसनाधीन; संसार उघड्यावर**
- **पिंपरी-चिंचवड घटनेच्या पुनरावृत्तीची शक्यता**

**| उरण | प्रतिनिधी |**

पनवेल व उरण तालुक्यातील साई व दिघाटी, केळवणे, चिरनेर, आवरे, वशेणीसह इतर गावात गावठी दारू पुरविणाऱ्यांचा धंदा तेजीत सुरू आहे. त्यात उरण तालुक्यातील चिरनेरसह इतर सर्वच गावांमध्ये उत्पादन शुल्क विभागाच्या कृपाशीर्वादाने गावठी दारूची राजरोसपणे विक्री केली जात असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. त्यामुळे याठिकाणी देखील पिंपरी-चिंचवड येथील दारुच्या घटनेची पुनरावृत्ती होण्यास वेळ लागणार नाही, अशा प्रकारची चर्चा सध्या जनमानसात सुरू झाली आहे.

गावठी दारूमुळे तरुणांसह महिला व्यसनाधिन होऊन गावातील लोकांना खूप त्रास देत असतात. तसेच, या गावठी दारूमुळे अनेक लोकांची घरे उद्ध्वस्त होत आहेत. तर, अनेकांचा संसार उघड्यावर पडला आहे. उरण तालुक्यातील चिरनेरसह इतर अनेक गावात हातभट्टी दारुची विक्री केली जाते. त्यामुळे येथील आदिवासी समाजाची तरुण पिढी मोठ्या प्रमाणात व्यसनाधीन होत आहे. यासंदर्भात सर्व सामान्य जनतेकडून पोलीसांकडे व उत्पादन शुल्क विभागाकडे तक्रार केली जात; परंतु, उत्पादन शुल्क विभाग तसेच पोलीस यंत्रणा या घटनेकडे दुर्लक्ष करते. दरम्यान, पिंपरी-चिंचवड येथील दारु कांडची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी खबरदारी म्हणून पोलीस यंत्रणेने नुकताच चाणजे येथील हातभट्टीवर कारवाईचा बडगा उगारुन हातभट्टी उद्ध्वस्त केली. त्याचे जनतेतून कौतुक होत असताना इतर गावांतील मोठ्या प्रमाणात चालू असलेल्या हातभट्टीवर उत्पादन शुल्क विभाग व पोलिसांचे जाणूनबुजुन दुर्लक्ष होत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे या परिसरातील एकाच गावावर कारवाई का? इतर गावांवर पोलीस मेहेरबान आहेत का? या गावांमध्ये कारवाई कधी होईल, असे प्रश्न सर्वसामान्य जनतेमधून विचारले जात आहे.

## धावत्या कारला अचानक आग

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल शहरातील शिवशंभो नाका समोरील गाढी नदीच्या पुढे, सर्विस रोडवर एका कारला अचानक आग लागल्याची घटना घडली. या घटनेची माहिती मिळताच पनवेल शहर वाहतूक शाखेचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी अग्निशामक दलाला पाचारण केले. अग्निशामक दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत कारला लागलेली आग पूर्णपणे आटोक्यात आणली. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटनेनंतर वाहतूक पोलिसांनी सतर्कता दाखवत रस्त्यावरील वाहतूक कोंडी होऊ दिली नाही. कारला आग कशामुळे लागली, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही.

## भीषण स्फोटात ५५ जणांचा मृत्यू

**म्यानमार**: म्यानमारमध्ये एका प्रचंड स्फोटात किमान ५५ लोकांचा मृत्यू झाला असून, अनेक जण जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना रविवारी (दि.३१) दुपारी चीनच्या सीमेजवळ असलेल्या नामखाम टाउनशिपमधील काउंग तात गावात घडली. ताआंग नॅशनल लिबरेशन आर्मी या बंडखोर गटाने असा दावा केला आहे की, खाणकामासाठी कथितरित्या साठवून ठेवलेल्या स्फोटक साहित्याच्या निष्काळजी हाताळणीमुळे हा स्फोट झाला. या स्फोटामुळे संपूर्ण गावात हाहाकार उडाला असून, मृतांमध्ये २५ महिला आणि ३० पुरुषांचा समावेश आहे. या स्फोटात १०० हून अधिक घरांचे नुकसान झाले आहे.

### दिग्दर्शक-लेखक किशोर म्हात्रे यांचे कौतुकोद्गार | ग्रामीण कलावंतांना मिळाला हक्काचा रंगमंच

# ‘नाट्यप्रभा’ ठरली नव्या पर्वाची नांदी



**| अलिबाग | प्रतिनिधी |**

ग्रामीण रंगभूमीवरील कलावंतांना दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध करून देत ‘नाट्यप्रभा’ महोत्सवाने मराठी रंगभूमीच्या इतिहासात नवे पर्व सुरू केले आहे. ग्रामीण भागातील कलावंतांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम राज्यातीलच नव्हे तर, देशातील एक आगळावेगळा प्रयोग असल्याचे मत ज्येष्ठ नाटक दिग्दर्शक व लेखक किशोर म्हात्रे यांनी व्यक्त केले.

महोत्सवानिमित्त व्यक्त केलेल्या आपल्या मनोगतात म्हात्रे यांनी आयोजक चित्रलेखा पाटील आणि ग्रामीण रंगभूमीच्या पदाधिकाऱ्यांचे विशेष अभिनंदन केले. ग्रामीण भागातील नाट्यसंस्थांना केवळ सादरीकरणाची संधीच नव्हे, तर सुसज्ज रंगमंच, तांत्रिक सुविधा आणि प्रोत्साहनपर आर्थिक मदत उपलब्ध करून देणे ही दुमिळ बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

> चित्रलेखा पाटील यांच्या नेतृत्वाखाली आयोजित झालेला ‘नाट्यप्रभा’ महोत्सव हा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम नसून, ग्रामीण रंगभूमीच्या नव्या उभारणीची नांदी आहे. भविष्यात ग्रामीण कलाकारांसाठी व्यावसायिक संधी निर्माण करण्याच्या दिशेनेही प्रयत्न व्हावेत. ग्रामीण कलाकार आणि रसिकांना आनंदाचा अविस्मरणीय अनुभव देणाऱ्या उपक्रमांची परंपरा भविष्यात अधिक व्यापक स्वरूपात सुरू राहावी.
>
> – किशोर म्हात्रे

महोत्सवात सादर झालेल्या विविध नाटकांचा उल्लेख करताना त्यांनी ‘गजा आला रे’, ‘विठ्ठल विठ्ठल’, ‘करमरकर हाऊस’, ‘विदूषक’ आणि ‘वारी’ या नाटकांच्या माध्यमातून ग्रामीण रंगभूमीवरील वैविध्य, प्रयोगशीलता आणि कलात्मक क्षमता अधोरेखित झाल्याचे सांगितले. प्रकाशयोजना, नेपथ्य, संगीत आणि सादरीकरणाच्या बाबतीत अनेक प्रयोग व्यावसायिक रंगभूमीशी स्पर्धा करणारे होते, असेही त्यांनी नमूद केले.

महोत्सवातील वक्तशीरपणा, नटराज पूजनाची परंपरा, गुणवंतांचा सन्मान आणि सुबक आयोजन यांचेही त्यांनी कौतुक केले. ग्रामीण कलाकारांमध्ये प्रचंड ऊर्जा आणि क्षमता असल्याचे सांगत त्यांनी बदलत्या काळानुसार तांत्रिक •➤ पान २ वर

# स्वच्छतेमध्ये अलिबाग स्थानक विजेते

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बस स्थानक अभियानामध्ये रायगड, रत्नागिरी, ठाणे, मुंबई, पालघर या विभागातील नऊ स्थानकांची विजेते म्हणून निवड करण्यात आली आहे. स्पर्धेमध्ये रायगड विभागातील अलिबाग एसटी बस आगार तृतीय क्रमांकाने विजेता ठरला आहे.

मुंबई येथील प्रादेशिक कार्यालयाच्या सभागृहात सोमवारी (दि.१) अलिबाग एसटी बस आगाराचे व्यवस्थापक राकेश देवरे आणि स्थानक प्रमुख अभिजीत मांढरे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. एसटी महामंडळाच्या वर्धापन दिनानिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने ‘‘हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बस स्थानक स्पर्धा’’ आयोजित करण्यात आली होती. जिल्ह्यातील प्रत्येक आगार, स्थानकांमधील सोयी सुविधा, स्वच्छता, कामकाज अशा अनेक प्रकारचे निकष या स्पर्धेमध्ये ठेवण्यात आले होते. •➤ पान २ वर

# मोहोपाडा बाजारपेठेचा श्वास गुदमरतोय

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रसायनी पाताळगंगा परीसराची मुख्य बाजारपेठ असलेल्या मोहोपाडा येथे ग्रामीण भागातील नागरीकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. मोहोपाड्याचे रुपांतर शहरीकरणाकडे झपाट्याने होत आहे. बाजारपेठेतील अरुंद रस्ता, वाहतूककोंडी व भाजी विक्रेत्यांनी रस्त्यावर मांडलेले बस्तान अशा एक ना अनेक समस्यांमुळे मोहोपाडा बाजारपेठेचा श्वास गुदमरला असून, बाजारपेठेतील गर्दीमुळे नागरिकांना चालणे कठीण झाले आहे.



रसायनी परीसराच्या मुख्य बाजारपेठेचे केंद्रबिंदु असणाऱ्या मोहोपाडा बाजारात आगोटीच्या सामानाच्या खरेदीची लगबग उडाली आहे. मोहोपाडा बाजारात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मिरचीची खरेदी सुरु झाली आहे. गृहीणींनी मोहोपाडा बाजारात गर्दी केल्याचे चित्र दिसून येत आहे. यावर्षी मिरचीचे भाव गगनाला भिडल्याने गृहिणींचा आर्थिक मेल साधताना चांगलाच गोंधळ उडत आहे. आगोटचा घरगुती मसाला वापरात आणून तिखट मसाल्याची चव घेण्याची मजा वेगळीच असल्याचे गृहीनीनी बोलताना सांगितले. पावसाला सुरु व्हायला एक महीना राहील्याने चार महीने पुरेल एवढे आगोटीचे सामानाची साठवण करण्यात येत असते. पावसाल्यात चार महीने पुरेल असे कडधान्ये, सुका बंधार, मसाला, पापड, खारोड्या व इतर सामन खरेदी करण्यात नागरीक गुंतल्याचे दिसत आहे.

त्यासाठी आसपासच्या गावातील नागरीकांची दुपार नंतर खरेदीसाठी बाजारात गर्दी दिसत आहे. मोहोपाडा आठवडा बाजार तुंडूब भरत असल्याने बाजारहाट करणाऱ्या नागरिकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. बाजारपेठेतील सीसीटीव्ही कॅमेरेही बंद अवस्थेत असल्याने पाकिटमारांचे फावले जात असल्याचे नागरिक सांगत आहेत. त्यासाठी स्थानिक ग्रामपंचायत व पोलिसांनी योग्य नियोजन करण्याची मागणी होत आहे.

# खांदा कॉलनीत विजेचा लपंडाव

## महावितरण कार्यालयात नागरिकांचा जमाव



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खांदा कॉलनी परिसरात सुरू असलेल्या वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याच्या समस्येमुळे नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. दुपारी सुमारे १ वाजता वीजपुरवठा खंडित झाला. दोन तासांनंतर वीज आली, मात्र काही वेळातच पुन्हा बंद पडली. त्यानंतर रात्री २ वाजता पुन्हा वीज गेल्याने नागरिकांचा संयम सुटला.

रात्री सुमारे तीन वाजता संतप्त नागरिकांनी महावितरण कार्यालयात धाव घेतली. नागरिकांच्या तक्रारीनंतर सामाजिक कार्यकर्ते महादेव वाघमारे हेही महावितरण कार्यालयात पोहोचले. त्यांनी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती तपासण्याची मागणी केली. तसेच हजेरी रजिस्टरची पाहणी केली असता एकाही अधिकारी अथवा कर्मचाऱ्याची नोंद आढळून आली नसल्याचा आरोप त्यांनी केला. यानंतर महादेव वाघमारे यांनी पोलीस प्रशासनाला महावितरण कार्यालयात बोलावून संबंधित कर्मचाऱ्यांची चौकशी करण्याची मागणी केली. नागरिकांच्या स्वाक्षऱ्यांसह तक्रार अर्जही दाखल करण्यात आला. तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी पोलिसांकडे केली.

वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि नोकरदार वर्गाला मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. अनेकांना दुसऱ्या दिवशी कामावर जायचे असतानाही रात्रभर जागरण करावे लागल्याने संताप अधिक वाढला आहे.दरम्यान, वीजपुरवठ्याचा प्रश्न तातडीने सोडवला नाही आणि पुन्हा अशाच प्रकारे वीज गेल्यास महावितरण कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते महादेव वाघमारे यांनी दिला आहे.

# राधेश्याम मोरे यांचे निधन

**। रोहा । प्रतिनिधी ।**



सेवानिवृत्त तहसीलदार राधेश्याम परशुराम मोरे यांचे शुक्रवार दि.२९ मे रोजी वयाच्या ८२ व्या वर्षी निधन झाले. राधेश्याम मोरे यांनी रोहा तहसील कार्यालयातील पुरवठा शाखेत अव्वल कारकून म्हणून अनेक वर्ष काम केले आहे. अव्वल कारकून ते तहसीलदार पदापर्यंत झेप घेणारे राधेश्याम मोरे यांच्या निधनाचे वृत्त समजताच समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी यांच्या त्यांचे आप्तस्वकीय व मित्र परिवार यांनी त्यांच्या निवास्थानी भेट देऊन त्यांचे अंत्यदर्शन घेऊन त्यांच्या परिवाराचे सांत्वन केले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी रविवारी (दि.७), तर अंतिम धार्मिक विधी मंगळवारी (दि.९) राहत्या घरी होणार असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे.

### माहिती अधिकार कार्यकर्ता प्रशिक्षणाचे आयोजन

**। उरण । प्रतिनिधी ।**

माहिती अधिकार कार्यकर्ता संघ उरण तालुकाच्यावतीने तालुक्यातील माहिती अधिकार कार्यकर्ता संघाच्या सदस्यांसाठी तसेच नवीन नोंदणीसाठी फॉर्म भरलेल्या कार्यकर्त्यांसाठी शनिवारी (दि.६) संध्याकाळी ठिक ५.०० वाजता एकदंत अपार्टमेंट उरण शहर येथे विशेष विचारविनिमय बैठक व प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आले आहे. या कार्यशाळेमध्ये विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

# नढालमध्ये भीषण आग

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

नढाळ गावाजवळ दुपारच्या सुमारास मोठी आग लागल्याची घटना घडली. ही निदर्शनास येताच तत्काळ माजी उपसरपंच समीर दळवी व सामाजिक कार्यकर्ते श्यामभाई साळवी यांनी सतर्कता दाखवून नायब तहसीलदार सुधाकर राठोड, ग्रामसेवक महेश म्हसे आणि सरपंच पूजा तवले यांना कळवले. त्यानंतर पाताळगंगा एमआयडीसीच्या अग्निशामक दलाच्या तात्काळ प्रयत्नांमुळे आग आटोक्यात आली आणि मोठा अपघात टळला.



या आगीत परिसरातील परेश दवे यांचे पॉलिहाऊस, जवळची गोशाळा आणि रहिवासी भाग खाक होण्याची शक्यता होती; मात्र, वेळेवर आगीवर नियंत्रण मिळाल्यामुळे नुकसान टळले. स्थानिकांनी समीर दळवी, श्यामभाई साळवी यांच्यासह सागर नवघणे व जगत केवट यांच्या प्रयत्नांमुळे परिस्थिती नियंत्रणात आली. या धाडसी व सतर्क कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक होत आहे. समाजासाठी भविष्यात तत्पर अग्निशामक सेवा सुनिश्चित करावी म्हणून लोधीवली ग्रामपंचायतीस स्वतंत्र अग्निशामक गाडी दिली जावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

## पान १ वरून

### मच्छिमारांना शासनाने मदत करावी

साधारणतः पाच हजारांपेक्षा अधिक मासेमारीच्या नौका आहेत. त्यामध्ये काही नौका यांत्रिकी, तर काही बिगर यांत्रिकी आहेत. जून महिन्यात पावसामुळे उधाणाबरोबरच वारा, वादळ मोठ्या प्रमाणात येते. मासेमारीसाठी गेलेल्या बोटी अडकून बसण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे अनेकांना जीवदेखील गमवावा लागतो. तसेच, पावसाळ्यात मासळी प्रजोत्पादन कालावधी आहे. त्यामुळे दोन महिने मासेमारी शासनाकडून बंदी घातली जाते.

जिल्ह्यामध्ये दि.१ जून ते जुलै या दोन महिन्यांच्या कालावधीत मासेमारीला बंदी करण्यात आली आहे.खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे. मासेमारी बंदीमुळे मच्छिमारांनी त्यांच्या नौका किनारी लावण्यास सुरुवात केली आहे. काही ठिकाणी बंदरावर बोटी उभ्या करून त्यांना प्लास्टिकच्या आवरणाने झाकून ठेवण्याचे कामही केले आहे. मात्र, मासेमारी नौका दोन महिने किनाऱ्यावर राहणार आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील मच्छिमारांच्या रोजगारावर दोन महिने ब्रेक लागला आहे. अनेक कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे. त्यामुळे शासनाने मच्छिमारांच्या या समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन लवकरात लवकर या कालावधीत आर्थिक सहाय्यक करावे, अशी मागणी विजय गिदी यांनी केली आहे.

### काल शिव्या, आज गळाभेट!

चिखलफेक केल्यानंतर केवळ युतीधर्माच्या नावाखाली त्यांचा उमेदवारी अर्ज भरायला जाऊन केलेली गळाभेट ही मतदारांच्या डोळ्यात धूळफेकच नाही का? असा प्रश्न उपस्थित करीत उपहास आणि अविश्वासाचा स्फोट झाला असल्याचे मत काही मतदारांनी व्यक्त केले आहे. स्थानिक राजकीय वातावरणात या घटनेला थेट 'यूटर्न राजकारण' असे संबोधले जात असून, कार्यकर्त्यांच्या निष्ठेचा उघडपणे वापर करून शेवटी नेत्यांनीच भूमिका बदलल्याची चर्चा जोर धरत आहे. अनेक कार्यकर्त्यांनी वर्षानुवर्षे जपलेली वैचारिक लढाई आज एका फोटोने प्रश्नचिन्हात उभी राहिली आहे.

राजकीय टीकाकारांचे म्हणणे आहे की, संघर्षाचे राजकारण हे अनेकदा कार्यकर्त्यांना रस्त्यावर ठेवण्यासाठी वापरले जाते, तर अंतिम निर्णय मात्र बंद दाराआड होणाऱ्या ''सोयीस्कर समजुतींमध्ये'' घेतला जातो. त्यामुळेच आजचे हे चित्र मतदारांसाठी धक्कादायक मानले जात आहे. हा प्रश्न केवळ एका फोटोचा नाही. हा प्रश्न आहे राजकीय प्रामाणिकतेचा आणि सातत्याचा. कारण, जर कालचे आरोप खरे होते, तर आजची जवळीक ही थेट स्वतःच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे. आणि जर आजची जवळीक योग्य असेल, तर कालचा संपूर्ण संघर्ष हा केवळ स्टेजवरील राजकीय नाटक होता, हे उघडपणे मान्य करावे लागेल. अनिकेत तटकरे यांच्या उमेदवारी अर्जावेळी दिसलेले हे छायाचित्र आता केवळ एक फोटो राहिलेला नाही. ते राजकारणातील सोयीस्कर भूमिका, बदलती निष्ठा आणि कार्यकर्त्यांच्या भावनांशी केलेला खेळ याचे जिवंत उदाहरण बनले आहे.

### नगरसेविका म्हात्रेंच्या कार्यालयाचे उद्‌घाटन

वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी पनवेलमधील विविध नागरी समस्यांकडे लक्ष वेधले. सत्ताधारी पक्षाकडून जनतेच्या प्रश्नांकडे अपेक्षित गांभीर्याने पाहिले जात नसल्याचा आरोप बाळाराम पाटील यांनी केला. महाविकास आघाडीचे सर्व नगरसेवक, विरोधी पक्षनेते आणि पदाधिकारी नागरिकांच्या समस्यांसाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. पनवेलकरांच्या हितासाठी आणि आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महाविकास आघाडी कटिबद्ध असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

यावेळी नगरसेविका मनिषा म्हात्रे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. धाकटा खांदा येथील नव्या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून प्रभागातील नागरिकांना अधिक चांगली सेवा देण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी सांगितले. कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक नागरिकाच्या समस्या समजून घेऊन त्या सोडविण्यास प्राधान्य दिले जाईल. तसेच पनवेल शहर आणि प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

### स्वच्छतेमध्ये अलिबाग स्थानक विजेते

रत्नागिरीपासून वेगवेगळ्या जिल्ह्यांतील वरिष्ठ अधिकारी यांनी अलिबागसह जिल्ह्यातील अनेक स्थानक, आगार यांना भेट दिली. तेथील कामकाजाची व प्रवाशांना मिळणाऱ्या सुविधांची माहिती घेतली. त्यानंतर गुण देण्यात आले. २०२५-२६ मध्ये घेण्यात आलेल्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ बसस्थानक अभियानांमध्ये मुंबई प्रदेशातील नऊ स्थानकांची विजेती म्हणून निवड करण्यात आली आहे. वेगवेगळ्या गटामध्ये ही स्पर्धा घेण्यात आली होती. त्यामध्ये मुंबई विभागातील मुंबई सेंट्रलचा (गट ब) प्रथम क्रमांक, कुर्ला नेहरु नगरचा (गट ब) द्वितीय क्रमांक, तर परळ स्थानकाने (गट क) तृतीय क्रमांक मिळवला आहे. पालघर विभागातील बोईसर स्थानकाने (गट अ) द्वितीय क्रमांक, तर, नालासोपारा स्थानकाने (गट क) तृतीय क्रमांक मिळविला आहे. रत्नागिरी विभागातील रत्नागिरी नवीन स्थानकाने (गट अ) प्रथम क्रमांक, तर माखजन स्थानकाने (गट क) द्वितीय क्रमांक मिळविला आहे. ठाणे विभागातील ठाणे खोपट स्थानकाने (गट ब) तृतीय, तसेच रायगड विभागातील अलिबाग एसटी बस स्थानकाने (गट अ) तृतीय क्रमांक मिळविला आहे. या सर्व आगारातील व्यवस्थापक, स्थानक प्रमुख यांचा पुरस्काराने सन्मान करण्यात आला. अलिबाग एसटी बस आगाराचे व्यवस्थापक राकेश देवरे आणि स्थानक प्रमुख अभिजीत मांढरे यांना पुरस्काराने गौरविण्यात आले.

### विधान परिषदेसाठी उमेदवारांची रणधुमाळी

संतोष गुरव, ऋषीकेश माळी, अश्वीनी ठोसर, वृषाली ठोसर, सागर भगत, प्रकाश पाटील, व मनोज पाटील आदी उपस्थित होते. तसेच, रत्नागिरीमधील उद्धव ठाकरे गटातील माजी आमदार सुरेंद्रनाथ (बाळ) माने हे उमेदवार रत्नागिरी, सिधंदूर्ग आणि रायगड स्थानिक स्वराज्य संस्था मतदार संघातून विधान परिषदेच्या रिंगणात आहेत. तसेच, राष्ट्रवादी अजित पवार गटातले माजी आ. अनिकेत तटकरे, शिंदे गटाचे आमदार महेंद्र दळवी यांची कन्या यांनी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

### उरणमध्ये रस्ते सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

सोमवारी पहाटेच्या सुमारास मोराकडून सीबी शाईन मोटारसायकलवरून महेश प्रल्हाद चांदेकर (३५) हे उरणकडे येत होते. त्याच वेळी उरणकडून मोरा दिशेने बुलेट मोटारसायकलवरून निखील दिपक कुकडे (३८) हे जात होते. यावेळी हरिश्चंद्र गावंड उद्यानासमोर दोघांनीही आपापल्या ताब्यातील वाहने बेदरकारपणे चालवून एकमेकांना जोरदार धडक दिली. या धडकेत दोघेही गंभीर जखमी होऊन रस्त्यावर कोसळले. अपघाताची माहिती मिळताच उरण पोलीस घटनास्थळी दाखल झाले. दोन्ही जखमींना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे दोन कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, संपूर्ण उरण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, या दुर्घटनेनंतर एक महत्त्वाची बाब समोर आली आहे. उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांनी दि. ६ जानेवारी रोजी उरण नगरपरिषदेला अधिकृत पत्र पाठवून उरण ते मोरा रोडवरील बोरीचा पार येथे वारंवार होणारे अपघात लक्षात घेता इंडियन रोड कॉंग्रेसच्या निकषानुसार गतिरोधक बसविण्याची मागणी केली होती. तसेच, अपघात टाळण्यासाठी तातडीने गतिरोधक बसविण्याची आवश्यकता असल्याचेही स्पष्ट करण्यात आले होते. मात्र, या ठिकाणी गतिरोधक बसविण्याची गरज नसल्याचे सांगत काही भाजप नगरसेवकांनी या प्रस्तावाला विरोध केल्याची चर्चा स्थानिक स्तरावर सुरू आहे. त्यामुळे वाहतूक विभागाने दिलेला इशारा आणि नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न दुर्लक्षित राहिल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

### ट्रक चालक, क्लिनरचा मृत्यू

नेणारा कंटेनर रस्त्यावर पलटी झाला. या अपघातात ट्रक चालक व क्लिनर यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांची ओळख अद्याप पटलेली नाही. कंटेनर चालक किरकोळ जखमी झाला असून, एर्टिगा कारमधील एका प्रवाशाला गंभीर तर अन्य एकाला किरकोळ दुखापत झाली आहे. जखमींमध्ये लिलाबाई सस्ते (८०), मुकिंदा सस्ते (५६) आणि महेंद्र पाल (३९) यांचा समावेश आहे. दरम्यान, अपघातग्रस्त वाहने आणि रस्त्यावर पडलेला माल हटवून वाहतूक सुरळीत करण्यात आली. या मदतकार्यात महामार्ग वाहतूक पोलीस यंत्रणा बोरघाट, खोपोली पोलीस स्टेशन, आयआरबी पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणा, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बल, लोकमान्य हॉस्पिटल आणि हेल्प फाउंडेशन अशा विविध यंत्रणानी सहभाग घेतला.

### 'नाट्यप्रभा' ठरली नव्या पर्वाची नांदी

बाबींचा अधिक अभ्यास करण्याची गरज व्यक्त केली. नाटक हे सतत बदलणारे माध्यम असून आधुनिक तंत्रज्ञान, नेपथ्य, प्रकाशयोजना आणि रंगभाषेचा अभ्यास केल्यास ग्रामीण रंगभूमी अधिक सक्षम होईल, असे त्यांनी सांगितले.

गेली चार दशके रंगभूमीवर कार्यरत असलेल्या किशोर म्हात्रे यांनी आपल्या अनुभवातून अनेक नामवंत कलाकारांच्या जडणघडणीचे साक्षीदार असल्याचे नमूद केले. आज व्यावसायिक रंगभूमी, चित्रपट आणि मालिकांमध्ये यशस्वी ठरलेल्या अनेक कलाकारांच्या सुरुवातीच्या प्रवासात सहभागी होण्याची संधी लाभल्याचे सांगितले. तसेच नवोदित कलाकारांनी सातत्याने शिकत राहावे, असा सल्लाही म्हात्रे यांनी दिला.

**कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
**(भारत सरकारचा उपक्रम)**
सादर सेवा
**रोजगार अधिसूचना**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांनी वॉक-इन मुलाखतीद्वारे करार तत्त्वावर केआरसीएलमधील विविध पदांसाठी अधिसूचना प्रसिद्ध केली आहे. तपशील पुढीलप्रमाणे आहेत:

| अ. क्र. | अधिसूचना क्रमांक व दिनांक | पदाचे नाव | यूआर | ईडब्ल्यू एस | ओबी सी | एस सी | एस टी | एकूण संख्या | वॉक-इन मुलाखतीची तारीख |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सीओ/पी-आर/ 7सी/2026 दिनांक 14/05/2026 | कनिष्ठ तांत्रिक सहाय्यक / यांत्रिक | 7 | 1 | 2 | 1 | 0 | 11 | 08/06/2026 |
| | | गुणवत्ता निरीक्षक | 8 | 1 | 3 | 2 | 1 | 15 | |
| | | तंत्रज्ञ (वेल्डर) | 8 | 1 | 4 | 2 | 1 | 16 | 09/06/2026 |
| | | तंत्रज्ञ (EOT ऑपरेटर) | 8 | 1 | 4 | 2 | 1 | 16 | |
| | | तंत्रज्ञ (फिटर) | 11 | 2 | 5 | 3 | 1 | 22 | 10/06/2026 |
| | | वाहन चालक | 3 | 0 | 1 | 0 | 0 | 4 | |
| | | लिस्टर/फोर्कलिफ्ट ऑपरेटर | 8 | 1 | 3 | 1 | 1 | 14 | 11/06/2026 |
| | | हायड्रा ऑपरेटर | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | |
| | | ऑफिस बॉय/हेल्पर/ खलाशी | 15 | 3 | 8 | 4 | 2 | 32 | 12/06/2026 |
| 2 | सीओ/पी-आर/ 9सी/2026 दिनांक 25/05/2026 | सहाय्यक वित्तीय सल्लागार | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 29/06/2026 |
| | | सहाय्यक साहित्य व्यवस्थापक | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | |
| | | विभाग अधिकारी | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | |
| | | डेपो साहित्य अधीक्षक | 3 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 30/06/2026 |
| | | कार्मिक निरीक्षक | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | |
| 3 | सीओ/पी-आर/ 8सी/2026 दिनांक 19/05/2026 | सहाय्यक लेखा अधिकारी | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 17/06/2026 |
| | | विभाग अधिकारी | 2 | 1 | 1 | 0 | 0 | 4 | 18/06/2026 |
| | | लेखा सहाय्यक | 2 | 1 | 1 | 0 | 0 | 4 | 19/06/2026 |

उमेदवारांनी अधिसूचना, पात्रता निकष इत्यादी तपशीलांसाठी केआरसीएल संकेतस्थळ **www.konkanrailway.com** वर लिंक → नियुक्ती → वर्तमान अधिसूचना पाहावी व त्यानुसार अर्ज करावा.

**मुख्य कार्मिक अधिकारी**

**जाहीर सूचना**

याद्वारे सर्वसामान्य जनतेला **सूचना** देण्यात येत आहे की, **श्री. मकरंद सुरेश नार्वेकर** (**"मालक"**) हे आमच्या अशिलांना, खाली दिलेल्या **अनुसूचीमध्ये** अधिक तपशीलवार वर्णन केलेली, महाराष्ट्र राज्यातील रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात, झिराडपाडा गावातील मालमत्ता (**"सदर मालमत्ता"**) सर्व दावे, मागण्या आणि बोजांपासून मुक्त, स्पष्ट आणि विक्रीयोग्य मालकी हक्कासह विकण्याचा प्रस्ताव देत आहे.

सर्व किंवा कोणतीही व्यक्ति/ संस्था समाविष्ट व्यक्ति, हिंदू अविभक्त कुटुंब, कंपनी, बँक(का), वित्तीय संस्था(थे), नॉन-बँकिंग वित्तीय संस्था(थे), फर्म, व्यक्तींचा समूह किंवा व्यक्तिंची संघटना अंतर्भूत असो किंवा नसो, सावकार आणि / किंवा कर्जदाराच्या सदर मालमत्ता किंवा तिचा कोणताही भागा संदर्भात कोणताही हिस्सा, अधिकार, मालकी हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, आक्षेप आणि/ किंवा मागणी जसे की विक्री, देवाण घेवाण, बेचनपत्र, गहाण, बोजा, भेट, विकास हक्क, फ्लोर स्पेस इंडेक्स, ताबा, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, भाडेकरार, उप-भाडेकरार, लीव्ह ॲण्ड लायसन्स, धारणाधिकार, देखभाल, विश्वस्त संस्था, वारसा, उत्तराधिकार, व्यापण, व्यवसाय, राईट ऑफ वे किंवा इतर सुलभ हक्क, खटला, कोणत्याही न्यायालय किंवा न्यायाधिकरणाचा निर्णय, हुकूम, आदेश किंवा बक्षीस किंवा अन्यथा ज्या कोणत्याही प्रकारे सदर मालमत्ता किंवा त्याच्या कोणताही भाग संदर्भात असल्यास त्यांनी या द्वारे कृपया लेखी स्वरुपात त्याची सूचना सहाय्यक कागदोपत्रांसह निम्नस्वाक्षरीकारांना सिरिल अमरचंद मंगलदास, दुसरा मजला, पिरामल टॉवर, पेनिन्सुला कॉर्पोरेट पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई - ४०००१३, भारत, येथे या सूचना प्रकाशन झाल्यापासून ७ (**सात**) दिवसांच्या आत सूचित करावे अन्यथा, अशा व्यक्ति किंवा व्यक्तिंचा कोणताही दावा, मागणी, हिस्सा, हक्क, मालकी किंवा हितसंबंध, जर असेल तर, ते माफ केले गेले आहेत आणि/ किंवा सोडले गेले आहेत असे मानले जाईल आणि सदर मालमत्तावरील मालकांची मालकी सर्व प्रकारच्या दाव्यांपासून, मांगण्यापासून आणि बोजांपासून मुक्त, स्पष्ट आणि विक्रीयोग्य मानले जाईल आणि आमचे अशिल त्यानुसार मालकाकडून सदर मालमत्ता खरेदी करण्याची कार्यवाही करतील.

**अनुसूची**
**(सदर मालमत्तेचे वर्णन)**

रायगड नोंदणी जिल्हा आणि उप-जिल्हा अंतर्गत, अलिबाग तालुक्यात, झिराडपाडा गावात स्थित गट क्र. १२१/१/१/३अ/२ असलेली, सुमारे ३,३०७ चौरस मीटर (अंदाजे ०.८२ एकर) क्षेत्रफळाची सर्व मालकी हक्काची बिगरशेती जमीन.

**सिरिल अमरचंद मंगलदास** करिता
सही/-
**ऋषिराज भट्ट**
भागीदार

दिनांक: ०२-०६-२०२६

**जाहिर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे चौल, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक सौ. संध्या शशांक मांजरेकर, रा. अे/२०१, २ रा मजला, सुर्यासागर सोसायटी, दत्त चौकी, उर्वशी हॉटेलच्यावरती, बदलापूर-पश्चिम, ठाणे त्यांच्या नांवे असलेली बागायत मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | हि.नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| चौल ता. अलिबाग | २४१५/२ | - | ०-०९-१० | ४.९३ |
| | | | पो.ख. ०-००-७० | |
| | | | एकूण ०-०९-८० | |

वर नमूद बागायत मिळकतीबाबत.

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २९/०५/२०२६

सही/-
**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक रघूनाथ महादेव चव्हाण, शेवंता महादेव चव्हाण, शांता रघुनाथ मालसुरे, मंदा सुरेश शिंदे, राजेश विनायक चव्हाण, शैलेश विनायक चव्हाण, सुदेश विनायक चव्हाण व सुनंदा विनायक चव्हाण यांचेकडुन खरेदी घेण्याचे निश्चित केले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे बेलोशी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| गट क्रमांक | क्षेत्र हे. आर. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|
| २४४ | ०-८४-६० | ११.३३ |
| सदर मिळकतीपैकी ००-३८-०० हे. आर. इतके क्षेत्र | | |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक : ०२/०६/२०२६

**ॲड. अक्षय सुधीर म्हात्रे**
''अन्नपूर्णा', मु. पो. धोकवडे,
ता. अलिबाग, जि. रायगड.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे झुगरेवाडी, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ३६ | एकूण क्षेत्र ०-०४-०० हे.आर | ०.०३ |
| ३७/६/ब | एकूण क्षेत्र ०-६६-०० हे.आर | ०.४० |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही
दिनांक :-०२/०६/२०२६
**ॲड. रोहित रो. मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चेवणे, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ९६/५/ब | एकूण क्षेत्र ०-२७-०० हे.आर | ०.२० |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही /-
दिनांक :-०२/०६/२०२६
**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## निवडक


●(छायाचित्र, धम्मशील सावंत)

### रेड कार्पेटवरून थेट कोकणच्या लाल मातीत

**पाली/बेणसे :** फ्रान्समधील कान्स चित्रपट महोत्सवात कोकणची लोकप्रिय 'कोकण हार्टेड गर्ल' अंकिता वालावलकर हिलाही रेड कार्पेटवर झळकण्याची संधी मिळाली होती. मात्र, कान्सहून भारतात परतताच अंकिताने पुन्हा एकदा आपली नाळ कोकणच्या लाल मातीत घट्ट रुजलेली असल्याचे दाखवून दिले आहे.अंकिता आणि तिच्या सहकाऱ्यांनी त्यांच्या अर्थनिक्सस ग्लोबल फाऊंडेशनच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यातील दुर्गम आदिवासी भागांमध्ये जाऊन गरजू मुलांना कपडे आणि टोप्यांचे वाटप केले. माणगावचे वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर यांच्या मार्गदर्शनाखाली येथील दुर्गराज किल्ले रायगड परिसरातील दऱ्याखोऱ्यांमधील तसेच माणगाव तालुक्यातील काही आदिवासी पाड्यांमध्ये हा उपक्रम राबविण्यात आला. याबाबत बोलताना अंकिता वालावलकर म्हणाली, ''अर्थनिक्सस ग्लोबल फाउंडेशनच्या माध्यमातून आम्ही सातत्याने विविध सामाजिक उपक्रम राबवत असतो. समाजातील गरजू लोकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवणे आणि लोकांनी विश्वासाने दिलेली मदत योग्य व्यक्तींपर्यंत पारदर्शकपणे पोहोचवणे हा आमचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमावेळी अंकिता वालावलकरसोबत तिचे पती आणि प्रसिद्ध संगीतकार कुणाल भगत, पल्लवी निशांत भगत, सहकारी सौरभ पाटील तसेच वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर उपस्थित होते.



### अलिबागमध्ये एसटीचा वर्धापन दिन उत्साहात

**रायगड :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा (एसटी) ७८ वा वर्धापन दिन सोमवारी (दि. १) अलिबाग एसटी बस आगारात उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विभागीय वाहतूक अधिकारी संदीप पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत केक कापून या विशेष दिवसाचे अनोख्या पद्धतीने सेलिब्रेशन करण्यात आले. यावेळी प्रवाशांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले तसेच त्यांचा सन्मानही करण्यात आला. वर्धापन दिनानिमित्त अलिबाग एसटी बस आगार आणि बस स्थानक परिसर आकर्षक रांगोळ्यांनी सजविण्यात आला होता. तसेच 'संबोधी' नावाच्या एसटी बसला फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली. बसची विधिवत पूजा करून तिच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. आगार परिसरात विविध ठिकाणी फुलांच्या माळा लावून सुशोभीकरण करण्यात आले होते. कार्यक्रमाचा प्रमुख आकर्षण ठरलेल्या केक कापण्याचा सोहळा ज्येष्ठ नागरिक आणि ज्येष्ठ महिलांच्या हस्ते पार पडला. याप्रसंगी एसटीतील वाहतूक निरीक्षक, कार्यशाळा विभागातील अधिकारी व कर्मचारी, चालक, वाहक तसेच महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी एसटीच्या गौरवशाली वाटचालीचा आढावा घेत ग्रामीण भागातील जनतेसाठी एसटीने बजावलेल्या महत्त्वपूर्ण भूमिकेचा उल्लेख केला.



### मोदी तलाव सुशोभिकरणाचे काम संथगतीने

**तळा :** तळा शहराच्या मध्यवर्ती भागातील ऐतिहासिक मोदी तलावाच्या सुशोभीकरणाचे काम अत्यंत संथगतीने सुरू असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाही तलावातील गाळ काढण्याचे काम पूर्ण झालेले नसल्याने संबंधित ठेकेदाराने हे काम तातडीने पूर्ण करावे, अशी मागणी शहरवासियांकडून होत आहे. मोदी तलावाच्या सुशोभीकरणासाठी ३० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या अंतर्गत तलावातील गाळ काढणे, संरक्षक भिंत उभारणे, पेव्हर ब्लॉक बसविणे, रेलिंगची उभारणी, पायऱ्यांवर ग्रॅनाईट बसविणे तसेच तलावालगत असलेल्या गाळ्यांवर पत्रे बसविणे अशी विविध कामे प्रस्तावित आहेत. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे भूमीपूजन तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांच्या हस्ते ५ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आले होते. मात्र, भूमीपूजनाला तब्बल पाच महिन्यांहून अधिक कालावधी उलटून गेल्यानंतरही काम पूर्णत्वास पोहोचलेले नाही. विशेष म्हणजे, तलावातील गाळ काढण्याचे काम अद्याप अपूर्ण असल्याचे चित्र दिसून येत आहे. पावसाळा सुरू झाल्यानंतर तलावातील गाळ बाहेर काढणे कठीण होणार आहे.

# सामाजिक न्याय भवन दुर्लक्षितच!

- निकृष्ट बांधकामाने वंचितांच्या विकासाला खीळ
- महामानवाच्या नावाची इमारत पाच वर्षांपासून ओसाड
- नूतनीकरणाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष


(छायाचित्र : समीर मालोदे)

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

अनुसूचित जाती, नवबौद्ध आणि इतर वंचित घटकांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नतीसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून उभारण्यात आलेले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन आज स्वतःच न्यायाच्या प्रतीक्षेत असल्याचे चित्र आहे. अलिबाग तालुक्यातील गोंधळपाडा येथे उभारलेली ही इमारत निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे अवघ्या काही वर्षांत धोकादायक ठरली आणि गेल्या पाच वर्षांपासून पडिक अवस्थेत उभी आहे. त्यामुळे वंचित घटकांच्या विकासासाठी निर्माण केलेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला अक्षरशः ब्रेक लागल्याची भावना व्यक्त होत आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या माध्यमातून गोंधळपाडा येथे ही भव्य इमारत उभारण्यात आली होती. यासाठी तब्बल २ कोटी ७३ लाख ९४ हजार ७०० रुपये खर्च करण्यात आले. १५ ऑगस्ट २०१४ रोजी इमारतीचे उद्घाटन झाले होते. मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी विविध महामंडळांची कार्यालये एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याचा उद्देश होता. इमारतीच्या तळमजल्यावर श्यामराव पेजे कोकण इतर मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ यांची कार्यालये सुरू केली होती. पहिल्या मजल्यावर समाजकल्याण सहाय्यक आयुक्त कार्यालय, सभागृह आणि कर्मचाऱ्यांची कार्यालये, तर दुसऱ्या मजल्यावर जात पडताळणी कार्यालय कार्यरत होते. मात्र, उद्घाटनानंतर अवघ्या चार वर्षांतच इमारतीचा स्लॅबचे भाग कोसळणे, भिंतींना तडे जाणे, पावसाळ्यात छताला गळती अशा अनेक समस्या निर्माण झाल्या. त्यामुळे कर्मचारी, विद्यार्थी आणि कामानिमित्त येणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला. अखेर २०१९ मध्ये इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले. या अहवालात इमारत धोकादायक असल्याचे नमूद करण्यात आले. ज्या इमारतीमधून वंचित समाजाच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न साकार होणार होते, तीच दुर्लक्षित अवस्थेत उभी आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित यंत्रणांकडून याकडे दुर्लक्ष होत असल्याने तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

#### सामाजिक न्याय भवन की जनावरांचा गोठा?

गेल्या पाच वर्षांपासून बंद आणि पडिक अवस्थेत असलेल्या सामाजिक न्याय भवनाच्या दुरुस्तीबाबत किंवा नवीन इमारतीच्या उभारणीबाबत कोणतीही ठोस हालचाल झालेली नाही. परिणामी, इमारतीचा परिसर काही व्यक्तींकडून जनावरे व बकऱ्या बांधण्यासाठी वापरला जात असल्याचे स्थानिकांकडून सांगितले जात आहे. सामाजिक न्यायाच्या उद्देशाने उभारलेल्या इमारतीचा वापर आज गोठ्यासारखा होत असल्याची परिस्थिती प्रशासनासाठी लज्जास्पद असल्याची प्रतिक्रिया उमटत आहे.

#### कार्यकारी अभियंत्यांची उत्तर देण्यास टाळाटाळ

गोंधळपाडा येथील सामाजिक न्याय भवनाच्या नूतनीकरणाबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक यांच्याशी संपर्क साधण्यात आला असता, ''माहिती घेऊन कळविते,'' असे त्यांनी सांगितले. मात्र, त्यानंतर या विषयावर त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. पुन्हा संपर्क साधूनही या प्रश्नावर त्यांच्याकडून उत्तर मिळाले नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## कर्जतमधील जंगलतोडीमुळे पर्यावरण धोक्यात

**प्लॉटिंग आणि विकासकामांच्या नावाखाली निसर्गाची मोठी हानी**

**| नेरळ | प्रतिनिधी |**

पर्यटनाचे नंदनवन आणि निसर्गसंपन्न तालुका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कर्जत तालुक्यात सध्या मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या जंगलतोडीमुळे पर्यावरणाचा समतोल धोक्यात आला आहे. खंडास ग्रामपंचायत हद्दीतील आंभेरपाडा परिसरात प्लॉटिंग आणि विकासकामांच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर साग, खैर यांसारख्या मौल्यवान वृक्षांची कत्तल करण्यात आल्याचा आरोप स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आंभेरपाडा परिसरात सध्या विविध विकास प्रकल्प आणि प्लॉटिंगची कामे सुरू आहेत. या कामांसाठी डोंगर उतार आणि जंगल क्षेत्रातील मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड करण्यात आली असून, काही ठिकाणी डोंगराचा नैसर्गिक भूभागही सपाट करण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. यामुळे परिसरातील नैसर्गिक सौंदर्य आणि पर्यावरणीय समतोलावर गंभीर परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, तोडण्यात आलेल्या झाडांचे लाकूड विविध ठिकाणी साठवून ठेवण्यात आले आहे. वृक्षतोडीदरम्यान जंगलातील लहान वनस्पती, वनौषधी तसेच स्थानिक आदिवासींसाठी उत्पन्नाचे साधन ठरणाऱ्या करवंदाच्या जाळ्यांचेही मोठे नुकसान झाले आहे.

#### वन विभागाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह

कर्जत तालुक्यातील विविध भागांमध्ये सुरू असलेल्या वृक्षतोड आणि जमीन सपाटीकरणाच्या कामांबाबत वन विभागाची भूमिका चर्चेचा विषय ठरत आहे. स्थानिकांच्या मते, अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर झाडे तोडली जात असतानाही त्यावर प्रभावी नियंत्रण दिसून येत नाही. परिणामी, नियमबाह्य वृक्षतोड आणि जमीन विकासकामांना चालना मिळत असल्याचा आरोप होत आहे. या पार्श्वभूमीवर वन विभागाने अधिक पारदर्शकपणे कामकाज करून सुरू असलेल्या कामांची तपासणी करावी आणि नियमांचे उल्लंघन आढळल्यास योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

परिणामी, या भागातील जैवविविधता आणि वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासावर विपरीत परिणाम होत असल्याचे पर्यावरणप्रेमींचे मत आहे.

विकासकामांसाठी आवश्यक परवानग्या घेतल्याचा दावा संबंधितांकडून केला जात असला, तरी परवानगीच्या मर्यादेपलीकडे वृक्षतोड होत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. काही नागरिकांच्या मते, मर्यादित वृक्षतोडीची परवानगी घेऊन प्रत्यक्षात मोठ्या प्रमाणावर जंगल साफ केले जात आहे.

## स्व. मोहन धुमाळ गुरुजींच्या आठवणींना उजाळा

**शेकाप कार्यकर्ते, ग्रामस्थांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती**

**| भाकरवड | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील ग्रामपंचायत कुसुंबळे हद्दीतील चिखली गावचे रहिवासी, शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते स्व. मोहन कृष्णा धुमाळ (गुरुजी) यांच्या निधनानंतर त्यांच्या निवासस्थानी रविवारी (दि. ३१) सायंकाळी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली. शोकसभेची सुरुवात स्वानंद कोठेकर यांनी केली. उपस्थित मान्यवरांनी स्व. धुमाळ गुरुजी यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला.



● छायाचित्र : जीवन पाटील

स्व. मोहन धुमाळ गुरुजी यांनी शिक्षण क्षेत्रात अनेक विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले अनेक विद्यार्थी आज विविध उच्च पदांवर कार्यरत आहेत. शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते म्हणून त्यांनी आयुष्यभर जनतेच्या प्रश्नांसाठी संघर्ष केला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते हेमनाथ खरसांबळे यांनी सांगितले की, स्व. मोहन धुमाळ गुरुजी हे या विभागातील खरे 'किंगमेकर' होते. सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी ते शेकाप सरचिटणीस भाई जयंत पाटील आणि पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या माध्यमातून सदैव तत्पर राहिले. अनिल ठाकूर, कौशिक महाराज तसेच अन्य वक्त्यांनीही गुरुजींच्या सामाजिक, आध्यात्मिक, शैक्षणिक, राजकीय आणि क्रीडा क्षेत्रातील योगदानाचा गौरव केला. या शोकसभेस शेतकरी कामगार पक्षाचे अलिबाग तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे, विलास म्हात्रे, अमृत पाटील, स्वानंद कोठेकर, बाळकृष्ण पाटील, हेमनाथ खरसांबळे, सतीश तरे, जीवन निळकर, कौशिक पाटील, अनिल ठाकूर, राजन पाटील, विकास पाटील, निलेश चवरकर, दिगंबर म्हात्रे, आप्पा दांडेकर, चारुशीला धुमाळ यांच्यासह धुमाळ गुरुजींचे कुटुंबीय, शेकापचे कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एम.के. पाटील यांनी केले.

### पोलिसांच्या तत्परतेने प्रवाशाला जीवदान

**| पनवेल | प्रतिनिधी |**

मुंबई (परेल) येथून तुळजापूरकडे जाणाऱ्या एसटी बसमधील एका ४५ वर्षीय प्रवाशाला पनवेलमधील शिवशंभू नाका सिग्नलजवळ अचानक फिट आल्याने तो बसमध्येच कोसळला. त्याच्या तोंडातून रक्तस्त्राव सुरू झाल्याचे लक्षात येताच एसटी कंडक्टरने तातडीने वाहतूक पोलिसांना माहिती दिली.

पोलीस अंमलदार अमीर मुलाणी व पोलीस शिपाई सुरेश जौजाळ यांनी तत्परता दाखवत संबंधित प्रवाशाला बसमधून सुरक्षित बाहेर काढले.

## दौलतगडाच्या पुनरुज्जीवनासाठी दुर्गसेवकांचा एल्गार

**| महाड | प्रतिनिधी |**

स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगडाच्या परिसरातील ऐतिहासिक दौलतगडाला पुन्हा गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी दुर्गप्रेमी आणि शिवभक्त मोठ्या उत्साहाने पुढे सरसावले आहेत. अनेक वर्षांच्या दुर्लक्षामुळे पडझडीच्या अवस्थेत पोहोचलेल्या या गडाच्या संवर्धनासाठी दौलतगड प्रतिष्ठान, दासगाव आणि रॉयल रायगडकर प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने १ ते ३० मेदरम्यान श्रमदान मोहीम राबविण्यात आली.



कडाक्याच्या उन्हाची पर्वा न करता शेकडो दुर्गसेवकांनी 'हर हर महादेव'च्या जयघोषात गडावरील ऐतिहासिक वास्तूंच्या जतन आणि पुनरुज्जीवनासाठी अहोरात्र मेहनत घेतली. मनुष्यबळ मर्यादित आणि काम अत्यंत जिकिरीचे असतानाही स्वयंसेवकांनी गड संवर्धनाचे काम यशस्वीरित्या पूर्ण केले. दोन टप्प्यांत झालेल्या या मोहिमेत दुर्गसेवकांनी गडावरील मुख्य चौथऱ्याची दुरुस्ती केली. तसेच प्राचीन तलावात साचलेला गाळ काढून पाण्याचे स्रोत मोकळे करण्याचे महत्त्वाचे कामही श्रमदानातून पूर्ण करण्यात आले. शासनानेही दौलतगडाच्या संवर्धनासाठी पुढाकार घेऊन उपाययोजना कराव्यात, अशी मागणी दौलतगड प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष निलेश निवाते यांनी केली आहे.

## उरणमध्ये मान्सूनपूर्व नालेसफाई ८५ टक्केच

**यंदाही रस्ते पाणी साचून पाण्याखाली जाण्याची भीती**

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

उरण नगरपालिकेने लवकरच मान्सून पूर्व नाले सफाईला यावेळी प्राधान्य देऊन लवकरच सुरुवात केल्याने शहरातील मुख्य नाल्यांच्या सफाईचे काम हे मेअखेरपर्यंत ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे.

दरवर्षी उरण नगरपालिकेकडून पावसाळ्यापूर्वी नालेसफाईचे काम केले जाते. दरवर्षी शहरातील मान्सूनपूर्व नालेसफाईची कामे करण्यासाठी १६ लाख खर्चाची तरतूद केली जाते.शहरातील दादर, कुंभारवाडा, कामठा, भिवंडीवाला गार्डन, बोरीपाखाडी आदी मुख्य नाले आणि सात आठ छोटे नाले साफसफाई करण्याच्या कामाला



> याबाबत सिडको व नागाव ग्रामपंचायतीकडे अनेकदा तक्रारीही केल्या आहेत. शहरातील नालेसफाईचे काम ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे. हे काम जूनअखेरपर्यंत पूर्ण होणार आहे.
>
> – निखिल ढोरे, उनपचे रचनाकार

दरवर्षी पावसाळ्यापूर्वीच सुरूवात केली जाते. यावर्षीही नालेसफाईच्या कामांना मे महिन्यांपासून सुरूवात करण्यात आली आहे. त्यामुळे नालेसफाईची कामे येत्या पावसाळ्यापूर्वीच पूर्ण होतील, अशी अपेक्षा शहरवासियांकडून व्यक्त केली जात आहे.

उनपचा मागील काही वर्षातील कामकाज पाहिले तर मान्सूनपूर्व नालेसफाईचा ठेका सत्ताधारी गटाचे नगरसेवक, पदाधिकारी यांच्या मर्जीत असलेल्या निकटवर्तीय कार्यकर्त्यांनाच दिले जात असल्याची ओरड नेहमीच होत असते. या कामामुळे सत्ताधारी गटाच्या नगरसेवक पदाधिकाऱ्यांची आर्थिक सोय होत असली तरी नालेसफाईची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची होतात.

## खोपोलीत केएमसी कॉलेजच्या संकेतस्थळाचे उद्घाटन

**डिजिटल शिक्षणाकडे महत्त्वपूर्ण पाऊल**



**| खोपोली | प्रतिनिधी |**

शैक्षणिक क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाची प्रभावी सांगड घालत विद्यार्थी, पालक, प्राध्यापक, प्रशासन आणि समाज यांच्यात अधिक सुसंवाद व पारदर्शकता निर्माण करण्याच्या उद्देशाने खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित केएमसी कॉलेजच्या अधिकृत संकेतस्थळाचे उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात झाले.

के.जी.पासून पीएच.डी. पर्यंत शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या केएमसी कॉलेजसाठी हे संकेतस्थळ महत्त्वपूर्ण डिजिटल व्यासपीठ ठरणार आहे. प्रवेश प्रक्रिया, शैक्षणिक अभ्यासक्रम, विविध विभागांची माहिती, निकाल, उपक्रम, सूचना तसेच संस्थेच्या कार्याचा आढावा विद्यार्थ्यांना आणि पालकांना एका क्लिकवर उपलब्ध होणार आहे. खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यवाह किशोर पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात खोपोली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्या अध्यक्षतेखाली आणि संस्थेचे अध्यक्ष संतोष जंगम यांच्या हस्ते संकेतस्थळाचे उद्घाटन करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात सचिन हिरे यांनी सक्षम शिक्षणसंस्था ही समाजाच्या सर्वांगीण विकासाची मूलभूत गरज असल्याचे सांगितले.

कार्यवाह किशोर पाटील यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त अशा शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण उपक्रमाचा शुभारंभ होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. मकरंद वझल यांनी संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेत डिजिटल युगात शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याची गरज अधोरेखित केली.

केएमसी कॉलेजच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास संचालक मंडळाचे दिलीप पोरवाल, जितेश ठक्कर, भास्कर लांडगे, बी.एल. पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य प्रशांत माने, चिंतामण सोनवणे, मनीष खवळे, प्रशांत गोपाळे, संदीप ओव्हाळ, गुरुनाथ साठेलकर, जयंत पाठक, प्राध्यापक वर्ग, कर्मचारी तसेच हितचिंतक उपस्थित होते.

**अडचणी आणि थकवा झुगारून राष्ट्रीय कर्तव्याला प्राधान्य | ४२ अंश तापमानात शिक्षकांची घरोघरी पायपीट**

# उन्हाच्या झळांतही जनगणनेची धडपड

**धम्मशील सावंत**

**| पाली/बेणसे |**

राज्यभर उष्णतेची तीव्र लाट उसळलेली असताना आणि दुपारच्या कडक उन्हात सामान्य नागरिक घराबाहेर पडणे टाळत असताना, शिक्षक मात्र ४० ते ४२ अंश सेल्सिअस तापमानात जनगणनेचे राष्ट्रीय कर्तव्य बजावण्यासाठी गावागावांत, वाड्या-वस्त्यांवर आणि डोंगरदऱ्यांत पायपीट करत आहेत. उन्हाच्या झळा, डिहायड्रेशनचा धोका, नागरिकांची उदासीनता आणि प्रतिकूल परिस्थितीचा सामना करत हे शिक्षक जनगणना मोहिमेत अविरतपणे कार्यरत आहेत.



अल-नीनोच्या प्रभावामुळे यंदाचा उन्हाळा अधिक तीव्र झाला असून, उष्णतेच्या लाटांचे इशारे सातत्याने दिले जात आहेत. अशा परिस्थितीत शिक्षक डोक्यावर टोपी, हातात मोबाईल व आवश्यक कागदपत्रे घेऊन घराघरांत जाऊन माहिती संकलित करत आहेत. दिवसाचे उद्दिष्ट पूर्ण केल्याशिवाय परतायचे नाही, या जिद्दीने ते काम करत असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. रायगड जिल्ह्यातील दुर्गम भाग, डोंगरदऱ्या आणि आदिवासी वाड्या-पाड्यांमध्ये जनगणनेचे काम करताना शिक्षकांची खरी कसोटी लागत आहे. वाहतुकीची साधने नसलेल्या भागांत अनेक किलोमीटर पायी चालत जावे लागते. तीव्र चढ-उतार आणि उन्हाच्या झळांमुळे शारीरिक थकवा जाणवत असला तरी कर्तव्यभावनेपुढे या अडचणी दुय्यम ठरत आहेत.

> उन्हात फिरताना शारीरिक त्रास होतो आणि काही लोकांच्या नकारात्मक वागणुकीमुळे मन खिन्नही होते. मात्र, या सर्व अनुभवांच्या पलीकडे जाऊन विचार केला, तर भारत सरकारने आमच्यावर जनगणनेसारख्या महत्त्वाच्या राष्ट्रीय कार्याची जबाबदारी सोपवली, याचा अभिमान वाटतो. शासनाचा प्रतिनिधी म्हणून ही जबाबदारी पार पाडताना समाधान मिळते.
>
> **– गोरख आघाव, प्रगणक, सुधागड**

जनगणनेदरम्यान शिक्षकांना अनेक कटू अनुभवांनाही सामोरे जावे लागत आहे. अनेक घरे कुलूपबंद असल्याने त्याच परिसरात वारंवार फेऱ्या माराव्या लागतात. काही ठिकाणी कुत्र्यांचा त्रास सहन करावा लागतो. काहीजण शिक्षकांना विक्री प्रतिनिधी समजून तुच्छतेची वागणूक देतात, तर काही ठिकाणी त्यांना साधे पिण्याचे पाणीही विचारले जात नाही. अशा प्रतिकूल सामाजिक आणि मानसिक वातावरणातही शिक्षक संयम, शिस्त आणि हसतमुखाने आपले काम पार पाडत आहेत.

# मृदुल स्वरांची वीणा

हिंदी-मराठी चित्रपटसृष्टी आणि मराठी भावसंगीताचा सुवर्णकाळ पाहिलेले आणि गाजवलेले एकेक तारे आता अस्तंगत होऊ लागले आहेत. रफी आणि किशोर तर कधीच गेले. दोन वर्षांपूर्वी लता गेली. अलिकडेच आशा भोसले गेल्या आणि आता सुमन कल्याणपूर याही काळाच्या पडद्याआड गेल्या. मृदुल करांनी छेडित तारा असे त्यांचे एक गाजलेले गाणे आहे. त्या धर्तीवर त्यांच्या गायकीचे वर्णन मृदुल स्वरांची वीणा असे करता येईल. प्राजक्ताच्या फुलाप्रमाणे नाजूक, हलका सुगंध असणारा पण अतिशय प्रसन्न करणारा असा त्यांचा आवाज होता. समईच्या मंद प्रकाशासारखे शांत शीतल तेज त्यात होते. गरजेनुरुप सुमनताईंनी नटखट, उडत्या चालीची किंवा थोडी रंगेल म्हणता येतील अशी गाणीही गायिली. आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे किंवा ये सावन का महिना शराबी शराबी ही त्याची उदाहरणे होत. पण शांत लय, धीमा भाव आणि हलकेच व्यक्त होणारी भावना व्यक्त करणे हे त्यांच्या आवाजाचे खरे सामर्थ्य होते. त्यामुळेच या जातकुळीची त्यांची असंख्य मराठी भावगीते विशेष गाजली. त्यांचा आवाज लता मंगेशकर यांच्याशी साम्य वाटावा असा होता. पण त्यांनी कधीही प्रतिलता किंवा अतिलता होण्याचा प्रयत्न केला नाही. कारण आपल्या आवाजाच्या मर्यादा आणि सामर्थ्येही त्यांना ठाऊक असावीत. लतासारखा आवाज या तुलनेचा त्यांना आयुष्यभर त्रास झाला. त्याचा फायदा होण्यापेक्षा तोटाच अधिक झाला. १९५० आणि ६० च्या दशकात हिंदी चित्रसंगीताचे सुवर्णयुग होते. त्यावेळी लता ही चित्रपटसृष्टीची अनभिषिक्त सम्राज्ञी होती. त्यामुळे जे निर्माते व संगीतकार लता यांना घेऊ शकत नव्हते वा वेळेअभावी जिथे लता उपलब्ध होऊ शकत नव्हत्या तिथे सुमन कल्याणपूर यांचा पर्याय वापरला गेला. यात नौशाद, शंकर जयकिशन, एसडी बर्मन, रोशन, हेमंतकुमार, मदन मोहन अशा दिग्गज संगीतकारांचा समावेश होता. त्या सर्वांकडे सुमनताई गायल्या व त्यांची गाणीही गाजली. रफींसोबत त्यांची युगुलगीते विशेष लोकप्रिय ठरली. ठहरिए होश मे आ लूं, तुमने पुकारा और हम चले आये, ना ना करते प्यार, अजहून आये बालमां अशी विविध प्रसंगांच्या व विविध छटांच्या गाण्यांचा त्यात समावेश होता. हेमंतकुमार यांच्यासोबतचे ना तुम हमे जानो किंवा मुकेश यांच्यासोबतचे मेरा प्यार भी तू है हेही बहारदार आहे. यातल्या अनेक गाण्यांमध्ये त्यांचा आवाज इतका लतासारखा आहे की सामान्य व विशेष कानसेन नसलेल्या रसिकांची फसगत व्हावी.

## लताबाईंशी तुलना

लता मंगेशकर यांच्या आवाजाचा पल्लाच इतका जबरदस्त होता की, आशा भोसले यांनाही कामासाठी झगडावे लागले. गीता दत्त, शमशाद बेगम वगैरेंना नंतर फारसे काम मिळाले नाही. सुमनताईंबाबतही हाच प्रकार झाला. यात लता यांनी जाणीवपूर्वक अन्याय केला किंवा मुद्दाम गळचेपी केली असे म्हणणारे म्हणोत. पण खुद्द सुमनताईंनी असे कधीही म्हटले नाही. त्यांच्या आत्मचरित्रामध्येही त्यांनी अत्यंत संयतपणे याबाबतचे मुद्दे हाताळले आहेत. ए मेरे वतन के लोगों हे गाणे मुळात सुमनताईच गाणार होत्या. सी रामचंद्रांसोबत त्यांनी तालमीही केल्या होत्या. पण ऐन वेळी ते लताबाईंकडे गेले. मात्र सुमनताईंनी याचा दोष त्यांना दिलेला नाही. उलट नंतरच्या काळात लता यांच्याशी आपले अत्यंत चांगले संबंध आहेत हे त्या आवर्जून सांगत. लता यांनी निर्मिती केलेला लेकिन हा सिनेमा प्रदर्शित झाला तेव्हा त्याच्या प्रीमियर शोला येण्यासाठी लताबाईंनी सुमनताईंना मुद्दाम निमंत्रित केले होते हे त्या आवर्जून सांगत. हाच त्यांचा संयमी शांतपणा त्यांच्या आवाजात उतरला होता. तो प्रकट करणारी गाणी त्यांना भावसंगीतकारांनी दिली व मराठी रसिकांनीही ती डोक्यावर घेतली. सुमनताईंच्या कलेला खरी दाद तिथे मिळाली व त्याचे चीज झाले. केतकीच्या बनी तिथे, नाविका रे वारा वाहे रे, झिमझिम झरती सावनधारा अशा गीतांनी त्यांनी मराठी मध्यमवर्गाचे भावजीवन समृध्द करून टाकले. विरहाची, आर्त प्रेमाची, असोशी व्यक्त करणारी असंख्य गीतेही त्यांच्या आवाजात खुलून गेली. शब्द शब्द जपून ठेव किंवा तुला ते आठवेल का सारे या दोन गीतांचा उल्लेख त्यासाठी पुरेसा आहे.

## वाट इथे स्वप्नातील संपली जणू

मराठी चित्रगीतांमध्येही त्यांची मोजकीच पण अनेक गाजलेली गाणी आहेत. जिथे सागरा धरणी मिळते या गाण्याने किती लग्नोत्सुक किंवा प्रेमात पडलेल्या तरुणींच्या भावनांना आवाज दिला असेल याची गणतीच नाही. संसारातल्या व्यापतापामध्ये अडकलेल्या गृहिणींचा भावही त्यांनी व्यक्त केला. लिंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला ग बाई हे त्यांचे पाळणागीत अनेक परभाषी लोकांनाही ठाऊक असते. मानिनी या महादेवशास्त्री जोशींच्या कथेवरचा गाजलेला चित्रपट संगीतासाठीही गाजला. विशेष म्हणजे एरवी लावणी आणि तमाशाच्या संगीतासाठी प्रसिध्द असणारे वसंत पवार यांनी त्याला चाली दिल्या आणि सुमनताईंचा आवाज वापरला. त्यातील अरे संसार संसार, अरे खोप्यामध्ये खोपा ही गाणी गाजली. पण आपला पिता दक्ष राजाने शंकराचा अपमान केल्यावर पेटून उठलेल्या पार्वतीची संतप्त भावना व्यक्त करणारे उमा म्हणे यज्ञी माझे जळाले माहेर या गाण्यातला अपमानित स्वर सुमनताईंनी ज्या रीतीने पकडला आहे त्याला तोड नव्हती. आजही कोणी ऐकले तर अंगावर रोमांच आणि डोळ्यात पाणी येईल असे हे गीत आहे. घाल घाल पिंगा वाऱ्या ही कृ. ब. निकुंब यांची कविता शाळेच्या पुस्तकात बरीच वर्षे होती. पण तिला कमलाकर भागवतांनी लावलेली चाल सुमनताईंनी अफलातून रीतीने जिवंत केली आहे. या गाण्यात वाद्यांचा वापर अत्यंत कमी आहे. गाणेही भराभर पुढे सरकते. पण आधी एका शांत स्वरात चाललेले गाणे नंतर जेव्हा, फिरून फिरून सय येई, जीव वेडावतो, चंद्रकळेचा गं शेव ओलाचिंब होतो हा भाव एकाएकी वरच्या पट्टीत जाऊन एक वेगळीच सल व्यक्त करतो आणि सगळ्या माहेरवाशिणींना भिजवून टाकतो. आकाश पांघरूनी जग शांत झोपलेले यातला शांत भाव हा तर सुमनताईंच्या आवाजाचाच भाव होता. त्यातला एकतारी घेऊन एकटाच दोहे गाणारा कबीर हा त्यांच्या प्रकृतीला साजेसाच होता. त्यामुळेच सुमनताईंनी गायिलेली भक्तिगीते प्रचंड गाजली. केशवा माधवा हे तर मराठीतले सर्वाधिक लोकप्रिय भक्तिगीतांमधले पहिल्या पाचातले असावे. सावळ्या विठ्ठला तुझ्या दारी आले हे त्यांचे गाणे जवळपास ७५ वर्षांपूर्वीचे आहे. ते आजही तितकेच रिझवते. ओमकार प्रधान रुप गणेशाचे किंवा चल उठ रे मुकुंदा ही आजही लोकप्रिय आहेत. समाधी घेऊन जाई ज्ञानदेव हे त्यांचे गीत ज्ञानेश्वरांच्या समाधी घेण्याचे जबरदस्त वर्णन करते आणि हा अपूर्व सोहळा आपल्या डोळ्यापुढे उभे करते. वाट इथे स्वप्नातील संपली जणू असे म्हणायला लावणारी अनेक गाणी त्यांनी मराठी रसिकांना दिली. आज ती वाट खरोखरच संपली. सुमनताईंना कृषीवल परिवाराच्या वतीने हार्दिक श्रध्दांजली.

**विचार**

# नव्या मध्यपूर्वेची निर्मिती?

***मध्यपूर्वेतील संघर्षांचा इतिहास पाहिल्यास या प्रदेशात युद्धे केवळ सीमांसाठी होत नाहीत, तर धर्म, इतिहास, अस्तित्व आणि सामर्थ्य यांच्या संघर्षातून जन्म घेतात, असे दिसते. आज 'ग्रेटर इस्त्रायल' या संकल्पनेभोवती सुरू असलेली चर्चादेखील याच व्यापक संदर्भात समजून घ्यावी लागते. कारण हा प्रश्न फक्त इस्त्रायलने किती जमीन ताब्यात घेतली यापुरता मर्यादित नसून संपूर्ण मध्यपूर्वेच्या राजकीय पुनर्रचनेशी जोडलेला आहे.***

प्रा. जयसिंग यादव

'हमास'ने ७ ऑक्टोबर २०२३ रोजी केलेल्या हल्ल्यानंतर इस्त्रायलने दिलेल्या प्रत्युत्तराने जगासाठी दोन गोष्टी स्पष्ट केल्या. पहिली म्हणजे इस्रायल आता 'प्रतिकारात्मक संरक्षण' या जुन्या चौकटीत विचार करत नाही आणि दुसरी म्हणजे इस्रायलने स्वतःच्या सुरक्षिततेची व्याख्याच बदलली आहे. आता त्यांच्यासाठी सीमा म्हणजे फक्त नकाशावरील रेषा राहिलेल्या नाहीत, तर संभाव्य धोक्यांपासून दूर ठेवलेले विस्तृत प्रभावक्षेत्र बनले आहे. ही मानसिकता अचानक निर्माण झालेली नाही. तिची मुळे इस्रायलच्या स्थापनेपासूनच्या इतिहासात आहेत. १९४८ मध्ये इस्रायलची स्थापना झाली आणि त्याच क्षणी अरब-इस्रायल संघर्षाची सुरुवात झाली. त्यानंतर १९६७ मधील सहा दिवसांचे युद्ध, १९७३ चे योम किप्पूर युद्ध, लेबनॉनमधील संघर्ष, पॅलेस्टिनी उठाव या सर्व घटनांनी इस्रायलच्या राष्ट्रीय मानसावर एक खोल परिणाम केला. 'आपण वेढलेलो आहोत' ही भावना इस्रायली समाजाच्या राजकीय विचारधारेचा केंद्रबिंदू बनली. याच भावनेतून 'सुरक्षा' हा शब्द इस्रायलमध्ये अत्यंत व्यापक अर्थाने वापरला जातो. इतर देशांसाठी सुरक्षा म्हणजे सीमांचे रक्षण; पण इस्रायलसाठी सुरक्षा म्हणजे संभाव्य शत्रूंची क्षमता नष्ट करणे. म्हणूनच गाझातील 'हमास' असो, लेबनॉनमधील 'हिज्बुल्लाह' असो किंवा सीरियातील इराणसमर्थित गट; इस्रायल या फक्त शेजारील शक्ती मानत नाही, तर भविष्यातील अस्तित्वाला धोका मानतो. या पार्श्वभूमीवर 'ग्रेटर इस्त्रायल'कडे पाहिले, तर त्यामागे केवळ धार्मिक राष्ट्रवाद नाही, तर सुरक्षा, लोकसंख्या, पाणी, व्यापारमार्ग आणि भू-राजकीय प्रभाव यांचेही गणित आहे.

तपशिलात जाऊन पाहता, दक्षिण लेबनॉनमधील लितानी नदीचा परिसर हा केवळ लष्करीदृष्ट्या महत्त्वाचा नाही, तर जलस्रोतांच्या दृष्टीनेही संवेदनशील भाग आहे. गोलन टेकड्यांचे महत्त्वही असेच आहे. इस्रायलने १९६७ मध्ये सीरियाकडून गोलन टेकड्या ताब्यात घेतल्या आणि आजही त्या भागावर नियंत्रण कायम ठेवले आहे. कारण त्या उंच भागातून संपूर्ण उत्तरेकडील इस्रायलवर नियंत्रण ठेवता येते. म्हणजेच 'ग्रेटर इस्त्रायल' ही कल्पना केवळ धार्मिक स्वप्न नाही, तर आधुनिक भू-राजकारणाच्या गणिताशी जोडलेली आहे आणि म्हणूनच ती अधिक धोकादायक ठरते. आज इस्रायलमध्ये दोन प्रवाह स्पष्ट दिसतात. एक प्रवाह असा आहे, की पॅलेस्टिनी प्रश्नाचे कायमस्वरूपी समाधान दोन स्वतंत्र राष्ट्रांच्या निर्मितीत आहे, तर दुसरा, अधिक आक्रमक प्रवाह मानतो, की पॅलेस्टिनी राष्ट्राची कल्पनाच इस्रायलच्या सुरक्षेसाठी धोकादायक आहे. पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या नेतृत्वाखालील सरकारवर दुसऱ्या प्रवाहाचा प्रभाव अधिक असल्याचे मानले जाते. वेस्ट बँकमध्ये वाढणाऱ्या ज्यू वसाहती हा त्याचाच भाग आहे. आंतरराष्ट्रीय समुदाय अनेक वर्षांपासून या वसाहतींना बेकायदेशीर मानतो; पण प्रत्यक्षात इस्रायलने त्या विस्तारण्याचे धोरण थांबवलेले नाही. रस्ते, सुरक्षा तळ, पायाभूत सुविधा आणि सैन्य संरक्षणाच्या माध्यमातून वेस्ट बँक हळूहळू इस्रायली प्रभावक्षेत्रात खोलवर समाविष्ट होत आहे. यामुळे इस्रायल प्रत्यक्षात 'दोन राष्ट्र समाधान' संपवण्याच्या दिशेने जात आहे का, असा प्रश्न पडतो. असे झाल्यास होणारे परिणाम अत्यंत दूरगामी असतील. कारण स्वतंत्र पॅलेस्टिनी राष्ट्राची आशा संपल्यास पॅलेस्टिनी समाजात कट्टरतेला बळ मिळू शकते.

आज आधीच गाझातील युद्धामुळे नव्या पिढीत संताप आणि असुरक्षितता वाढली आहे. उद्ध्वस्त घरे, विस्थापन, बेरोजगारी आणि सततचे युद्ध या परिस्थितीत शांततावादी विचार कमकुवत होतात आणि अतिरेकी संघटनांना समर्थन वाढते. याचा दुसरा परिणाम अरब जगतात दिसू शकतो. काही वर्षांपूर्वी अब्राहम करारांमुळे इस्रायल आणि काही अरब राष्ट्रांमधील संबंध सुधारू लागले होते. संयुक्त अरब अमिराती, बहरीन, मोरोक्को यांनी इस्रायलशी संबंध प्रस्थापित केले. सौदी अरेबियासोबतही संवाद सुरू होता; पण गाझामधील युद्धानंतर ही संपूर्ण प्रक्रियाच धोक्यात आली. कारण अरब देशांच्या सरकारांना एकीकडे अमेरिकेशी आणि इस्रायलशी संबंध टिकवायचे आहेत, तर दुसरीकडे त्यांच्या जनतेमध्ये पॅलेस्टिनी समर्थनाच्या भावना आहेत. त्यामुळे 'ग्रेटर इस्त्रायल'ची भीती वाढली, तर अरब सरकारांवर अंतर्गत दबावही वाढू शकतो. या संपूर्ण घडामोडीत आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे इराण. इराण स्वतःला पॅलेस्टिनी प्रश्नाचा सर्वात मोठा समर्थक म्हणून सादर करतो. 'हिज्बुल्लाह', 'हमास' आणि इतर शिया-सुन्नी गटांना मिळणारा त्यांचा पाठिंबा हा केवळ धार्मिक नाही, तर इस्रायलविरोधी प्रादेशिक रणनीतीचा भाग आहे. इस्रायलने शेजारील भागांमध्ये कायमस्वरूपी प्रभाव वाढवल्यास इराण अधिक आक्रमक प्रतिसाद देऊ शकतो. त्यामुळे मध्यपूर्वेत थेट प्रादेशिक युद्धाचा धोका वाढतो.

'ग्रेटर इस्त्रायल' या चर्चेचा एक मानवी पैलूही आहे, जो अनेकदा दुर्लक्षित राहतो. युद्धाच्या नकाशांमध्ये दिसणारे भूभाग हे प्रत्यक्षात लाखो लोकांचे जीवन असते. गाझामधील उद्ध्वस्त शहरे, लेबनॉनमधील विस्थापित कुटुंबे, सीरियातील अस्थिरता या सगळ्यांच्या केंद्रस्थानी सामान्य नागरिक आहेत. प्रत्येक लष्करी कारवाई नवीन जखमा निर्माण करते आणि त्या जखमा पुढच्या संघर्षांचे कारण बनतात. इतिहास सांगतो, की लष्करी विजय कायमस्वरूपी राजकीय समाधान देत नाहीत. अमेरिकेने अफगाणिस्तान आणि इराकमध्ये हे अनुभवले. रशियाला युक्रेनमध्ये त्याचा अनुभव येत आहे आणि इस्रायललाही कदाचित हे वास्तव स्वीकारावे लागेल की केवळ शक्तीच्या आधारे दीर्घकालीन शांतता निर्माण होत नाही. या ठिकाणी आंतरराष्ट्रीय समुदायाची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. संयुक्त राष्ट्रसंघ, अमेरिका, युरोपीय देश आणि अरब राष्ट्रांनी केवळ तात्पुरत्या युद्धविरामांवर भर दिला, तर परिस्थिती पुन्हा पुन्हा भडकत राहील. खरे आव्हान म्हणजे असा राजकीय आराखडा तयार करणे, ज्यात इस्रायलची सुरक्षा आणि पॅलेस्टिनींचे स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टी एकत्र शक्य होतील; पण आजचे वास्तव पाहता, तो मार्ग अधिक कठीण होत चालला आहे. कारण दोन्ही बाजूंमध्ये अविश्वास प्रचंड वाढला आहे. इस्रायलला वाटते, की पॅलेस्टिनी गट त्यांचे अस्तित्वच नाकारतात, तर पॅलेस्टिनींना वाटते, की इस्रायल त्यांची भूमी आणि ओळख हळूहळू संपवत आहे. म्हणून 'ग्रेटर इस्त्रायल' हा केवळ एक राजकीय शब्द नाही. तर मध्यपूर्वेतील भविष्यातील संघर्ष, राष्ट्रवाद, धार्मिक ओळख, सामरिक विस्तार आणि मानवी वेदना यांचा गुंतागुंतीचा संगम आहे.

आज इस्रायल अंगिकारत असलेली दिशा त्या देशाला अल्पकालीन सुरक्षा देऊ शकते; पण दीर्घकालीन स्थैर्य मिळवून देईल का, हा खरा प्रश्न आहे. कारण शेवटी कोणतेही राष्ट्र फक्त भिंती, सीमा आणि सैन्य यांच्या आधारावर टिकत नाही. त्याला शेजाऱ्यांसोबत सहअस्तित्वाची राजकीय इच्छाशक्तीही लागते आणि मध्यपूर्वेत आज पहायला मिळणारी सर्वाधिक दुर्मिळ गोष्ट म्हणजे परस्पर विश्वास. 'ग्रेटर इस्त्रायल' म्हणजे नेमके काय, याबाबत अनेक व्याख्या आहेत. काही ज्यू राष्ट्रवादी गटांच्या मते, बायबलमध्ये वर्णन केलेल्या ऐतिहासिक भूमीपर्यंत इस्रायलचा प्रभाव आणि नियंत्रण वाढले पाहिजे. यात सध्याच्या इस्रायलव्यतिरिक्त वेस्ट बँक, गाझा, दक्षिण लेबनॉन, गोलन टेकड्या आणि काही अतिरेकी विचारांनुसार जॉर्डनपर्यंतचा भूभाग समाविष्ट होतो. अर्थात, इस्रायलचे अधिकृत धोरण म्हणून ही भूमिका स्पष्टपणे स्वीकारलेली नाही; पण गेल्या काही वर्षांमधील राजकीय वक्तव्ये, वाढते ज्यू वसाहतीकरण आणि शेजारी देशांमधील लष्करी हस्तक्षेप यामुळे या संकल्पनेला नव्याने बळ मिळताना दिसते. काही नेत्यांनी तर दक्षिण लेबनॉनमधील लितानी नदीपर्यंत इस्रायलची सुरक्षा सीमा असावी, अशी मागणी केली आहे. ही मागणी संरक्षणात्मक धोरणापुरती मर्यादित नाही, तर विस्तारवादी मानसिकतेकडे निर्देश करते. गाझामधील युद्धाने या चर्चेला सर्वाधिक खतपाणी घातले. गाझा पट्टीमध्ये इस्रायली सैन्याने मोठ्या प्रमाणावर हवाई आणि भूदल कारवाया केल्या. हजारो इमारती उद्ध्वस्त झाल्या, लाखो लोक विस्थापित झाले आणि संपूर्ण परिसर मानवी संकटाच्या विळख्यात सापडला.

संयुक्त राष्ट्रसंघासह अनेक आंतरराष्ट्रीय संस्थांनी परिस्थितीबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली; परंतु इस्रायलने 'राष्ट्रीय सुरक्षेचा प्रश्न' म्हणत या कारवायांचे समर्थन केले. या युद्धात इस्रायलने गाझाच्या सीमेलगत विस्तृत बफर झोन निर्माण केला. या कृतीमुळे इस्रायल केवळ 'हमास'चा नायनाट करू इच्छितो, की गाझाच्या भूगोलातच कायमस्वरूपी बदल घडवू पाहतो, असा प्रश्न निर्माण झाला. दक्षिण लेबनॉनमधील परिस्थितीही तितकीच गंभीर आहे. 'हिज्बुल्लाह' आणि इस्रायल यांच्यातील संघर्ष हा अनेक दशकांपासून सुरू आहे; मात्र २०२३ नंतर या संघर्षाची तीव्रता अधिक वाढली. इस्रायली सैन्याने सीमापार कारवाया वाढवल्या आणि अनेक किलोमीटर आतपर्यंत लष्करी उपस्थिती निर्माण केली. इस्रायल याला 'सुरक्षा पट्टा' म्हणत असला, तरी अरब देश आणि विश्लेषकांच्या मते हे दीर्घकालीन नियंत्रणाचे संकेत आहेत. सीरियामध्येही तिथल्या अस्थिरतेचा फायदा इस्रायल घेत असल्याचा आरोप होतो. बशहर-अल-आसाद यांच्या सरकारची पकड कमकुवत झाल्यानंतर इस्रायलने गोलान टेकड्यांपलीकडेही आपली कारवाई वाढवली. इस्रायलचा दावा असा, की इराणसमर्थित गट आणि शस्त्रसाठे रोखण्यासाठी हे आवश्यक आहे; परंतु 'सुरक्षा' या नावाखाली इस्रायल आपल्या प्रभावक्षेत्राचा विस्तार तर करत नाही ना, असा प्रश्न उपस्थित होतो. या सर्व घटनांमुळे 'ग्रेटर इस्त्रायल' ही संकल्पना आता केवळ कट्टर राष्ट्रवादी घोषणांपुरती राहिलेली नाही, तर प्रत्यक्ष धोरणात्मक शक्यता वाटू लागली आहे.

**(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)**

**चर्चा आजची**

# रोजगाराच्या वाटेवर बेकारी

प्रमोद जाधव

पोलीस, महसूल विभाग आणि जनता मधील मधला दुवा म्हणून पोलीस पाटील यांच्याकडे पाहिले जाते. मात्र याच पोलीस पाटील यांची एक हजार १२१ पदे शासनाकडून भरण्यात आली नाही. शिक्षण घेऊन लाखो तरुण आजही बेकारीच्या वाटेवर आहे. त्यामुळे शासनाने पोलिस पाटील यांची रिक्त पदे तात्काळ भरून रोजगाराच्या वाटेवर असलेली बेकारी कमी करण्यास हातभार लावावा, अशी प्रतिक्रीया जनमानसातून उमटत आहे.

अपुऱ्या मनुष्यबळामुळे पोलीस आणि महसूल प्रशासन थेट जनतेपर्यंत पोहचू शकत नाही. त्यामुळे पोलीस आणि महसूल विभागाच्या मदतीसाठी शासनाने पोलिस पाटील यांची नियुक्ती केली. पोलीस, महसूल आणि नागरिक यांच्यामधील महत्वाचा दुवा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रायगड जिल्ह्यातील पोलीस पाटील यांची एक हजार १२१ पदे रिक्त आहेत. त्यामुळे अकराशेहून अधिक गावे, पोलिस पाटील विना अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. रिक्त पदामुळे अतिरिक्त गावांचा भार कार्यरत पोलीस पाटील यांच्यावर पडत आहेत.

गाव वाड्या वस्त्यांमधील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ग्रामीण भागातील महत्वाचे पद म्हणून पोलीस पाटील यांच्याकडे पाहिले जाते. एखादी घटना घडल्यास तात्काळ पोलीस ठाण्यासह महसूल विभागाला माहिती देण्याचे काम पोलीस पाटील करतात. त्यामुळे नागरिक आणि प्रशासन यांच्यामधील मधला दुवा म्हणून पोलीस पाटील यांच्याकडे पाहिले जाते.

जिल्ह्यातील महसूली गावे दोन हजार ११८ आहेत. ग्रामीण भागाची लोकसंख्या १६ लाख ६४ हजारहून अधिक आहे. जिल्ह्यात ८६८ पोलीस पाटील कार्यरत आहेत. जिल्ह्यातील गावे, वाड्यांमधील कायदा व सुव्यवस्थेची माहिती देण्याचे तसेच महसूल प्रशासनाला मदत करण्याचे काम कार्यरत पोलीस पाटील यांच्या मार्फत केले जात आहे.गाव वाडयांमध्ये शांतता आणि कायदा व सुव्यवस्था राखणे. गुन्ह्यांची माहिती देणे. आपत्कालीन परिस्थितीत मदत करणे, निवडणुकीत मदत करणे. दरोडा, शांतता भंग किंवा इतर गुन्हेगारी कृत्यांपासून गावाला सुरक्षित ठेवणे. गैरवर्तन किंवा दुर्लक्षाच्या घटनांची माहिती पोहोचवणे, अशा अनेक प्रकारची कामे पोलीस पाटील करतात. ग्रामीण भागात शांतता राखण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा आहे. जिल्ह्यात एक हजार ९८९ पोलीस पाटील यांची पदे मंजूर आहेत. यापैकी एक हजार १२१ पदे रिक्त असल्याची माहिती समोर आली आहे. रिक्त पदे वेळेवर भरली नाहीत. त्याचा ताण कार्यरत पोलीस पाटील यांच्यावर पडला आहे. एका पोलीस पाटील यांच्याकडे दोन ते तीन गावांचा भार सोपविण्यात आले आहेत. त्यामुळे गावांतील गुन्हे व इतर माहिती पोलीस व प्रशासनाकडे पोहचविताना कार्यरत पोलीस पाटील यांना अडचण निर्माण होत आहे. काही पोलीस पाटील सेवानिवृत्त झाले.त्या जागी नवीन पोलीस पाटील भरले नाहीत. त्यामुळे बेरोजगारीचा प्रश्न गंभीर झाला आहे. जिल्ह्यात सात उपविभागीय कार्यालये आहेत. यामध्ये अलिबाग, कर्जत, माणगाव, रोहा, महाड या उपविभागीय कार्यालयाच्या अखत्यारित दीडशेहून अधिक पदे रिक्त आहेत. श्रीवर्धन, पनवेल या उपविभागीय कार्यालयाच्या अखत्यारित शंभरहून अधिक आणि पेण कार्यालयच्या अख्यत्यारित येणारी ९५ पोलीस पाटील यांची पदे रिक्त असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून प्राप्त झाली आहे.

रायगड जिल्ह्यातील पोलीस पाटील यांची रिक्त पदे भरण्यात यावी, यासाठी संघाच्या वतीने वारंवार पत्र व्यवहार करण्यात आला आहे. जिल्हा स्तरावरून पोलीस पाटील यांची माहिती मागविण्याचे काम देखील करण्यात आले आहे. परंतु अद्यापर्यंत पोलीस पाटील यांची रिक्त पदे भरली नाही. कार्यरत पोलीस पाटील यांच्यावर कामाचा ताण पडत आहे. त्यामुळे पोलीस पाटील यांची पदे तात्काळ भरण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे. वेळोवेळी भरती करण्याबाबत पोलीस पाटील संघाच्या माध्यमातून पत्रव्यवहार करण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यातील पोलीस पाटील यांची रिक्त पदे भरण्यासाठी प्रशासनाकडून कार्यवाही सुरु झाली होती. परंतू उपविभागीय अधिकारी यांच्याकडून या भरतीबाबत मार्गदर्शन मागविण्यात आली होती, अशी माहिती समोर आली आहे. त्यामुळे मार्गदर्शनाच्या विळख्यात सापडलेली पोलीस पाटील भरती अजूनही रखडलेली असल्याचे बोलले जात आहे. त्याबाबत पुढे अद्यापर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नसल्याची चर्चा आहे.

जिल्ह्यात असंख्य तरुण शिक्षण घेऊन आहेत. नोकरी मिळावी, यासाठी सरकारी कार्यालयात जाऊन चपला झिजवत आहे. मागील काही महिन्यापुर्वी पोलीस भरती झाली. या पोलीस भरतीमध्ये इंजिनिअर व इतर उच्च शिक्षण घेणाऱ्या तरुणांनी स्वतःला अजमावण्याचा प्रयत्न केला. हातात डिग्री असूनही नोकरी नसल्याने बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे. वेगवेगळ्या सरकारी कार्यालयात मनुष्यबळ पुरेसे नाहीत. अधिकारी व क्लार्कची कामे वेळेवर पुर्ण होत नाही. त्यामुळे वेगवेगळ्या सरकारी कार्यालयात आजही तुटपुंज्या मानधनावर कंत्राटी कर्मचारी मदतनीस म्हणून घेतात. परंतू कंत्राटी कर्मचारी भरण्यापेक्षा त्यांना सरकारी सेवेत घेतल्या रोजगाराचा प्रश्न कायमचा मार्गी लागणार आहेत. शासनाची कामेही अधिक गतीने होण्यास मदत होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पोलीस पाटील यांची तात्काळ पदे भरण्यात यावी अशी मागणी जनतेकडून केली जात आहे.

**लोकसंसद**

## चित्रपट संगीतातील एका सुवर्ण युगाचा अंत

आपल्या मंत्रमुग्ध करणाऱ्या गायकीने तब्बल सहा दशकांहून अधिक काळ रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणाऱ्या ज्येष्ठ पार्श्वगायिका सुमन कल्याणपूर यांच्या जाण्याने भारतीय सुगम आणि चित्रपट संगीतातील एका सुवर्ण युगाचा अंत झाला आहे. एकीकडे गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांचा अलौकिक दैवी स्वर आणि दुसरीकडे आशाताईंचा एक अष्टपैलू आणि विलक्षण जादुई स्वर अशा परिस्थितीत मंगेशकर भगिनींच्या त्या सुवर्णकाळात सुमन कल्याणपूर यांनी संगीताच्या दुनियेत स्वतःचे असे अढळ स्थान निर्माण केले. सुमन कल्याणपूर यांनी मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती, ओडिया यांसह अनेक प्रादेशिक भाषांमध्ये हजारो गाणी गायली. त्यांच्या आवाजातील मखमलीपणा हीच त्यांची खरी ताकद होती. केतकीच्या बनी तिथे नाचला ग 'मोर', 'रिमझिम झरती श्रावणधारा', 'नाविका रे वारा वाहे रे', 'अरे संसार संसार', 'निंबोणीच्या झाडामागे', 'नकळत सारे घडले' आणि 'केशवा माधवा' यांसारखी अनेक अजरामर गाणी आजही प्रत्येक मराठी रसिकांच्या कानी रुंजी घालत आहेत. मोहम्मद रफी यांच्यासोबत त्यांनी गायलेली 'आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे', 'ना ना करते प्यार तुम्ही से कर बैठे', 'तुमने पुकारा और हम चले आये' अशी अनेक द्वंद्वगीते आजही रसिकांच्या ओठांवर आहेत. संगीत क्षेत्रातील त्यांच्या या अद्वितीय कामगिरीची दखल घेत केंद्र सरकारने त्यांना २०२३ मध्ये 'पद्मभूषण' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने गौरविले. तसेच इतर अनेक सांगीतिक पुरस्कारांसह त्यांना महाराष्ट्र शासनाच्या 'गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार' सन्मानित करण्यात आले. भारताच्या या थोर गानकोकिळेला भावपूर्ण सुमनांजली!

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

**दिनविशेष**

# तेलंगणा राज्य निर्मिती दिन

तेलंगणा भारताचे २९ वे राज्य आहे. २ जून इ.स. २०१४ रोजी स्थापन झालेले हे राज्य पूर्वी आंध्र प्रदेशचा भाग होते. या प्रदेशाची प्राचीन नावे तेलिंगाण, तेलिंगा, त्रिलिंग अशी होती. तेलंगणा भौगोलिकदृष्ट्या मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर कर्नाटक यांच्या सीमांलगत आहे. तांदूळ हे मुख्य पीक असलेला हा प्रदेश गोदावरी खोऱ्यात असून हा भाग ऐतिहासिक काळात सातवाहन (इ.स.पू. २२१- इ.स. २१८), गोवळकोंड्याची कुतुबशाही (इ.स.१५२०-इ.स.१६८७) आणि हैदराबादचा निजाम (इ.स.१७२४-इ.स.१९४८) यांच्या सत्तेखाली राहिला. इ.स.च्या विसाव्या व एकविसाव्या शतकात साम्यवाद आणि नक्षल विचारप्रणालींचा लक्षणीय



प्रभाव या प्रदेशावर आढळतो. हैदराबाद मुक्तिसंग्रामानंतर इ.स. १९४८ साली हा भाग स्वतंत्र भारतीय संघराज्यात विलीन झाला. हैदराबाद ही तेलंगणाची राजधानी व सर्वात मोठे शहर आहे तर तेलगू ही प्रमुख भाषा आहे.

तेलंगणा हे वेगळे राज्य घोषित करण्यात यावे, यासाठी अनेक वर्षे तेलंगण राष्ट्रीय समितीने लढा चालवला होता. ९ डिसेंबर २००९ रोजी या प्रयत्नांना यश येऊन भारत सरकारने तेलंगणा हे वेगळे राज्य होणार असल्याचे जाहीर केले. तेलंगणा राज्याच्या स्थापनेसाठीचे विधेयक १५ व्या लोकसभेत १८ फेब्रुवारी २०१४ ला आणि राज्यसभा या वरिष्ठ सभागृहात २० फेब्रुवारी २०१४ ला संमत करण्यात आले आणि राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आले. तेलंगणा राज्यात पुढील जिल्हे आहेत : आदिलाबाद, करीमनगर, कामारेड्डी, कुमारम् भीम आसिफाबाद, खम्माम, जगतियाळ, जयशंकर भूपालपल्ली, जानगाव, जोगुलांबा गडवाल, नागरकुर्नूल, नारायणपेट, नालगोंडा, निजामाबाद, निर्मल, पेद्दापल्ली, भद्राद्रि कोठागुंडम, मंचरियाल, महबूबनगर, महबूबाबाद, मेडक जिल्हा।मेडक, मेडचल-मलकजगिरी, मुळुगू, यादाद्री भुवनगिरी रंगारेड्डी, राजन्ना सिरकिला, वनपर्थी, वरंगळ ग्रामीण, वरंगळ शहर, विकाराबाद, संगारेड्डी, सिद्दीपेट, सूर्यापेट, हैदराबाद. हैदराबाद शहर हे तेलंगणमधील सर्वात मोठे वाहतूक केंद्र आहे.

हैदराबाद आंतरराष्ट्रीय विमानतळ हा भारतामधील एक प्रमुख विमानतळ असून येथून देशातील सर्व मोठ्या शहरांसाठी तसेच अनेक आंतरराष्ट्रीय स्थानांसाठी थेट प्रवासी सेवा उपलब्ध आहे. भारतीय रेल्वेच्या दक्षिण मध्य रेल्वे क्षेत्राचे मुख्यालय सिकंदराबाद रेल्वे स्थानक येथे असून हैदराबाद रेल्वे स्थानक, वरंगळ रेल्वे स्थानक इत्यादी मोठी स्थानके देशातील इतर भागांसोबत जोडली गेली आहेत. तेलंगणा एक्स्प्रेस, सिकंदराबाद राजधानी एक्स्प्रेस इत्यादी जलद गाड्या हैदराबादला दिल्लीसोबत जोडतात.

तेलुगू भाषिकांचे राज्य असलेल्या आंध्र प्रदेशचे विभाजन करून तेलंगण राज्याच्या निर्मितीसाठी मोठ्या प्रमाणात आंदोलने करण्यात आले. त्यानंतर १४ जून २०१४ मध्ये तेलंगण राज्य अस्तित्वात आले. नव्या राज्यात झालेल्या निवडणुकीनंतर हैदराबाद राजधानीसह तब्बल दहा जिल्हे अस्तित्त्वात आले. या राज्यात तेलंगण राष्ट्र समितीचे के. चंद्रशेखर राव यांचे नवे सरकार सत्तेवर आले. केसीआर यांनी गेल्या दोन वर्षात राज्यात सरकार चालविताना सिंचनाच्या सोयी, पायाभूत सुविधा यावर भर देताना प्रत्येक तालुका आणि जिल्ह्याला भेट देण्यावर अधिक भर दिला. विकासाची गती वाढविण्यासाठी आणि जिल्हा प्रशासन प्रत्येक गावापर्यंत पोहोचण्यासाठी लहान जिल्ह्यांच्या निर्मितीचा के. चंद्रशेखर राव यांनी निर्णय घेतला.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२ जून

१)श्री.रामचंद्र केशव घरत, अलिबाग, २-५-१९३९
२) श्री.मुरली बिहारी राजभर मु.तळकर नगर, अलिबाग, २-५-१९४२
३)अनंत मुरलीधर पाटील चेंढरे, अलिबाग २-५-१९४७
४)श्री.पुरूषोत्तम श्रीनिवास प्रभु घरत आळी, २-५-१९४७
५)श्री.सुभाष विठ्ठल पानस्कर चेंढरे-अलिबाग, २-५-१९५२
६)श्रीम.सरोजबाला सुभाष पानस्कर चेंढरे-अलिबाग, २-५-१९५४
७)श्री.राजाराम कमलाकर भगत चेंढरे-अलिबाग, २-५-१९५५
८)श्रीम.अर्चना अशोक भेंडकर मु.थळबाजार, २-५-१९५५
९)श्री.शंकर नारायण पावशे नवेदर-नागाव, २-५-१९५४
१०)श्री.नरेंद्र कृष्णाजी नागवेकर अलिबाग, २-५-१९५४
११)श्री.मुरलीधर नारायण जोशी अलिबाग, २-५-१९५७
१२)श्री.अड्डीबाबू बैरी मारिडी मु.भाल, २-५-१९५७
१३)श्री.श्रीधर बाबू पावसकर रामनाथ, २-५-१९३७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**स्व. नवी फुलचंद मिस्त्री, कुरूळ, अलिबाग**

# कोकणातील धरणांनी गाठला तळ

## • शेकडो गावांत टँकरने पाणीपुरवठा • पाणीटंचाईमुळे नागरिक कासाविस

**| रायगड | प्रतिनिधी |**



गेल्या वर्षी मोसमी पावसाने दमदार हजेरी लावली. सुमारे पाच-सहा महिने सलग पाऊस झाला. नोव्हेंबरपर्यंत पडलेल्या पावसामुळे पाणीसाठ्यांना बळकटी मिळाली होती. अधिक पाऊस पडल्याने पाणी टंचाईच्या झळा कमी होतील, असे सांगितले जात होते. मात्र,उन्हाळा सुरु होताच कोकणात पाणीटंचाईच्या झळांनी नागरिकांना कासाविस केले आहे. कोकणातील पालघर, ठाणे, रायगड आणि सिंधुदुर्गमध्ये एकूण १७३ धरणांमध्ये मे अखेरपर्यंत फक्त ३३.९९ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे.

गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यात १.३४ टक्क्यांनी घट झाली आहे. मोसमी पावसाला अद्याप काही दिवस बाकी असल्याने कोकणात पाणीटंचाईच्या झळा आणखी वाढणार आहेत. कोकणात सर्वसाधारणपणे दरवर्षी अडीच हजार ते तीन हजार मिलीमीटर पाऊस पडतो.

कोकणातील पाचही जिल्ह्यांत अनेक भागांमध्ये महापूर येणे हे नेहमीचे चित्र आहे. काही वर्षांपूर्वी येथील महापूराच्या घटनांनी हाहाःकार माजविलेला होता. त्यामुळे येथे पावसाळ्यातील पाण्याची उपलब्धता कशी आहे, हे दिसून येते. मोसमी हंगामात पडणारे पावसाचे पाणी हे सह्याद्रीच्या पर्वतरांगांवरून वाहत थेट समुद्राला जाऊन मिळते. मात्र, पावसाळ्यात दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या उन्हाळा आला की कोरड्या पडतात. धरणांची पातळी झपाट्याने खाली येते.

त्यामुळे गाव, वाड्या वस्त्यांवर पिण्याच्या पाण्यासाठी वणवण सुरु होते. उन्हाळा सुरु झाला की कोकणातील पाण्याची समस्या गंभीर स्वरुप धारण करते. ही समस्या दरवर्षी असते.

मोठ्या प्रमाणात पाऊस पडूनही पाणीटंचाईमुळे कोकणातील शेकडो गावांत टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. येथील जलव्यवस्थापनाकडे झालेले दुर्लक्ष यामुळे ही समस्या कोकणवासियांच्या पाचवीला पुजलेली आहे, असे दिसते. कोकणात राज्याच्या जलसंपदा विभागाच्या अखत्यारित मोठी, मध्यम आणि लहान अशी तीन प्रकारची एकूण १७३ धरणे आहेत. या धरणांची एकूण पाणी साठवण क्षमता ३ हजार ८६७.६८ दशलक्ष घनमीटर आहे. जलसंपदा विभागाने ३१ मे २०२६ रोजी जाहीर केलेल्या अहवालानुसार मोठ्या ११ धरणांमध्ये ८४६.८ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा आहे.

### धरणांची पाणी पातळी

धामणी - २८.५७, कवडास व.ब.- ४४.३८, मध्य वैतरणा - २२.६५, डोलवहाळ बं.- ९४.४६, सिंधुदुर्ग : तिल्लारी - ३०.५५, ठाणे : बारवी- ३०.६४, भातसा- ३५.५८, निम्न चोंडे- ५७.१४, मोडकसागर- ५१.४६, तानसा- २५.४७, ऊर्ध्व घाटघर- ४६.५०.

# माहिती अधिकार कार्यकर्ता संघाची बैठक

**चिरनेर :** माहिती अधिकार कार्यकर्ता संघ, उरण तालुका सदस्यांची महत्त्वपूर्ण बैठक शनिवारी (दि.३०) मे रोजी संपन्न झाली. या बैठकीत संघाच्या पुढील कार्याची दिशा, नवीन कार्यकारिणी रचना, सामाजिक विषयांवरील कामकाज तसेच नवीन कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीत नवीन कार्यकारिणी संदर्भात चर्चा करून अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, संघटक, मीडिया प्रमुख अशी विविध पदे निश्चित करण्यात आली. संघाच्या कामकाजात शिस्त, जबाबदारी आणि प्रभावी समन्वय राहावा यासाठी पदनिहाय जबाबदाऱ्या निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

संघाच्या सदस्यांसाठी तसेच नवीन नोंदणीसाठी फॉर्म भरलेल्या कार्यकर्त्यांसाठी लवकरच एक विशेष माहिती अधिकार प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. उरण तालुक्यातील इच्छुक कार्यकर्ते, नागरिक तसेच नवीन नोंदणीसाठी फॉर्म भरलेले कार्यकर्ते यांनी अधिक माहितीसाठी सुनील जोशी ८२८६४४२०६७ व विश्वास पटवर्धन ८४५२०८५३३० यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संघातर्फे करण्यात आले आहे.

# बिबट्याचा थरार अखेर थांबला

**| ठाणे | प्रतिनिधी |**



वागळे इस्टेटमधील इंदिरानगर परिसरात गेल्या काही दिवसांपासून नागरिकांच्या चिंतेचा विषय ठरलेल्या बिबट्याचा अखेर वन विभागाने रविवारी थरारक बचाव करत ताबा घेतला. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीतील झाडीत लपून बसलेल्या जखमी नर बिबट्याला डार्टगनच्या सहाय्याने बेशुद्ध करून सुरक्षितरीत्या पकडण्यात आले. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला. मिळालेल्या माहितीनुसार, वागळे इस्टेटमधील इंदिरानगर परिसरात मे महिन्याच्या सुरुवातीपासूनच बिबट्याचा वावर असल्याचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले होते. त्यानंतर वन विभाग सतर्क झाला होता.

शनिवारी पुन्हा बिबट्याचे दर्शन झाल्याची माहिती मिळाल्यानंतर वन विभागाने रविवारी पहाटेपासून विशेष शोधमोहीम सुरू केली. बिबट्या दिसलेल्या ठिकाणापासून सुमारे ७० ते ८० मीटर अंतरावरील दाट झाडीत तो दबा धरून बसल्याचे वन अधिकाऱ्यांना आढळून आले. हा बिबट्या जखमी आणि अशक्त अवस्थेत असल्याने त्याला जाळ्यात पकडणे धोकादायक ठरू शकत होते. त्यामुळे संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या डॉ. विनया जंगले यांच्या देखरेखीखाली डार्ट मारून त्याला बेशुद्ध करण्यात आले. प्राथमिक तपासणीत हा नर बिबट्या अंदाजे चार ते पाच वर्षांचा असल्याचे समोर आले. याशिवाय अंगावर आणि शेपटीवर अनेक व्रण आहेत. जखमांमुळे तो अशक्त झाल्याचे वन अधिकाऱ्यांनी सांगितले.

# खांदेश्वर सरोवरात करकोच्यांचे थवे

**| पनवेल | प्रतिनिधी |**



खांदा वसाहत परिसरातील खांदेश्वर सरोवरावर गेल्या काही दिवसांपासून उघड्या चोचीच्या करकोच्यांचे थवे सकाळच्या वेळी उतरू लागल्याने नागरिकांचे लक्ष वेधले जात आहे. कडक उन्हामुळे सरोवरातील पाण्याची पातळी कमी होत असून उथळ पाण्यात मासे आणि इतर जलचर सहज उपलब्ध होत असल्याने हे पक्षी अन्नाच्या शोधात येथे दाखल होत आहेत.

पांढऱ्या-करड्या रंगाचे शरीर, लांब मान आणि लांब पाय असलेले हे करकोचे पाण्यात शांतपणे उभे राहून शिकार करताना पाहायला मिळत आहेत. सहसा गोगलगायी, शिंपले, मासे आणि इतर जलचरांवर उपजीविका करणारे हे पक्षी पर्यावरणीय संतुलन राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

सकाळच्या प्रसन्न वातावरणात सरोवरावर उतरलेला हा थवा निसर्गप्रेमी आणि छायाचित्रकारांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे. खांदा वसाहतीतील अनेक नागरिक सकाळी फेरफटका मारताना या दुर्मिळ पाहुण्यांचे दर्शन घेत आहेत. शहरातील वाढते नागरीकरण आणि कमी होत चाललेली जलसंपदा यामुळे अशा पक्ष्यांचे दर्शन दुर्मिळ होत असताना खांदेश्वर सरोवरात त्यांचे आगमन ही पर्यावरणासाठी सकारात्मक बाब मानली जात आहे.

नागरिकांना घराजवळच निसर्गाचा अनमोल ठेवा अनुभवण्याची संधी मिळाली असून या पक्ष्यांना कोणताही त्रास न देता त्यांच्या अधिवासाचे संरक्षण करण्याचे आवाहन पर्यावरणप्रेमींनी केले आहे. खांदेश्वर सरोवरातील करकोच्यांच्या या आगमनामुळे परिसरातील जैवविविधतेची समृद्धी पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. ओपनबिल स्टॉर्क हे पक्षी परदेशातून येणारे स्थलांतरित पक्षी नाहीत.

# किशोर बावदानेची पोलिसात निवड

**सुकेळी:** रोहा तालुक्यातील एका छोट्याशा खेडेगावातील सुकेळी ( धनगरवाडा) येथिल अत्यंत गरीब परिस्थितीवर व मेहनतीच्या जिद्दीवर मात करीत किशोर बावदाने याने मुंबई पोलीसमध्ये भरती होऊन आपल्या आई-वडीलांचे स्वप्न साकार केले आहे. त्याच्या या निवडीबद्दल कौतुकांचा वर्षाव होत आहे. त्याला अनेक वेळा अपयशाला सामोरे जावे लागले होते. परंतु त्याने हार न मानता यावेळी यश प्राप्त करीत मुंबई पोलिसमध्ये जाण्याचे स्वप्न साकार केले आहे.

# वरंध येथे सिमेंट बंधाऱ्यांचे लोकार्पण

**| महाड | प्रतिनिधी |**

महाड तालुक्यातील मौजे वरंध येथे वनराई संस्था, पुणे आणि सुदर्शन सी.एस.आर. फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या एकात्मिक पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत सिमेंट बंधारा कामाचे उद्घाटन व लोकार्पण समारंभ शुक्रवारी (दि.१५) मे रोजी पार पडला. कार्यक्रमास मंत्री भरत गोगावले, सुदर्शन कंपनीचे विवेक गर्ग, बी. एन. कदम, तालुका कृषी अधिकारी धीरज तोरणे, माधुरी सणस, वनराई संस्थेचे विश्वस्त सागर धारिया, अमित वाडेकर, शशांक गराडे, विनायक गारडे तसेच वनराई संस्थेची टीम तसेच सुदर्शन कंपनीचे अन्सार डांगे, साईप्रसाद , आप्पासाहेब गजबर, विष्णू लहामगे, विलास भालेराव यांचीही प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन वरंध गावाचे जयवंत देशमुख यांनी केले. कार्यक्रमास वरंध ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी, शेतकरी, ग्रामस्थ आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# खारपाडा टोल प्रकरणी कोळी समाज आक्रमक

## • जनआक्रोश समितीच्या आंदोलनाला दिला पाठिंबा

**| नागोठणे | प्रतिनिधी |**



अपूर्णावस्थेत असलेल्या मुंबई गोवा महामार्गावरील खारपाडा येथील टोल नाका बंद करण्यासाठी जन आक्रोश समितीच्या वतीने गेल्या २५ मे पासून खारपाडा टोल नाका येथे बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू आहे. या आंदोलनास अखिल कोळी समाज व संस्कृती संवर्धन संघ महाराष्ट्र यांच्याकडून जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे. अखिल कोळी समाज व संस्कृती संवर्धन संघाचे अध्यक्ष चंद्रकांत कोळी यांनी तशा प्रकारचे पाठिंब्याचे पत्र खारपाडा येथील आंदोलन स्थळी जाऊन जनआक्रोश समितीच्या अध्यक्षांकडे सुपूर्द केले आहे. यावेळी संघाचे अध्यक्ष चंद्रकांत कोळी, पुंडलिक ताडकर, श्याम पाटील व तुळशीराम पारंगे हे उपस्थित होते. महामार्ग जोपर्यंत पूर्ण होऊन जनतेला दर्जेदार रस्ता मिळत नाही तोपर्यंत खारपाडा टोल नाका बंद करण्यात यावा, रायगड जिल्ह्यातील सर्व वाहनांना कायमस्वरूपी टोलमाफी देण्यात यावी अशा प्रकारच्या मागण्याही अखिल कोळी समाज व संस्कृती संवर्धन संघांनी दिलेल्या पत्रात करण्यात आल्या आहेत. जनआक्रोश समितीच्या वतीने सुरू असलेल्या या ठिय्या आंदोलनात अखिल कोळी समाज व संस्कृती संवर्धन संघाचे सर्व पदाधिकारी आपल्या आंदोलनात खांद्याला खांदा लावून सहभागी होतील असे पत्रात म्हटले आहे.

# सीएनजीच्या तुटवड्यामुळे घबराट

**| मुंबई | प्रतिनिधी |**



बोईसर आणि पालघर परिसरात सीएनजीच्या तीव्र तुटवड्यामुळे मोठ्या प्रमाणावर घबराट पसरली आहे. गुजरात गॅसकडून होणाऱ्या सीएनजी पुरवठ्यात व्यत्यय आल्याने ऑटो-टॅक्सी चालक आणि व्यावसायिक वाहन मालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. परिस्थिती इतकी गंभीर आहे की, सीएनजी पंपांवर चालकांच्या किलोमीटरभर लांब रांगा लागल्या आहेत. चालकांना आपल्या वाहनांमध्ये इंधन भरण्यासाठी ४ ते ५ तासांपर्यंत प्रतीक्षा करावी लागत होती. सीएनजीच्या कमतरतेमुळे प्रवासी वाहतुकीवर गंभीर परिणाम झाला आहे. ऑटो-रिक्षा, टॅक्सी आणि व्यावसायिक वाहन मालकांच्या उपजीविकेला धोका निर्माण झाला आहे. एकीकडे तीव्र उष्णता आणि दुसरीकडे तासन्तास रांगेत उभे राहण्याच्या सक्तीमुळे चालकांचा संयम संपला आहे. रांगेत थांबण्याच्या या दीर्घ तासांमुळे त्यांचा वेळ वाया जात असून, त्यांचे वेतन बुडत आहे, ज्यामुळे प्रशासन आणि गॅस कंपनीविरुद्ध मोठ्या प्रमाणावर नाराजी पसरली आहे.

## मंदिरासाठी २८ कोटी हुन अधिक निधीही मंजूर | हमीपत्र बनवून काम सुरु करा

# वरदविनायक कमिटीचे तहसीलदारांना निवेदन

**| खोपोली | प्रतिनिधी |**



खालापूर तालुक्यात अष्टविनायकापैकी एक असणारा महड येथील वरदविनायक या रूपात हा गणपती सर्व इच्छा-आकांक्षा पूर्ण करणारे गणराज म्हणून ओळख आहे. मात्र, या मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या कामाला किती कालावधी लागेल याबाबत शंका उपस्थित करीत ग्रामस्थ आणि महड देवस्थान विश्वस्त कमिटींनी शासन व ठेकेदाराने वेळेत काम पूर्ण करण्यासाठी एक लेखी जाहिरनामा तयार करावा. त्यात किती कालावधी लागणार आणि निधी बाबत कोणतीही अडचण येणार नाही असे हमीपत्र बनवावा आणि कामाला सुरुवात करावी असा निर्णय एक मताने घेतला आहे. याचे निवेदन खालापूर तहसील कार्यालयास २९ मे रोजी दिले आहे.

मंदिराच्या जीर्णोद्धार होणार असल्याने येथील महड ग्रामस्थांच्या काय भावना आहेत यासाठी देवस्थान कमिटीने सदरची प्राथमिक चर्चा करण्यासाठी मागील काही दिवसांपूर्वी बैठक बोलावली होती. महड येथील मंदिरासाठी २८ कोटी हुन अधिक निधीही मंजूर केला आहे. या कामाचा कालावधी तीन वर्षांचा असेल. गणपती बाप्पाच्या वस्तू सह अन्य व्यवसाय करून येथील ८० टक्के कुटुंबाचा उदरनिर्वाह सुरू आहे. त्याचा कालावधी लेखी स्वरूपात दिलेल्या ठेकेदाराकडून जाहिर करावा या मागणीसाठी खालापूर नायब तहसीलदार विकास पवार व नायब तहसीलदार सुधाकर राठोड यांच्याकडे देवस्थान कमिटी व ग्रामस्थांनी निवेदन सादर केले.

यावेळी मोहिनी वैद्य, किरण काशीकर, राजेंद्र बडगुजर, राजेंद्र तट्टू, अतुल तट्टू, सुनीता पाटील, श्वेता गुरव, मीनल कबले, मंदार जोशी, संभाजी पाटील, गणपत पाटील, किशोर पाटील, पद्माकर पाटील, राजू केदारी, गणेश कबळे, संतोष मीरकुटे, रामदास पाटील, गीता पाटील, तेजस पवार यासह उपस्थित होते.

### ठरलेला निधी द्या

मंदिराचा जीर्णोद्धार करताना त्यासाठी ठरलेला निधी कमी पडू न देता जो कालावधी जाहीर होईल त्यावेळेतच पूर्ण करावा व आम्हाला उपासमारीपासून वाचवावे अशी मागणी केली आहे.

## निवडक

### खांदा वसाहतीतील रस्ते गेले खड्ड्यात



**पनवेल :** खांदा वसाहत सेक्टर १२ येथील बालभारती पुस्तक भांडाराजवळील रस्त्यावर मोठा खड्डा पडल्याने वाहनचालकांसमोर अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. या मार्गावर दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. विशेषतः दुचाकीस्वारांना या खड्ड्याचा मोठा फटका बसू शकतो. स्थानिक नागरिकांनी धोका लक्षात घेऊन खड्ड्याजवळ नारळाच्या फांद्या व दगड ठेवून इशारा देण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र रात्रीच्या वेळी हा खड्डा स्पष्टपणे दिसत नसल्याने अपघात होण्याची शक्यता अधिक आहे. ज्येष्ठ नागरिक आणि दुचाकीस्वारांची ये-जा या मार्गावर मोठ्या प्रमाणात असते. संबंधित प्रशासनाने या गंभीर बाबीची तातडीने दखल घेऊन खड्डा बुजवावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी त्वरित उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

### गोमाशीत शैक्षणिक साहित्य वाटप



**पाली/गोमाशी :** श्री संत भोजलिंग काका सुतार समाज सेवा मंच पुणे जिल्हा व इतर विभाग यांच्या वतीने गोमाशी येथील सुतार समाजाच्या विद्यार्थ्यांकरिता मोफत शैक्षणिक साहित्य वाटप महाराष्ट्र शासनाचा विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार प्राप्त रवींद्र रायकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. उपस्थित विद्यार्थी आणि सुतार समाजाला त्यांनी संबोधित करताना म्हणाले की, आपल्या समाजातील विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य देऊन त्यांचा शैक्षणिक विकासाला हातभार लावण्याचा छोटासा प्रयत्न केला जात आहे. तसेच समाजातील यशस्वी विद्यार्थ्यांचा लवकरच गुणगौरव करण्याचा मानस आहे. शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रमासाठी रवींद्र रायकर, निकिता रायकर, विरेंद्र भालेराव, अश्विनी सुतार, भूषण सुतार, शंकर सुतार, नारायण सुतार, विवेकानंद सुतार, शशिकांत सुतार, कल्पना सुतार, अंजली सुतार,कविता सुतार ,लता सुतार, वैजयंती सुतार, आदी महिला वर्ग, विद्यार्थी ग्रामस्थ आदी मान्यवर उपस्थित होते.

### पावसाळ्यासाठी पाणी उपसा पंप सज्ज



**रायगड :** मे महिना संपताच पावसाळ्याची चाहूल लागली आहे. संभाव्य अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेने कलंबोली परिसरात आवश्यक उपाययोजना पूर्ण केल्या आहेत. कळंबोळी वसाहतीतील अनेक भाग सखल असल्याने दरवर्षी मुसळधार पावसात रस्ते आणि परिसरात पाणी साचण्याची समस्या निर्माण होत असते. त्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयींचा सामना करावा लागतो. यंदा ही परिस्थिती टाळण्यासाठी महापालिकेने आगाऊ नियोजन करत विविध ठिकाणी पाणी उपसा पंप बसविले आहेत. पावसाचे पाणी वेगाने बाहेर काढण्यासाठी या पंपांची चाचणीही घेण्यात आली आहे. तसेच सिडकोकडून उभारण्यात आलेले पाँड्स (जलसाठे) देखील कार्यान्वित ठेवण्यात आले असून अतिरिक्त पाण्याचा निचरा करण्यासाठी त्यांचा उपयोग होणार आहे. नालेसफाईची कामे पूर्ण करण्यात आली असून पाणी साचण्याची शक्यता असलेल्या ठिकाणांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी मनपा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन पथक आणि संबंधित विभागांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पावसाळ्यात नागरिकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, वाहतूक सुरळीत राहावी आणि साचलेल्या पाण्याचा त्वरित निचरा व्हावा यासाठी प्रशासनाने संपूर्ण तयारी केली असल्याचे सांगण्यात येत आहे.

### पाठ्यपुस्तकांचे वितरण नियोजन पूर्ण

**पनवेल :** जून महिन्यापासून नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात होत असून समग्र शिक्षा अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके देण्यासाठी शिक्षण विभागाची तयारी अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय शाळांसाठी आवश्यक पाठ्यपुस्तकांचा साठा पनवेल येथील वि.खे. हायस्कूलमध्ये दाखल झाला आहे. सर्व पुस्तकांची वर्गनिहाय, विषयनिहाय तसेच शाळानिहाय छाननी करून त्यांची आखणी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके उपलब्ध व्हावीत यासाठी प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे. पुस्तकांचे गठ्ठे व्यवस्थित रचून वितरणासाठी सज्ज ठेवण्यात आले आहेत. शिक्षण विभागाच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच आवश्यक शैक्षणिक साहित्य मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाला तत्काळ सुरुवात करता येणार असून पालकांनाही आर्थिक दिलासा मिळणार आहे. नवीन शैक्षणिक वर्षाच्या स्वागतासाठी शाळा प्रशासन, शिक्षक व कर्मचारी यांची लगबग सुरू असून परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शासनाच्या या योजनेचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.



### पेणमध्ये दोन पुस्तकांचे प्रकाशन

**चिरनेर :** पेण वरवणे, धनगरवाडी येथील आसरा फार्म हाऊस येथे प्रा.एल. बी. पाटील यांच्या 'अभासात मी' व त्यांचे पुत्र गुंजार पाटील यांच्या 'रामदास : अखेरचा प्रवास' या दोन पुस्तकांचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्राध्यापक एल बी पाटील यांच्या ३५ व्या. पुस्तकाचे प्रकाशन आहे. तर गुंजार पाटील यांच्या या १५ व्या पुस्तकाचे प्रकाशन आहे. या प्रकाशन सोहळ्यास प्रा. प्रशांत देशमुख, संजय गुंजाळ, चैतन्य पाटील, पुरुषोत्तम मुळे, संजय होळकर, अँड. गोपाळराव शेळके, संध्या दीवकर, सिध्देश लखमदे, ज्योत्स्ना राजपूत, दर्शना माळी उपस्थित होते. जीविता पाटील, प्रवीण बोपुलकर, डॉ.अमृत पाटील, गजानन म्हात्रे, अजय शिवकर, वैभव धनावडे, अनिल भोईर, लवेंद्र मोकल, श्रीरंग घरत, रोहिदास पोटे, डॉ. राजेंद्र राठोड, दीपाली दिवेकर-अस्सी, आदी उपस्थित होते. हेमंत बारटक्के यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले.

# रायगड पालकांविना पोरका!

## राष्ट्रवादी-शिंदे गटाच्या वादात विकासाला खीळ

**| कापोली | प्रतिनिधी |**

महाराष्ट्राच्या निवडणुका होऊन दीड वर्ष उलटून गेले आहे. प्रत्येक पक्षाने गेली निवडणूक प्रतिष्ठेची बनवलेली होती. महाराष्ट्रातील लोकसभेचा निकाल महाविकास आघाडीच्या बाजूने लागला होता. लोकांनी लोकसभेच्या जागा महाविकास आघाडीच्या पदरात टाकल्या होत्या. जागांच्या खेचाखेचीत अडकलेल्या महाविकास आघाडीला जनतेने अनपेक्षित धक्का देत विधानसभा निवडणुकीचा निकाल महायुतीच्या बाजूने दिला. विधानसभा निवडणुकीत महायुतीने दोनशे पारचा दिलेला नारा सत्यात उतरवून विधानसभा काबीज केली. राज्याच्या विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुतीने २३५ जागा पटकावल्या आहेत.

रायगडमध्ये सर्वाधिक आमदार शिंदे गटाचे असल्याने शिवसेना शिंदे गटाच्या आमदारांनी बाजू लावून रायगडचा पालकमंत्री आमचाच असायला हवा, असा हट्ट धरून आदिती तटकरेंसमोर आव्हान उभे केले. आज-उद्या करता-करता एक वर्ष उलटून गेले तरी रायगडच्या पालकमंत्र्यांचा तिढा सुटताना दिसत नाही. त्यामुळे दोघांच्या भांडणामुळे रायगडच्या विकासाला एकप्रकारे खीळ बसलेली आहे अशी चर्चा मतदारसंघात सुरु झाली असून, हा तिढा लवकरात लवकर सोडवावा, अशी जिल्ह्यातील जनतेची मागणी आता जोर धरू लागली आहे.

बहुचर्चित मुंबई-गोवा महामार्ग अजूनही पूर्ण होत नाही. ही जबाबदारी कुणाची? असा प्रश्न वारंवार विचारला जात असूनदेखील कोकणासह रायगड जिल्ह्यातील आमदार, खासदार पेटून उठत नाहीत, त्यामुळे जनतेची प्रचंड नाराजी आहे. लोकांच्या मनात एकप्रकारचा रोष आहे. तरुणांच्या रोजगाराचा प्रश्न तर दुर्लक्षितच आहे. रोजगार उपलब्ध नसल्याने तरुण बेकार बसून आहेत, तरुणांची जबाबदारी कोण स्वीकारणार? रोजगार नसल्याने रायगड जिल्ह्यातील अनेक गावे ओस पडली असून, परिवारच्या परिवार मुंबईत स्थलांतरीत झाले आहेत. सणासुदीला गावे गजबजलेली असतात. मोठमोठे कारखाने कधी येणार? दोघांच्या भांडणात रायगड जिल्ह्याचे नुकसान होत आहे.

रायगडमधील अनेक गावांतील विकासकामे मोठ्या निधींमुळे अडकलेली आहेत. पालकत्व असेल तरच कुणीतरी जिल्ह्याला वाली उरेल, असे लोकांचे म्हणणे आहे. शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी अजित पवार गट या दोघांच्या वादात रायगड जिल्ह्याचे नुकसान का? असा प्रश्न आता लोक विचारु लागले आहेत.



## सुतारवाडीत राष्ट्रवादीची बैठक

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील सुतारवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या विस्तारित जिल्हा कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी दि. (३१) रोजी पार पडली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था व विधान परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आयोजित या बैठकीत पक्ष संघटना अधिक सक्षम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

यावेळी युवा नेतृत्वाला प्राधान्य देत प्रमोद म्हसकर यांच्यावर पेण विधानसभा कार्याध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. तसेच सामंत यांच्यावर पनवेल, उरण आणि कर्जत परिसरातील युवक संघटनेची जबाबदारी सुपूर्द करण्यात आली.

बैठकीस मंत्री आदिती तटकरे, विधान परिषद उमेदवार अनिकेत तटकरे, जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील, महिला जिल्हाध्यक्ष उमा मुंडे, स्नेहल जगताप, नगराध्यक्षा वनश्री शेडगे, मुरूड नगराध्यक्षा आराधना दांडेकर, राज्य प्रवक्त्या ॲड. सायली दळवी यांच्यासह पक्षाचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी व नेते उपस्थित होते.



## संत निरंकारी मिशनचा सत्संग सोहळा

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

दिघोडे येथे संत निरंकारी मिशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेला विशाल संत निरंकारी सत्संग कार्यक्रम भक्तिमय वातावरणात आणि उत्साहपूर्ण उपस्थितीत संपन्न झाला. ज्ञानप्रचारक परमपूज्य विश्वास भोसले यांच्या सान्निध्यात पार पडलेल्या या कार्यक्रमाला परिसरातील शेकडो भक्तांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या सत्संगामध्ये महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग दिसून आला. अनेक भक्तांनी सत्संगामुळे जीवनात घडलेल्या सकारात्मक बदलांचे अनुभव व्यक्त करत आत्मिक समाधान मिळाल्याची भावना मांडली. या कार्यक्रमास आयोजक दत्ताराम पाटील (संत निरंकारी सत्संग उरण सेक्टर १९ संयोजक), कुलदीप जयवंत म्हात्रे (संत निरंकारी सत्संग दिघोडे), काशिनाथ कासकर, चंद्रकांत म्हात्रे, हरिदास पाटील, सचिन पाटील आदींसह परिसरातील भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वंदना धामणसे यांचे निधन

**खांब** : रोहा तालुक्यातील वैजनाथ गावच्या रहिवासी वंदना तुकाराम धामणसे यांचे शुक्रवार, दि.२९ मे रोजी ७८ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्या मुठवली सह. सोसायटीचे माजी चेअरमन स्व. तुकाराम धामणसे यांच्या पत्नी होत.



त्यांच्या पश्चात एक मुलगा, सून, मुलगी, जावई नातवंडे, पतवंडे, पुतणे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रियाविधी रविवार, ७ जून रोजी, तर उत्तरकार्य बुधवार, दि.१० जून रोजी निवासस्थानी होणार आहेत.

## तिसरी मुंबईविरोधात शेतकऱ्यांचा एल्गार

**| उरण | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यात प्रस्तावित तिसऱ्या मुंबई प्रकल्पाविरोधात शेतकरी, भूमीपुत्र आणि ग्रामस्थांनी पुन्हा एकदा संघर्षाची भूमिका घेतली असून, नवनगर विरोधी समिती, रायगडच्या वतीने येत्या रविवार, ७ जून रोजी सायंकाळी ४ वाजता चिरनेर शहीद स्मारक येथे भव्य जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले आहे.

'आपली जमीन, आपले हक्क, आपले भविष्य' या घोषवाक्याखाली आयोजित करण्यात आलेल्या या सभेत तिसऱ्या मुंबई प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या शेतकरी, ग्रामस्थ आणि भूमीपुत्रांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या सभेस मा. न्यायमूर्ती बी.जी. कोळसे पाटील हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार असून, तिसऱ्या मुंबई प्रकल्पाच्या परिणामांबाबत ते मार्गदर्शन करणार आहेत.

नवनगर विरोधी समितीच्या पदाधिकाऱ्यांनी प्रसिद्ध केलेल्या पत्रकानुसार, तिसऱ्या मुंबईच्या नावाखाली रायगड जिल्ह्यातील सुपीक शेती, गावे, घरे आणि स्थानिकांचे अस्तित्व धोक्यात येणार असल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करून विकासाच्या नावाखाली स्थानिकांना विस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही समितीकडून करण्यात आला आहे.

समितीने स्पष्ट भूमिका घेत, नाही, नाही, कधीही नाही... आमच्या जमिनी देणार नाही अशी घोषणा दिली आहे. तसेच शेती, घरे, गावांसह आमचे अस्तित्व संपवू पाहणाऱ्या तिसऱ्या मुंबईची एकही वीट रचू देणार नाही, असा इशाराही देण्यात आला आहे.

रायगडमधील शेतकरी, महिला, युवक आणि विविध सामाजिक संघटनांनी या सभेला उपस्थित राहून आपल्या हक्काच्या जमिनी, गावे आणि भविष्यासाठी एकजूट दाखवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. तिसऱ्या मुंबई प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये निर्माण झालेली अस्वस्थता लक्षात घेता, चिरनेर येथील या सभेकडे संपूर्ण रायगड जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## लोकप्रतिनिधी, अधिकाऱ्यांचा विनापरवाना कामांना आशीर्वाद?

**| माथेरान | प्रतिनिधी |**

माथेरानला सध्याच्या घडीला नगरपालिकेत ताळमेळ दिसत नसल्याने गावात कोणकोणती कामे सुरू केली आहेत त्याबाबत ठावठिकाणा दिसून येत नाही. तर, दुसरीकडे विनापरवाना कामांना ऊत आल्याचेदेखील पाहावयास मिळत आहे. या विनापरवाना कामांना अप्रत्यक्षपणे काही लोकप्रतिनिधी आणि अधिकारी वर्गाचे सहकार्य लाभत असल्याने या कामांवर आक्षेप घेतला तरीसुद्धा अशाप्रकारची कामे युद्धपातळीवर सुरूच आहेत. यामागे मोठे अर्थकारण झाले असल्याचे सर्वच स्तरातून बोलले जात आहे.



माथेरानमध्ये जानेवारी महिन्यापासून बेबी डिसोझा मार्गावर विनापरवाना जांभ्या दगडातील रस्त्याचे काम सुरू होत असल्याने नगरपालिका विरोधी पक्षनेते सीताराम कुंभार यांनी आवाज उठवला होता. त्यामुळे तूर्तास हे काम बंद करण्यात आले होते. सर्व साहित्य नगरपरिषदेने जप्तसुध्दा केले होते. परंतु, सद्यःस्थितीत आता हे काम पूर्ण होण्याच्या मार्गावर दिसत आहे. प्रशासन बघ्याची भूमिका घेत आहे की अशा विनापरवाना कामांना आर्थिक लोभापायी अप्रत्यक्षपणे पाठिंबा देत आहेत, असा प्रश्न स्थानिकांना सतावत आहे. नियमबाह्य कामांना सध्याच्या काळात प्रशासन आणि काही लोकप्रतिनिधी हातभार लावत असून, एकीकडे अतिक्रमणावर कारवाईचा दिखावा, तर दुसरीकडे विनापरवाना रस्त्यांची कामे युद्धपातळीवर सुरू केली आहेत.

काही सर्वसामान्य स्थानिक लोकांना घराच्या दुरुस्तीसाठी लागणारे साहित्य आणण्यासाठी बंदी घालण्यात येते आणि दुसरीकडे धनाढ्यांना बंगल्याच्या कामासाठी लागणारे साहित्य आणण्यास मुभा दिली जात आहे. यामुळे नागरिक द्विधा मनःस्थितीत आहेत. विशेष म्हणजे, ज्या विरोधी पक्षांच्या नेत्यांनी आणि नगरसेवकांनी याच बेबी डिसोझा मार्गासाठी आकांडतांडव केले होते, तेच मूग गिळून गप्प का? असाही प्रश्न यानिमित्ताने सर्वसामान्यांकडून उपस्थित केला जात आहे.

## द्रोणागिरीवर अवैध माती उत्खननाचा घाव

- **करंजातील आदिवासींच्या जीवावर बेतणार?**
- **रेवस-करंजा पुलासाठी उत्खननाचा कहर**

**| चिरनेर | प्रतिनिधी |**

रेवस-करंजा सागरी पुलाच्या कामासाठी द्रोणागिरी पर्वताच्या पायथ्याशी सुरू असलेल्या मोठ्या प्रमाणातील उत्खननामुळे करंजा गावालगतच्या १५० वर्षे जुन्या आदिवासी वाडीवर संकटाचे ढग दाटून आले आहेत. पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना डोंगराच्या पायथ्याला उभा काप देऊन सुरू असलेल्या उत्खननामुळे दरड कोसळण्याचा धोका निर्माण झाला असून, शेकडो आदिवासी कुटुंबांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

स्थानिक ग्रामस्थ आणि सामाजिक कार्यकर्ते सचिन रमेश डाऊर यांनी याप्रकरणी प्रशासनावर गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, ॲफकॉन्स इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीकडून कोणतीही पुरेशी संरक्षक उपाययोजना न करता डोंगराचा मोठा भाग खोदण्यात येत आहे. संरक्षक भिंती, दरड प्रतिबंधक जाळ्या किंवा शास्त्रोक्त पद्धतीने टप्प्या-टप्प्याने उत्खनन करण्याऐवजी थेट डोंगर कमकुवत केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

रेवस-करंजासागरीपुलासाठीचा मूळ मार्ग बदलून काही प्रभावशाली घटकांच्या हितासाठी हा मार्ग द्रोणागिरीच्या पायथ्यालगत नेण्यात आल्याचा आरोपही ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. जमीन



संपादनाला स्थानिकांचा विरोध असतानाही काम सुरू असल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. सचिन डाऊर यांनी सांगितले की, करंजा गावच्या आदिवासींच्या जीविताशी संबंधित इतका गंभीर प्रश्न असताना जिल्हा प्रशासन, महसूल विभाग, भूगर्भ विभाग आणि वन विभाग यांची भूमिका संशयास्पद वाटत आहे. ग्रामस्थांचा विरोध, तक्रारी आणि संभाव्य धोका याकडे दुर्लक्ष करून संबंधित यंत्रणा केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप त्यांनी केला. यासंदर्भात प्रशासनाला ७२ तासांचा अल्टिमेटम देण्यात आला असून, ठोस कारवाई न झाल्यास करंजा ग्रामस्थांसह उरण तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

## ताडपत्री बांधण्याच्या वादातून मारहाण

**रोहा** : पावसाळ्यापूर्वी घराच्या मागील बाजूस ताडपत्री बांधण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका व्यक्तीस मारहाण केल्याची घटना रोहा तालुक्यातील सोनखार येथे घडली. याप्रकरणी रोहा पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी हे त्यांच्या घराच्या मागील बाजूस ताडपत्री बांधत होते. यावेळी आरोपींनी ताडपत्रीवरील पावसाचे पाणी त्यांच्या गल्लीत पडेल, असे सांगून त्यास विरोध केला. यावरुन बाचाबाची होऊन मारहाण केली.

## दूंदरे ग्रामपंचायतीत ५९ शेगड्यांचे वाटप

**| पनवेल | विशेष प्रतिनिधी |**

दूंदरे ग्रामपंचायतीचे सरपंच सुभाष भोपी यांनी आपल्या वाढदिवसानिमित्ताने ५९ शेगड्यांचे वाटप केले. रिटघर गावचे सुपुत्र दूंदरे ग्रामपंचायत थेट सरपंच सुभाष भोपी आपल्या वाढदिवसानिमित्त नेहमी सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवस साजरा करत असतात. मागील वर्षी ५८ व्या वाढदिवसानिमित्त अठ्ठावन्न विद्यार्थिनींना मोफत सायकल वाटप करण्यात आले होते. प्रत्येक वर्षी समाजातील घटकांना विविध भेटवस्तू देण्याचे काम करणारे सरपंच सुभाष भोपी यांनी यावर्षी ५९ व्या वाढदिवसानिमित्त दूंदरे ग्रामपंचायत हद्दीतील रिटघर, दूंदरे, दूंदरेपाडा,



चिंचवलीतील गरीब, गरजू, विधवा महिलांना शेगड्यांचे वाटप केले.

घरगुती खर्चाचे आर्थिक बजेट बसण्याच्या उद्देशाने तसेच जागतिक इंधन संकटामुळे भारतावरही गॅस व इंधनाचे संकट आले असल्याने तसेच गॅस तुटवडा समस्याला सामोरे जाण्याच्या दृष्टिकोनातून दूंदरे हद्दीतील या गावातील गरजू लोकांना प्रदूषणविरहित शेगड्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी क्रांतिकारी सेवा संघाचे अध्यक्ष नामदेव फडके, राजेंद्र मुंबईकर, महादू पाटील, गोपीनाथ भोपी, दीपक उलवेकर, महादेव गायकर, जयदास चौधरी, शांताराम चौधरी, रवी शेळके, विलास सिनारे, संतोष चौधरी, माजी सरपंच भारत भोपी, साईनाथ भगत, नरेश भोपी आदी मान्यवर उपस्थित होते.

### जीवना, दांडा जेट्टी प्रकल्पांमुळे समुद्रपातळीत बदल | नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

# श्रीवर्धन किनारपट्टी धोक्यात?

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

श्रीवर्धनमध्ये सुरू असलेल्या जीवना जेट्टी आणि दांडा जेट्टी प्रकल्पांमुळेविकासाच्यानावाखाली किनारपट्टीच्या नैसर्गिक रचनेत बदल होत असल्याची चिंता आता स्थानिक नागरिकांमध्ये वाढू लागली आहे. अनेक महिन्यांपासून सुरू असलेली ही कामे अंतिम टप्प्यात पोहोचत असताना, समुद्राच्या पाणीपातळीतील बदल, किनाऱ्यावरील वाढता दाब आणि भविष्यातील संभाव्य धोके यावर गंभीर चर्चा सुरू झाली आहे.

रेस्ट हाऊस परिसर आणि लगतच्या समुद्रकिनाऱ्यावर राहणाऱ्या नागरिकांच्या म्हणण्यानुसार, पूर्वी ओहोटीच्या काळात १०० ते १५० मीटरपर्यंत समुद्र मागे सरकत असे. त्यामुळे



किनाऱ्यावरमोठ्याप्रमाणातवाळूचा पट्टा दिसत होता. मात्र, आता उन्हाळ्याच्या दिवसांतही समुद्राचे पाणी किनाऱ्यालगत कायम राहू लागले असून, अनेक ठिकाणी ते थेट संरक्षण कठड्याला धडकताना दिसत आहे. यामुळे समुद्राच्या नैसर्गिक प्रवाहात आणि गाळ साचण्याच्या प्रक्रियेत बदल झाला आहे का, असा प्रश्न स्थानिकांकडून उपस्थित केला जात आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस जवळ आले आहेत. भरती, मुसळधार पाऊस आणि वादळी हवामान यांचा एकत्रित परिणाम झाल्यास समुद्राचे पाणी किनाऱ्यालगतच्या वस्त्यांपर्यंत पोहोचू शकते, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत. काही रहिवाशांनी तर "आज पाणी कठड्यापर्यंत आले आहे, उद्या ते घरांच्या दारापर्यंत येणार नाही ना?" असा सवाल उपस्थित केला आहे.

मागील वर्षी गणेशोत्सवाच्या काळात समुद्राच्या वाढलेल्या पाणीपातळीमुळे विसर्जनासाठी आलेल्या नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला होता. समुद्रकिनाऱ्यावरील उपलब्ध जागा कमी झाल्याने विसर्जन प्रक्रिया अवघड झाली होती. तो अनुभव अजूनही लोकांच्या स्मरणात असून, यंदा परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जेट्टी प्रकल्पांमुळे मत्स्यव्यवसाय, पर्यटन आणि सागरी वाहतुकीला चालना मिळेल, असा दावा केला जात असला तरी स्थानिक नागरिक या प्रकल्पांच्या उद्देशांबाबत प्रश्न उपस्थित करत आहेत.

समुद्राच्या पाणीपातळीतील बदल, किनारपट्टीची धूप आणि जेट्टी प्रकल्पांचा पर्यावरणावर होणारा परिणाम याचा स्वतंत्र वैज्ञानिक अभ्यास करण्यात यावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. तसेच भविष्यातील संभाव्य संकट टाळण्यासाठी तज्ज्ञ समिती नियुक्त करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सध्या समुद्र शांत दिसत असला तरी किनारपट्टीवरील बदल अनेक प्रश्न निर्माण करत आहेत. पर्यावरणाचा समतोल बिघडल्यास त्याचे परिणाम दीर्घकालीन आणि गंभीर असू शकतात. त्यामुळे प्रशासन, तज्ज्ञ आणि स्थानिक नागरिक यांनी एकत्रितपणे या परिस्थितीकडे गांभीर्याने पाहण्याची गरज असल्याचे मत व्यक्त होत आहे.

## निवडक



### पढवण येथे शेतकरी प्रशिक्षण उत्साहात

**तळा** : महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्यावतीने 'खरीप हंगाम मोहीम २०२६' अंतर्गत पढवण येथे स्थानिक शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण मार्गदर्शक प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना पारंपरिक अन् आधुनिक सेंद्रिय शेती पद्धतीची सविस्तर माहिती देऊन प्रत्यक्ष प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. याप्रसंगी प्रामुख्याने दशपर्णी अर्क तयार करणे, भात बीजप्रक्रिया, भात उगवणशक्ती तपासणे आणि गोकृपा अमृत निर्मिती या विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून तालुका कृषी अधिकारी हनुमंत कांबळे उपस्थित होते. त्यांनी शेतकऱ्यांना बदलत्या हवामानात कमी खर्चात शाश्वत उत्पन्न कसे घ्यावे, याविषयी मोलाचा सल्ला दिला. तसेच मंडळ कृषी अधिकारी घालमे यांनी खरीप हंगामातील नियोजनाचे महत्त्व पटवून दिले. सहाय्यक कृषी अधिकारी योगेश कोळी यांनी प्रत्यक्ष कृतीतून विविध प्रात्यक्षिके करून दाखवली, ज्यामुळे उपस्थितांच्या शंकांचे जागेवरच निरसन झाले. कार्यक्रमादरम्यान खालील प्रमुख बाबींचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले दशपर्णी अर्क निर्मिती: रासायनिक कीटकनाशकांना फाटा देत, स्थानिक पातळीवर उपलब्ध असणाऱ्या विविध १० प्रकारच्या वनस्पतींच्या पानांपासून नैसर्गिक कीटकनाशक (दशपर्णी अर्क) कसे तयार करावे, याचे थेट प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.भात पिकाला सुरुवातीच्या काळात रोगांपासून वाचवण्यासाठी बीजप्रक्रिया कशी करावी आणि पेरणीपूर्वी बियाण्यांची उगवणशक्ती कशी तपासावी, याबद्दल शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिकवण्यात आले.



### म्हसळा येथे हिंदू संमेलन उत्साहात

**म्हसळा** : सर्वसमावेशक आणि न्यायपूर्ण भारतासाठी हिंदू एकता अनिवार्य असून, आपण सर्वांनी जातीपातीचे भेद बाजूला ठेवून एकत्र येणे ही काळाची गरज आहे. संघटित हिंदू एकतेतूनच सामर्थ्यशाली भारत उभा राहू शकतो, असे प्रतिपादन शिव व्याख्याते सौरभ करडे यांनी केले. म्हसळा शहरातील धावीर मंदिर परिसरात सकल हिंदू समाजाच्या वतीने आयोजित विराट हिंदू संमेलनात ते बोलत होते.

सौरभ करडे यांनी हिंदू धर्मातील आघात मांडताना मोठ्या प्रमाणात होणारे हिंदूंचे धर्मांतर, लव्ह जिहाद, मंदिर सरकारीकरण, गोहत्या, भूमी जिहाद आदी विषय आकडेवारीसहित मांडले. या सर्व समस्यांवर उपाय म्हणून धर्माधिष्ठित हिंदू राष्ट्राची स्थापना झाली पाहिजे, या विचाराने सकल हिंदू समाजाने एकत्र येऊन काम केले पाहिजे, असे आवाहन केले. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे रायगड जिल्हा संपर्क प्रमुख डॉ. समीर साळुंखे, डॉ पल्लवी साळुंखे यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे अध्यक्षपद नंदकुमार सावंत यांनी भूषवले, तर उपाध्यक्षपदी महादेव पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सचिन करडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व मंडळे, स्वयंसेवक, धार्मिक क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्ती व दानशूर नागरिकांचे आभार संयोजक यांनी मानले.

### डॉ. प्रियांका डोके मांडलिकांना पुरस्कार प्रदान

**नवीन पनवेल** : महिला सक्षमीकरण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत डॉ. प्रियांका डोके मांडलिक यांना राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित 'वुमन एम्पॉवरमेंट अवॉर्ड' प्रदान करण्यात आला. हा सन्मान बॉलिवूड अभिनेते नील नीतीन मुकेश यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. समाजातील महिला सक्षमीकरण, शिक्षण, सामाजिक जागरुकता आणि विविध क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. प्रियांका डोके मांडलिक यांचा गौरव करण्यात आला. या पुरस्कारामुळे त्यांच्या कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली असून, विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ. प्रियांका डोके मांडलिक यांनी हा सन्मान समाजसेवा, महिला सक्षमीकरण आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या सर्व महिलांना समर्पित असल्याची भावना व्यक्त केली. तसेच भविष्यातही समाजहितासाठी अधिक जोमाने कार्य करण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. या सोहळ्यास विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणतज्ज्ञ आणि प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या.



### अचानक बसलेल्या पावसाने गारवा

**उरण** : गेल्या अनेक दिवसांपासून वाढलेल्या उष्णतेमुळे होरपळून निघालेल्या उरण तालुक्यातील नागरिकांना सोमवारी सकाळी अचानक झालेल्या पावसामुळे काहीसा दिलासा मिळाला. मात्र, हा दिलासा अल्पकाळच टिकला असून, पावसानंतर उष्णता आणि दमट वातावरणात आणखी वाढ झाल्याचे दिसून आले. सोमवारी सकाळी आठच्या सुमारास तालुक्यातील काही भागांमध्ये अचानक ढग दाटून आले आणि पावसाने हजेरी लावली. उरण शहरात काही मिनिटांसाठी रिमझिम स्वरूपाचा हलका पाऊस पडला. त्यामुळे वातावरणात काही काळ गारवा निर्माण झाला होता.


## क्लासिफाईड

जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **तातडीची भरती, अलिबाग** रेस्टॉरंट/प्रॉपर्टी/एरिया मॅनेजर हेड शेफ, हाऊसकीपिंग, किचन हेल्पर मोफत राहण्याची व जेवणाची सोय TMS पेरोल अंतर्गत नोकरी. संपर्क : 8976709218 / 8691087302
- **घरकामासाठी कायमस्वरूपी** राहून काम करणारी बाई हवी आहे. कामामध्ये जेवण बनवणे व घराची साफसफाई यांचा समावेश असेल. पगार : ₹१४,०००/- राहण्यासाठी केयरटेकर रूम, तसेच जेवणाची व्यवस्था करण्यात येईल. इच्छुकांनी संपर्क साधावा. ७८७५८६६५५५
- **अंकुर नर्सरी-(वाडगाव फाटा, अलिबाग पेण रोड पासून १** मिनिटाच्या अंतरावर) अलिबाग ५ जून पर्यावरण दिनानिमित्त, सर्व प्रकारची फळझाडांची मजबूत कलमे, फूलझाडे, इनडोअर प्लांट्स, बुके प्लांट्स वर भरपूर सवलत! दि. २ जून २६ ते १० जून २६ पर्यंत संपर्क - ९४२३८९०२९५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२१९०/ २२२७६१

# गुणवंत विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी

**महाड :** लोकविकास सामाजिक संस्थेच्या जगताप कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी गुणवत्तापूर्ण यश संपादन केले आहे.

तृतीय वर्ष कला शाखेत उमैर वनू याने ८.८६ गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला.असजद अंबेरकर याने ७.८३ सह द्वितीय क्रमांक पटकावला. मोहम्मद अय्यूब मुजावर याने ७.२३ गुणांसह तृतीय क्रमांक संपादन केला. तृतीय वर्ष वाणिज्य शाखेत महाडिक भाग्यश्री हिने ८.४८ मिळवत प्रथम क्रमांक प्राप्त केला. गैबी नागमीन हिने ७.९३ सह द्वितीय क्रमांक मिळविला. चांदले मिसबाह हिने ७.५८ गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला. तृतीय वर्ष विज्ञान शाखेत तन्वी अवगुंडे हिने ८.६३ गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला. वैष्णवी गोरीवाले हिने ८.२५ सह द्वितीय क्रमांक प्राप्त केला. विराज शेलार याने ७.५८ गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशील यांनी खालील लिहून देणार मिळकतीचे मालक शारदाबाई एकनाथ पिंगळे यांनी खालील वर्णन केलेली मिळकत कायम खरेदीखताने आमचे अशील दिनेश भगवान पाटील व गणेश भगवान पाटील यांना विकत देण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे पाषाणे, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| ११८/४/ब | ०.३०.१०<br>पो.ख ०.००.५०<br>एकूण ०.३०.६० गुंठे | १.१९ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, विकसनकरार, ताबा, कब्जा, वहिवाट, गहाण, दान, लिज, वैगरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाचे आत खालील सही करणार वकील यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत हि निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशील व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दिनांक : २/६/२०२६

सही/-
**वकील किशोर अनंता दिघे**
पत्ता - मुखाड्याचापाडा, पो.पाषाणे
ता. कर्जत, जि. रायगड
मो नं ८००७९७०१५१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरीता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चई, ता. कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ४०/४ | एकूण क्षेत्र ०-२४-०० हे.आर | ०.३७ |
| ४०/३/ब | एकूण क्षेत्र ०-११-०० हे.आर | ०.०६ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून तीन दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही/-
दिनांक :-०२/०६/२०२६
**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाऊस नं.१४१-बी, हनुमान मंदिर जवळ,
मु.पो. कामार्ली, ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे तुडाळ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत, श्री. सौरव योगेंद्र गौती, राहणार - मुंबई यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदरील जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

माझे अशिलांना खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. सौरव योगेंद्र गौती, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर ) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| तुडाल, ता.अलिबाग. | २३/१/अ/२ | ०-५२-८०<br>०-००-७० (पो.ख.)<br>०-५३-५० एकूण | ००-९७ |

अलिबाग,
दिनांक : २/०६/२०२६

सही/
**(ॲड. संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग,
टिळक रोड, अलिबाग-रायगड
खरेदीदारांचे वकील

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील वर्णणाची मौजे. कावीर, तालुका-अलिबाग जि. रायगड येथील मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) सौ.नेत्रा संजय म्हात्रे २) श्री.संजय दत्तात्रेय म्हात्रे रा.आगरसुरे ता.अलिबाग यांच्या सामाईक मालकी हक्काची मिळकत कायम स्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहेत.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| कावीर | ११०/१ | ०.४३.८०<br>पो.ख. क्षेत्र ०.०३.००<br>एकुण क्षेत्र ०.४६.८० | २.५० |

**वर नमूद मिळकती पैकी १) सौ. नेत्रा संजय म्हात्रे २) श्री. संजय दत्तात्रेय म्हात्रे यांच्या मालक्की हक्कातील सामाईक मिळकत क्षेत्र. ०.२८.८० पो.ख ०.०२.०० एकुण क्षेत्र. ०.३०.८० या मिळकती पैकी क्षेत्र. ०.१५.६० हे. आर मिळकतीचे.**

सदरची सामाईक मिळकत वरील विद्यमान मालकांचे निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांस दिलेला आहे. मात्र, तरीदेखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, इजमेंट, बोजा, साठेकरार, ताबा कब्जा, लीएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यानी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापांसून ७ (सात) दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरुपात समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख - ०१/०६/२०२६
**ॲड. मनोज परशुराम ओव्हाळ**
रजिस्ट्रर ऑफिस समोर अलिबाग गाळा नं.६

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे तुडाळ, ता.अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत, श्री. सौरव योगेंद्र गौती, राहणार- मुंबई यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदरील जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

माझे अशिलांना खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. सौरव योगेंद्र गौती, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असलेबाबतचा दाखला देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतींमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| तुडाल, ता.अलिबाग. | २३/१/ब | ०-९१-००<br>०-०१-५० (पो.ख.)<br>०-९२-५० एकूण | ०१-५६ |

अलिबाग,
दिनांक : २/०६/२०२६

सही /
**(ॲड. संजय म. भगत)**
हिराबाग सोसायटी, अे विंग,
टिळक रोड, अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे तळ-वळी, ता. मुरुड, जि. रायगड येथील भुमापन क्रमांक १५२ क्षेत्र ०-५५-०० हे. आर. आकार ० रुपये ३७ पैसे, ही वरकशी मिळकत मिळकतीचे विद्यमान कबजेदार १) आल्बर्ट बास्त्याव मार्तीस, २) पेद्रु मनु मार्तीस, ३) लिंबान जेरोन मार्तीस, ४) तेरेजा जेरोन मार्तीस, सर्व रा. कोर्लई, ता. मुरूड, जि. रायगड यांचे व इतर सह मालक यांचे खुद्द मालकीची व ताबा कबजा वहिवाटीची आहे. सदर मिळकतीपैकी वरील विद्यमान कबजेदार यांचा असलेला अविभक्त हिस्सा आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे विद्यमान कबजेदार यांच्यात झालेली आहेत. सदर मिळकतीपैकी अविभक्त हिश्श्याचा मालकी हक्क व ताबा कब्जा मिळकतीचे वरील विद्यमान कब्जेदार यांचाच आहे. असा भरवसा त्यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, साठेकरार, अन्न वस्त्राचा बोजा वहिवाटीचा अगर तत्सम प्रकारचा कोणताही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून एकवीस दिवसांचे आत खालील सही करणार 'खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट' यांजकडे प्रथम दर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. या मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वर वर्णन केलेल्या मिळकतीचा मालकी हक्क व ताबा कबजा मिळकतीचे वरील विद्यमान कबजेदार यांचाच आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
ता. ०१/०६/२०२६

सही/-
**ॲड. श्रद्धा प्रदिप वैद्य**
'नागेश्वरभुवन', गणपती आळी, मु.पो. नागांव,
ता. अलिबाग, जि. रायगड
(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, मौजे बोर्ली, ता. मुरुड, जि. रायगड येथील भुमापन क्रमांक ५३ क्षेत्र ०-५५-८० हे. आर आकार ५ रुपये ८१ पैसे, या भातशेती मिळकतीपैकी ०-०५-०० हे. आर, आकार ० रूपये ६० पैसे ही भातशेती मिळकत मिळकतीचे विद्यमान कबजेदार शरद गजानन लगडे रा. वर्सोवा, मुंबई यांचे खुद्द मालकीची व ताबा कबजा वहिवाटीची आहे. सदर मिळकतीचा मालकी हक्क व ताबा कब्जा मिळकतीचे विद्यमान कब्जेदार यांचाच असून वरील मिळकत आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे विद्यमान कबजेदार यांच्यात झालेली आहेत. सदर मिळकतीचा मालकी हक्क व ताबा कब्जा मिळकतीचे वरील विद्यमान कब्जेदार यांचाच आहे. असा भरवसा त्यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. तरी सदर मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लीज, फरोक्त, साठेकरार, अन्न वस्त्राचा बोजा वहिवाटीचा अगर तत्सम प्रकारचा कोणताही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाले पासून एकवीस दिवसांचे आत खालील सही करणार 'खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट' यांजकडे प्रथम दर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. या मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास वर वर्णन केलेल्या मिळकतीचा मालकी हक्क व ताबा कबजा मिळकतीचे वरील विद्यमान कबजेदार यांचाच आहे असे समजुन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग
ता. ०१/०६/२०२६

सही/-
**ॲड. श्रद्धा प्रदिप वैद्य**
'नागेश्वरभुवन', गणपती आळी, मु.पो. नागांव,
ता. अलिबाग, जि. रायगड
(खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट)

## जाहीर नोटीस

सदरील नोटीशीद्वारे सर्वांना सूचीत करण्यात येते की, माझ्या अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीनमिळकती संदर्भित जमीनमिळकतींच्या विद्यमान मालक श्रीमती. विमला सुहास बांदेकर यांच्याकडून कायमस्वरूपी व कायदेशीरपणे विकत घेण्याचे ठरविलेले आहे व तशी प्राथमिक बोलणी माझे अशील व विद्यमान जमीनमालक यांचे दरम्यान पूर्ण झालेली आहेत. संदर्भित जमीनमिळकती या पूर्णपणे बिनजोखमी, बोजाविरहीत व निर्वेध तसेच कोणत्याही प्रकारे अबाधित असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे. असे असूनदेखील संदर्भित जमीनमिळकतींमध्ये जर कोणत्याही व्यक्तीचे/व्यक्तींचे खरेदीखत, करार, भाडेपट्टा, बक्षिस, गहाणखत इत्यादीद्वारे व इतर कसल्याही कराराद्वारे वा दस्ताद्वारे प्राप्त होणारे कायदेशीर हक्क/अधिकार वा हितसंबंध असतील तर अशा व्यक्तीने/व्यक्तींनी त्या आशयाची लेखी हरकत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत माझ्या खालील नमूद पत्त्यावर पाठवून द्यावी. विहित मुदतीनंतर आलेली कसलीही हरकत/हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत व माझे अशिल संदर्भित जमीनमिळकतींचा व्यवहार अंतिमतः पूर्ण करतील याची कृपया नोंद घ्यावी.

**: संदर्भित जमीनमिळकतींचे परिशिष्ट :**

| अ. क्र. | मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १) | कोळगांव, ता.अलिबाग, जि.रायगड. | ५५/१ | ०-२१-०० | २.८७ |
| २) | कोळगांव, ता.अलिबाग, जि.रायगड. | ५६ | ०-०२-५० | ०.४१ |

अलिबाग,
दिनांक : ०२/०६/२०२६.

**राजेंद्र दा. पाटील,**
ॲडव्होकेट.
कृष्णवंदन - २, ब्राम्हणआळी,
कन्याशाळेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड,
मो. ९८२२५२८९३१
ईमेल - adv.rdpatil@gmail.com.

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस सदरच्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे भोनंग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक काशिनाथ राजाराम झावरे यांच्याकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्यात झालेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याची खात्री विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| भोनंग ता. अलिबाग जि. रायगड | २३८/२ | ०-५५-२०<br>पो.ख. ०-११-५०<br>एकूण ०-६६-७० | ३-०० |

सदरहू मिळकतींपैकी ०-३०-०० हे.आर. इतकी मिळकत

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लीज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, वारसा हक्क, वहिवाटीचे जाण्यायेण्याचा मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांजकडे लेखी कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि. ०१.०६.२०२६

सही/-
**ॲड. नंदकुमार पांडुरंग तांबडकर**
मु.पो. सुडकोली, ता. अलिबाग
मो.नं. ९०११७७९०८१/९२७२२७४०५५

## जाहीर सुचना

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे वरंडे, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील नमुद वर्णनाची शेत जमिन मिळकत श्रीमती माधुरी राजन हाटे, राहणार सागमळा, पो. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची असून, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी सदर मिळकत कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी, सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झालेली आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून चौदा (१४) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| वरंडे ता. अलिबाग | १७१ | ०-४३-३०<br>०-०५-६० पो.ख.<br>०-४८-९० एकूण | १०-४४ |

अलिबाग
दिनांक : ०१/०६/२०२६

सही/-
**(ॲड. महेश प्रभाकर वेंगुर्लेकर )**
कृष्णवंदन - २, तळमजला
कन्या शाळेसमोर, ब्राम्हण आळी,
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे मल्याण, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील क्षेत्राचे वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुनील बाळाराम लिगम यांचे कडून कायम मालकी हक्काने घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रु. पै) |
|---|---|---|---|
| मल्याण, ता. अलिबाग | ४१२ | जिरायत ००-५०-४०<br>वरकस ००-०४-००<br>पो.ख. ००-०५-१०<br>एकूण ००-५९-५० | ११.७५ |

वर वर्णन केलेल्या मिळकती पैकी श्री. सुनील बाळाराम लिगम यांचे नावे असणारे क्षेत्र ००-२४-४० हे. आर. पो.ख. ००-०५-१० हे. आर. एकूण क्षेत्र ००-२९-५० हे.आर. या नोटीसीचा विषय आहे.

वर वर्णन केल्या प्रमाणे क्षेत्राची जमिन मिळकती ह्या त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबे कब्जा वहिवाटीतील असून, त्या विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्या बाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावार कोणतीही व्यक्ती वा संस्था कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, सरकारी, निम सरकारी संस्था यांचा बोजा थकबाकी या अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत आल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखीस्वरूपात आणून द्यावीत, मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदर मिळकती विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काच्या आहेत व त्यावर अन्य कुणाचा ही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०१/०६/२०२६

सही/-
**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु. नागांव, ता. अलिबाग
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यात येते की, मिळकतीचे मालक सौ. प्रांजली प्रकाश म्हात्रे, रा. मु. समृद्धी को. ऑप. हौ. सोसायटी, घरत आळी, बस स्टँड जवळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील बागायत मिळकत आमचे पक्षकार यांना कायम स्वरूपी विकत देण्याचे ठरविले असून तशी बयाणा पावती आमचे पक्षकार यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांनी केलेली आहे. त्या बागायत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (चौ.मी) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| नागाव | २१६८ | ०-६३-५०<br>पो.ख ०-०२-३०<br>एकूण ०-६५-८० | २७.९४ |

या मिळकतीपैकी सौ. प्रांजली प्रकाश म्हात्रे, यांच्या नावे असलेले क्षेत्र ०-०६-०० हे.आर, आकार २.६४ रू. पैसे ही बागायत मिळकत

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज, पायवाट अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबध असल्यास हि नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबध नाहीत असे गृहित धरून त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

अलिबाग,
दि.२/०६/२०२६

**ॲड. मयूरी अनिल वाकासकर**
नागाव, अलिबाग
मोबाईल नं. ८८८८२९९१६६

## वार्षिक सर्वसाधारण सभा
### (फक्त सभासदांसाठी)

दत्ता पाटील अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमिटेडची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक- १६/०६/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता दत्ता पाटील अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमिटेड अलिबाग येथील कार्यालयात भरणार आहे. तरी सदर सभेस सर्व सभासदांनी उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**सभेपुढील कामे**

०१) मागील दि. ३०/०७/२०२५ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करणे व मान्यता देणे.
०२) सन २०२५-२०२६ चे वैधानिक लेखापरिक्षण झालेल्या ताळेबंद व नफा तोटा पत्रकावर चर्चा करणे व स्विकृत करणे.
०३) सन २०२५-२६ चा वैधानिक लेखापरिक्षकांचा लेखापरिक्षण अहवाल वाचन करणे.
०४) कायदा व नियम यास अनुसरुन संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.
०५) सन २०२४-२५ च्या दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे.
०६) सन २०२६-२७ सालाकरीता लेखापरिक्षकांचा लेखापरिक्षण कामी नेमणुक करणे व त्यांचे मानधनास मान्यता देणे.
०७) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.
०८) पुढील वर्ष सन २०२६-२७ सालाकरीता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
०९) राज्यातील नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या सुधारीत आदर्श उपविधी स्विकारणे बाबत विचारविनिमय करणे.
१०) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

दिनांक - ०१/०६/२०२६

आपला विश्वासू
**श्री. प्रमोद दत्तात्रेय पाटील**
(चेअरमन)

टिप- सदर सभा कोरम अभावी तहकुब झाल्यास ती त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने भरविण्यात येईल. यासभेस कोरमची आवश्यकता लागणार नाही.

जा.क्र. ९०९/२६
सहाय्यक धर्मादाय आयुक्त
रायगड विभाग अलिबाग यांचे कार्यालय
कल्पतरु इमारत, पोस्ट ऑफिसजवळ,
अलिबाग, जि. रायगड
दि. २०/०५/२०२६

Office of the Public Trust Registration
Raigad Division, Alibag
Near Maruti Temple At.Chendre,
Post, Tal.Alibag Dist.Raigad.402201
Date :

### Public Notice for Objections

Application No.: 561/2025
Name of Public Trust: "SHREE MUTHAPPAN SEVA SAMITI,KALAMBOLI"
Trust Registration No.: F-12566/2017 (Raigad)
Applicant : Mr.SHANIL BABU

All concerned persons are hereby informed through this public notice that an application has been submitted to the Assistant Charity Commissioner, Raigad Division, Alibag, under Section 22 of the Mumbai Public Trusts Act, 1950.

Any person having objections to the entries mentioned below should submit their objections in writing within the prescribed period.

Details of Immovable Properties (Land Properties) to be Recorded

1) Immovable Property (Description) - Land situated at Village Kalamboli, Navi Mumbai, Tal.Panvel,Dist.Raigad

| SR NO | VILLAGE | SURVAU NO. OR C.S.T NO.OR MUNCIPLE NO | AREA |
|---|---|---|---|
| 1 | KALMBOLI | PLOT NO.05, SEC4, SHOP NO 4 (Ground Flor) SATYA SAGAR CO-OP HOUSING SOCIETY Ltd, KALMBOLI | Admeasuring 13.00 Sq. Mtrs. Carpet Area/15.60 Sq. Mtrs (built Up Area) |

**Main Assessment Value:-**

Boundries:-
1. On the East Side By :- Owner. Pappu Choudhary (The Cake Farms, Shop No.5&6, Satya Sagar Chs.Sector-4, Kalamboli
2. On the West Side By :- Owner Bhavani Singh (Manvi Fruit Traders, Shop No.3 Satya Sagar Chs. Sector-4, Kalamboli
3. On the South Side By :- Owner. Uttam Tatyaba Bhandwalkar (Morya Xerox, Saibaba Complex,Sector-4, Kalamboli
4. On the North Side By :- Building (Mangaldeep Housing Society, Sector-4, Kalamboli

**Public Notice (Objection Notice):**

Any person having any objection regarding the above-mentioned property should submit their written objection with supporting documents to this office within 30 days from the date of publication of this notice.

If no objection is received within the stipulated period, it shall be presumed that no one has any objection, and further action will be taken accordingly. No objections raised after the prescribed period will be considered, and appropriate orders will be passed. This notice is issued under my signature and seal by the Assistant Charity Commissioner, Raigad Division, Raigad, on 19/05/2026.

Sign/-
**SUPERTENDENT**
Public Trust Registration, Office
Raigad Division, Raigad

# आयपीएल २०२६ स्पर्धा
# रॉयल ‘चॅम्पियन्स’ बंगळुरु




| अहमदाबाद | वृत्तसंस्था |

आयपीएल २०२६ स्पर्धेतील अंतिम सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि गुजरात टायटन्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर पार पडलेल्या या अंतिम सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने गुजरात टायटन्सवर ५ गडी राखून विजय मिळवला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा संघ १५६ धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरला होता. हे आव्हान रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने १८ व्या षटकात पूर्ण केलं.

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुला लागोपाठ दुसऱ्यांदा विजय मिळवण्यासाठी अवघ्या १५६ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी वेंकटेश अय्यर आणि विराट कोहलीची जोडी डावाची सुरुवात करण्यासाठी मैदानावर आली. या जोडीने पहिल्या विकेटसाठी ६२ धावांची भागीदारी केली. वेंकटेश अय्यरने ३२ धावांची खेळी केली. तर विराट कोहलीने नाबाद ७५ धावा चोपल्या. देवदत्त पडिक्कल १ धाव करुन बाद झाला.

टीम डेव्हिड २४ आणि कृणाल पंड्या १ धाव करुन माघारी परतला. शेवटी विराटने षटकार मारुन रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुला विजय मिळवून दिला. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुचा संघ गेल्या १८ हंगामात एकही जेतेपदाची ट्रॉफी जिंकू शकला नव्हता. पण रजत पाटीदारच्या नेतृत्वाखाली खेळताना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने आयपीएल स्पर्धेत इतिहास घडवला आहे. गेल्या हंगामात रॉयल चॅलेंजर्सने पंजाब किंग्सला पराभूत करत पहिल्यांदाच जेतेपदाची ट्रॉफी उंचावली होती. आता २०२६ स्पर्धेत रॉयल चॅलेंजर्स ने अंतिम सामन्यात गुजरात टायटन्सला पराभूत करुन जेतेपद राखलं आहे.

या सामन्यात गुजरात टायटन्सचा संघ नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला होता. प्रथम फलंदाजी करताना गुजरात टायटन्सला नेहमीप्रमाणे हवी तशी सुरुवात मिळाली नाही. साई सुदर्शन अवघ्या १२ तर शुबमन गिल अवघ्या १० धावा करुन माघारी परतला.त्यानंतर निशांत सिंधू २० धावांवर माघारी परतला. जोस बटलर १९ धावा करुन माघारी परतला. अर्शद खानने १५, राहुल तेवातियाने ७ , जेसन होल्डरने ७ आणि शेवटी वॉशिंग्टन सुंदरने नाबाद ५० धावांची खेळी केली.

# सूर्यवंशीचा पुरस्कारांचा ‘वैभवी’ पंच

- ४५ लाख रुपयांसह कारही जिंकली
- सर्वाधिक धावा करून ऑरेंज कॅपही मिळवली




| पटना | वृत्तसंस्था |

वैभव सूर्यवंशीची टीम राजस्थान रॉयल्स जरी फायनलमधून बाहेर पडली होती, तरीही वैभवने विक्रम केला आहे. फायनलमध्ये १५ वर्षांच्या वैभवने ५ पुरस्कार आपल्या नावावर केले आहेत.सर्वाधिक धावा काढल्याबद्दल वैभवला ऑरेंज कॅपसोबत इमर्जिंग प्लेयर ऑफ द सीजन, मोस्ट व्हॅल्युएबल प्लेयर, सुपर स्ट्रायकर ऑफ द सीजन आणि मोस्ट सिक्सेसचा किताबही मिळाला आहे. या पुरस्कारांद्वारे त्याने एकूण ४५ लाख रुपयांची बक्षीस रक्कम मिळवली, तर सुपर स्ट्रायकर ऑफ द सीजन बनल्याबद्दल त्याला टाटा सिएरा कारही बक्षीस म्हणून मिळाली.

वैभवला ऑरेंज कॅप मिळाली आहे. तो ऑरेंज कॅप जिंकणारा सर्वात तरुण खेळाडू बनला आहे. त्याने अवघ्या १५ वर्षे आणि ६५ दिवसांच्या वयात ही कामगिरी आपल्या नावावर केली आहे. १६ सामन्यांमध्ये त्याने ७७६ धावा केल्या आहेत, ज्या या हंगामात कोणत्याही फलंदाजाने केलेल्या सर्वाधिक धावा आहेत.यादरम्यान त्याने एक शतक आणि ५ अर्धशतके देखील आपल्या नावावर केली आहेत. वैभवने साई सुदर्शनचा विक्रम मोडला आहे. साई सुदर्शन आयपीएल २०२५ मध्ये ऑरेंज कॅप जिंकणारा सर्वात तरुण खेळाडू बनला होता. त्याने ही कामगिरी २३ वर्षे २३७ दिवसांच्या वयात केली होती. वैभवने या हंगामात सर्वाधिक २३७.३० च्या स्ट्राइक रेटने धावा केल्या आणि सुपर स्ट्रायकर ऑफ द सीझनचा पुरस्कार पटकावला. आयपीएलच्या इतिहासात इतक्या स्ट्राइक रेटने कोणत्याही खेळाडूने ७०० किंवा त्याहून अधिक धावा केल्या नाहीत. दुसरीकडे, सूर्यवंशीने या हंगामात विक्रमी ७२ षटकार मारले. तो एका आयपीएल हंगामात सर्वाधिक षटकार मारणारा खेळाडू ठरला. या हंगामात दमदार कामगिरी करणाऱ्या सूर्यवंशीला इमर्जिंग प्लेयर ऑफ द सीझन म्हणूनही निवडण्यात आले आहे.

पुरस्कार मिळाल्यानंतर वैभवने विनोदी शैलीत सांगितले की, मुलाखत देणे त्याच्यासाठी फलंदाजी करण्यापेक्षा जास्त कठीण काम आहे.

### बॉलिवूडचीही वैभववर नजर

वैभवच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे आता बॉलिवूडचीही त्याच्यावर नजर पडली आहे. पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित दिग्दर्शक शेखर कपूर यांनी वैभवला त्यांच्या चित्रपटात कास्ट करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. शेखर कपूर सध्या त्यांच्या मासूम या आयकॉनिक चित्रपटाच्या नवीन सिक्केलच्या तयारीमध्ये व्यस्त आहेत.

## निवडक

### डिंडा विरोधकांना करणार क्लिन बोल्ड

**पश्चिम बंगाल :** सुवेंदू सरकारच्या मंत्रिमंडळ विस्ताराचा सोहळा सोमवार १ जून रोजी पार पडला. राज्यपाल आर. एन. रवी यांच्या उपस्थितीत राजभवनात झालेल्या शपथविधी सोहळ्यात एकूण ३५ मंत्र्यांनी पदाची शपथ घेतली. शपथ घेतलेल्या प्रमुख नावांमध्ये भारतीय क्रिकेट संघाचे माजी वेगवान गोलंदाज आणि मोयना विधानसभा मतदारसंघाचे आमदार अशोक डिंडा यांच्या नावाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. माजी वेगवान गोलंदाज अशोक डिंडा आता राजकारणाच्या मैदानात नवी इनिंग खेळताना दिसणार आहे. मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या मंत्रिमंडळ विस्तारात डिंडा यांनी राज्य मंत्रिपदाची शपथ घेतली. त्यामुळे क्रिकेट व विश्वातून राजकारणात प्रवेश करणाऱ्या व्यक्तींच्या यादीत आणखी एका मोठ्या नावाची भर पडली आहे.पश्चिम बंगालमध्ये भाजप सरकार सत्तेत आल्यानंतर प्रथमच मंत्रिमंडळाचा मोठा विस्तार करण्यात आला. कोलकाता येथील लोक भवन येथे झालेल्या शपथविधी सोहळ्यात एकूण ३५ आमदारांनी मंत्री म्हणून शपथ घेतली. राज्यपाल आर. एन. रवी यांनी आमदारांना मंत्री पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांच्यासह भाजपचे अनेक वरिष्ठ नेते यावेळी उपस्थित होते. या विस्तारानंतर मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारी यांच्या मंत्रिमंडळातील सदस्यसंख्या ४१ वर पोहोचली आहे. या मंत्रिमंडळ विस्तारात स्वपन दासगुप्ता, अर्जुन सिंग, तपस रॉय, शंकर घोष यांसारख्या प्रमुख नेत्यांनाही स्थान देण्यात आले.भारतीय संघासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळलेला अशोक डिंडा बंगाल क्रिकेटमधील एक प्रसिद्ध नाव राहिले आहे. देशांतर्गत क्रिकेटमध्ये बंगाल संघासाठी त्याने अनेक महत्त्वपूर्ण सामने जिंकून दिले होते. आयपीएलमध्येही त्याने अनेक संघांचे प्रतिनिधित्व केले.



### रंगणार खो-खोचा महासंग्राम!

**सोलापूर :** महाराष्ट्रातील युवा खो-खोपटूंच्या कौशल्याची खरी कसोटी ठरणारी ५२ वी कुमार-मुली (१८ वर्षा खालील) महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा आजपासून सोलापुरात दिमाखात सुरू होत आहे. महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने आणि सोलापूर ॲमॅच्युअर खो-खो असोसिएशनच्या सहकार्याने किरण स्पोर्ट्स, सोलापूर यांच्या विद्यमाने आयोजित ही स्पर्धा २ ते ५ जून २०२६ या कालावधीत शासकीय मैदान, नेहरूनगर, विजापूर रोड, सोलापूर येथे रंगणार आहे. राज्यातील २४ जिल्ह्यांतील कुमार व मुलींचे संघ या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत सहभागी होत असल्याने सोलापूर शहरात खो-खोचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. राज्यातील अव्वल खेळाडूंमधील चुरशीच्या लढती पाहण्याची संधी खो-खोप्रेमींना मिळणार असून हा कौशल्य, वेग आणि रणनीतीचा थरार अनुभवायला मिळणार आहे. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी चार स्वतंत्र मैदाने तयार करण्यात आली आहेत. यासोबतच प्रेक्षकांसाठी भव्य गॅलरीची उभारणी करण्यात आल्याने मोठ्या संख्येने उपस्थित राहणाऱ्या क्रीडारसिकांना सामने जवळून पाहण्याची संधी मिळणार आहे. राज्यातील मातब्बर संघ मैदानात उतरल्याने खो-खोच्या वेगवान आणि रोमांचकारी खेळाची धुमश्चक्री रंगणार असल्याचे चित्र आहे. या स्पर्धेला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून याच स्पर्धेतून महाराष्ट्राचा कुमार व मुलींचा संघ निवडला जाणार आहे. निवड झालेला संघ उत्तराखंड येथे होणाऱ्या ४५ व्या कुमार-मुली राष्ट्रीय अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. त्यामुळे प्रत्येक खेळाडू राष्ट्रीय संघातील स्थानासाठी सर्वोत्तम कामगिरी करण्याच्या निर्धाराने मैदानात उतरणार आहे.

**२४ जिल्ह्यांचे संघ मैदानात; खेळाडूंवर राहणार नजर**

# सात्विक-चिरागने जिंकले सिंगापूर ओपन

| सिंगापूर | वृत्तसंस्था |

भारताची पुरुष दुहेरी जोडी सात्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांनी सिंगापूर ओपन सुपर ७५० चे विजेतेपद पटकावले आहे. त्यांनी रविवार, ३१ मे रोजी खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात इंडोनेशियाच्या तिसऱ्या मानांकित जोडी फजार अल्फियान आणि मुहम्मद शोहिबुल फिकरीला १८-२१, २१-१७ आणि २१-१६ अशा फरकाने हरवले.

सात्विक-चिरागने शेवटचे विजेतेपद थायलंड ओपन २०२४ मध्ये जिंकले होते. त्यानंतर ते अनेक मोठ्या स्पर्धांमध्ये अंतिम फेरीपर्यंत पोहोचले, पण ट्रॉफी जिंकू शकले नाहीत.

या जोडीचे हे नववे (बॅडमिंटन वर्ल्ड फेडरेशन) वर्ल्ड विजेतेपद आहे.



किताब जिंकल्यानंतर सात्विक आणि चिराग कोर्टवर आनंदाने नाचले. दोन्ही खेळाडूंनी विजयाचा जल्लोष नृत्य करून साजरा केला. पुरस्कार सोहळ्यात त्यांना ट्रॉफी, सुवर्णपदक आणि ७० लाख रुपयांची बक्षीस रक्कम देण्यात आली.पोडियम सोहळ्यादरम्यान ‘भाग मिल्खा भाग’ या चित्रपटाचे शीर्षक गीत वाजवण्यात आले. चिराग शेट्टीने पोडियमवर डोळे मिटून घेतले होते.

# कोको फ्रेंच ओपनमधून बाहेर

**पॅरिस :** फ्रेंच ओपनमध्ये शनिवारी रात्री मोठा उलटफेर झाला. डिफेंडिंग चॅम्पियन कोको गॉफ तिसऱ्या फेरीत हरून बाहेर पडली. ३०व्या मानांकित अनास्तासिया पोटापोवाने तिला ४-६, ७-६ (१), ६-४ ने हरवले. पराभवानंतर, अमेरिकन स्टार गॉफने कबूल केले की ती महत्त्वाच्या संधींचा फायदा घेऊ शकली नाही. ऑस्ट्रियाच्या पोटापोवाने लांब बेसलाइन रॅलींमध्ये चांगले नियंत्रण दाखवले. तिने निर्णायक क्षणी गुण मिळवून विजय संपादन केला. दुसरीकडे, जपानच्या ओसाकाने तिच्या कारकिर्दीतील १००व्या ग्रँड स्लॅम सामन्यात विजय मिळवला.

# ऋतुराजला टीम इंडियात स्थान; रियान पराग बाहेर

| मुंबई | वृत्तसंस्था |

आयपीएल झाल्यानंतर भारतीय अ संघ ९ जूनपासून श्रीलंकेत होणाऱ्या तिरंगी मालिकेत झुंज देताना दिसून येणार आहे. या मालिकेसाठी आधीच भारतीय अ संघाची घोषणा करण्यात आली होती. या मालिकेसाठी जाहीर करण्यात आलेल्या भारतीय संघाची जबाबदारी युवा फलंदाज रियान परागकडे सोपवण्यात आली होती. पण ही मालिका सुरू होण्यासाठी अवघे काही दिवस शिल्लक असताना बीसीसीआयकडून भारतीय संघात मोठा बदल करण्यात आला आहे. तिरंगी मालिका सुरू होण्याआधी भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे. रियान हॅमस्ट्रिंगच्या दुखापतीमुळे बाहेर झाला. त्याच्या जागी ऋतुराज गायकवाडला भारतीय अ संघात स्थान देण्यात आलं आहे.

### तिरंगी मालिकेसाठी भारतीय अ संघ

तिलक वर्मा (कर्णधार), ऋतुराज गायकवाड (उपकर्णधार), प्रियांश आर्य, वैभव सूर्यवंशी, आयुष बडोनी, निशांत सिंधु, सूर्यांश शेडगे, प्रभसिमरन सिंग (यष्टिरक्षक), कुमार कुशाग्र (यष्टिरक्षक), विपराज निगम, यश ठाकुर, युद्धवीर सिंग, अंशुल कंबोज, अरशद खान, अनुकूल रॉय.

# लिओनल मेस्सीचा पुतळा तडकाफडकी हटवला

**बंगाल :** अर्जेंटिनाचा महान फुटबॉलपटू लिओनल मेस्सीचा येथील लेक टाऊन भागात उभारण्यात आलेला ७० फूट उंच भव्य पुतळा तडकाफडकी हटवण्यात आला.

वादळांमुळे हा पुतळा संरचनात्मकदृष्ट्या अस्थिर झाला असून कधीही कोसळू शकतो, अशा स्थानिक नागरिकांच्या तक्रारी केल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने घटनास्थळी जाऊन पुतळ्याची पाहणी केली आणि संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी तातडीने पावले उचलली. अलीकडच्या काळात आलेल्या वादळांमुळे मेस्सीचा पुतळा डोलत असल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी काही दिवसांपूर्वी लेक टाऊन पोलिसांना दिली. या माहितीनंतर पोलीस आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पुतळ्याची पाहणी केली.

# टी-२० मुंबई लीगच्या चौथ्या पर्व वानखेडेवर

| मुंबई | वृत्तसंस्था |

नुवामा प्रायव्हेट पुरुषांच्या टी-२० मुंबई लीगचे चौथे पर्व आणि टी-२० मुंबई महिला लीगच्या पहिल्या हंगामाला सोमवार, १ जूनपासून सुरुवात होणार आहे.

मुंबई शहर एका भव्य क्रिकेट महोत्सवासाठी सज्ज होत असताना, लीगमधील सहभागी संघांचे कर्णधार सहप्रायोजक ३१ लेबल्सद्वारे आयोजित करण्यात आलेल्या एका शानदार सीझन लाँच कार्यक्रमासाठी एकत्र आले.

या कार्यक्रमामुळे चुरशीच्या क्रिकेट सामन्यांनी भरलेल्या आगामी दोन आठवड्यांच्या पर्वासाठीची पार्श्वभूमी तयार झाली आहे.




मुंबईत झालेल्या या कार्यक्रमासाठी अजिंक्य रहाणे, श्रेयस अय्यर, शिवम दुबे, शार्दूल ठाकूर, सर्फराझ खान असे मुंबईतील नावाजलेले खेळाडू उपस्थित होते. तसेच महिला संघाच्या कर्णधार हुमायरा काझी, सायली सतघरे व साइमा ठाकोर यावेळी हजर होत्या.

गतवर्षी सिद्धेश लाडच्या नेतृत्वात खेळणाऱ्या मुंबई साऊथ सेंट्रल मराठा रॉयल्स संघाने जेतेपद मिळवल होते.

**नागावचा समर स्विमिंग कॅम्प यशस्वी** | **अंतिम दिवशी जलतरण स्पर्धांचा थरार**

# जलतरणाच्या लाटेवर आत्मविश्वासाचा ठसा

| चौल | प्रतिनिधी |

पीएनपी सायरस पूनावाला स्कूल, नागाव येथे आयोजित करण्यात आलेला महिनाभराचा समर स्विमिंग कॅम्प उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाला. उन्हाळी सुट्टीचा सदुपयोग करत विद्यार्थ्यांनी जलतरणाचे धडे घेत आत्मविश्वास, शिस्त आणि फिटनेसचा अनोखा अनुभव घेतला. सोमवार, दि. १ जून रोजी कॅम्पच्या समारोपदिनी आयोजित करण्यात आलेल्या जलतरण स्पर्धांनी चुरस निर्माण केली.

दि. २ मे ते १ जून २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या कॅम्पमध्ये ५ ते १५ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.



अत्याधुनिक स्विमिंग पूल आणि सुरक्षित वातावरणात मुख्य प्रशिक्षक अमर पाटील व दिनेश मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना जलतरणाचे प्रशिक्षण देण्यात आले.

पंधरा वर्षे वयोगटातील मुलांमध्ये वारिश सागर वाकले याने प्रथम क्रमांक मिळवला. दक्ष केदार गुरव याने द्वितीय, तर शार्दुल अभिजित साखळे याने तृतीय क्रमांक पटकावला. मुलींच्या गटात मनवा निलेश म्हात्रे हिने प्रथम, ईशा योगेश ठाकूर हिने द्वितीय, तर अस्मी अभिजित पाटील हिने तृतीय क्रमांक मिळविला.

दहा वर्षांखालील गटात क्षितीज निलेश म्हात्रे याने प्रथम क्रमांक पटकावला. मारिया समीर तांडेल हिने द्वितीय, तर मायरा समीर तांडेल हिने तृतीय क्रमांक मिळविला. सर्व विजेत्या स्पर्धकांना मेडल व प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. तसेच महिनाभर कॅम्पमध्ये सहभाग घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांनाही प्रशस्तीपत्रके प्रदान करण्यात आली. शाळेच्या प्राचार्या गितीका भुचर, मुख्य प्रशिक्षक अमर पाटील आणि दिनेश मानकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी शाळेचा स्टाफ, पालक आणि नागरिक उपस्थित होते.

> “मोबाईल आणि स्क्रीनच्या जगात मुलांना मैदानी उपक्रमांची गरज अधिक आहे. या कॅम्पमुळे मुलांमध्ये शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच आत्मविश्वास वाढला. माझ्या मुलांमध्येही सकारात्मक बदल जाणवला. प्रशिक्षकांनी सुरक्षिततेची घेतलेली काळजी आणि दिलेले वैयक्तिक मार्गदर्शन कौतुकास्पद आहे. अशा उपक्रमांचे नियमित आयोजन व्हावे.”
>
> – समीर तांडेल, पालक

> “कॅम्पच्या सुरुवातीला अनेक विद्यार्थ्यांना पाण्याची भीती होती. काही मुले पहिल्यांदाच स्विमिंग पूलमध्ये उतरली होती. मात्र, महिनाभराच्या सातत्यपूर्ण प्रशिक्षणानंतर त्यांच्यात झालेला बदल प्रेरणादायी आहे. मुलांनी केवळ पोहणेच शिकले नाही, तर आत्मविश्वास, शिस्त आणि संकटसमयी उपयोगी पडणारे जीवनरक्षक कौशल्यही आत्मसात केले. अंतिम स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी दाखविलेली कामगिरी आमच्यासाठी समाधानाची बाब आहे.”
>
> – अमर पाटील, मुख्य जलतरण प्रशिक्षक

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)